मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

पालघर-ठाणे | रायगड - रत्नागिरी | RNI No.: MAHAMAR/2014/62313 | मंगळवार, १० जून २०२५ | वर्ष: ११ | अंक: २०१ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## नक्षलवाद्यांच्या आईडी स्फोटात एएसपी शहीद

सुकमा, दि. ९ वृत्तसंस्था

छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यात आयईडी स्फोटात एएसपी आकाश राव गिरपुंजे शहीद झाले आहेत. याशिवाय एसडीओपी आणि टीआय जखमी झाले आहेत. कोटा येथून पाच किलोमीटर अंतरावर मुख्य रस्त्यावर आयईडी स्फोट झाल्याचं सांगितलं जात आहे. एएसपी अधिकारी आकाश काही जवानांना घेऊन जेसीबी जाळल्याची घटना पाहण्यासाठी गेले होते. या दरम्यान नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. सुकमा येथे नक्षलवाद्यांनी कंत्राटदाराच्या पोकेलिन मशीनला आग लावली होती. एसपी आकाश राव एसडीईओपी-टीआय इतर अधिकाऱ्यांसह घटनास्थळाची पाहणी करण्यासाठी आले होते. या दरम्यान, ते नक्षलवाद्यांच्या प्रेशर आयईडीचा बळी ठरले. स्फोटात एएसपी आकाश राव शहीद झाले आणि एसडीईओपी-टीआय जखमी झाले.

अग्रलेख

## खरीखरी

## राहुलने आणले नाकीनऊ

सध्या राहुल गांधी मोदी सरकारवर आरोपांच्या फैरी झाडत आहेत. त्या आरोपांचे खंडन भाजपचे अनेक प्रवक्ते, वक्ते अनेक मुख्यमंत्री आणि बरेचजण ओरडून ओरडून करीत आहेत. पण राहुल गांधी दररोज नवा आरोप करतात आणि त्याला उत्तर कसे द्यावे. अशा विवंचनेत भाजप सारखा बलाढ्य पक्ष सध्यातरी हतबल झालेला दिसतो आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीचे जे निकाल आले. त्यात गडबड झाल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला. त्याबद्दल याच स्तंभात आम्ही त्याचा उहापोह केला होता. आता भारतीय जनता पक्षाचे तमाम वक्ते आणि प्रवक्ते अगदी हिरिरीने खंडन करीत आहेत. खुलाश्यावर खुलासे करीत आहेत. त्यानंतर राहुल गांधी यांचेकडून आरोपावर आरोप होत आहेत. आज मोदी सरकारच्या तिसऱ्या कालखंडाच्या पहिल्या वर्षाच्या वर्धापन दिनानिमित्त मोदीप्रेमी वृत्तपत्रांमधून मोठमोठ्या जाहिराती प्रकाशित झालेल्या आहेत. भारतीय जनता पक्षाच्या दमदार प्रचार यंत्रणांकडून प्रचाराचा झंझावात उभा करण्यात आलेला आहे. इतर विरोधी पक्ष तेवढे फार्मात दिसत नाहीत. पण राहुल गांधी मात्र षटकारावर षटकार (सोप्या भाषेत छक्क्यावर छक्के) लगावत आहेत. 2014 मध्ये पहिल्यांदा स्पष्ट बहुमताने भारतीय जनता पक्षाचे सरकार अगदी निर्विवादपणे सत्तेवर आले होते. तेव्हा राहुल गांधी काँग्रेसचे अर्धवट नेते होते. कारण तेव्हा ते भाजपचे आवडते पप्पू होते. त्यामुळे त्यांनी केलेले आरोप त्यावेळच्या सत्ताधारी पक्षाने गंभीरपणे घेतले नव्हते. तसेच जनतेनेही ते गंभीरपणे घेतले नव्हते. आता राहुल गांधी यांनी थेट निवडणूक आयोगावरच निशाणा साधलेला आहे. या आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभे करून या आयोगाची विश्वासार्हता संकटात सापडली आहे. असे विधान केल्यानंतर निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांनी केलेले आरोप हे अधांतरी आणि हास्यास्पद आहेत. इतकेच म्हटले आहे. राहुल गांधी यांनी केलेले आरोप फेटाळताना निवडणूक आयोगाने कोणताही खुलासा केलेला दिसत नाही. हास्यास्पद आरोप फेटाळताना खुलासा हवा असतोच ना. ते मात्र निवडणूक आयोगाने केलेलेच नाही. भारत पाकिस्तान यांच्यातील नुकत्याच संपन्न झालेल्या लढाईमध्ये केंद्र सरकारला आपल्या भारतातील सर्व राज्यातील सरकारांनी अत्यंत मनापासून आणि सक्रिय दाद दिली होती. ती अत्यंत मनापासून होती. त्यावेळी केवळ राहुल गांधीच नाही किंवा काँग्रेस पक्षच नाही. तर देशातील तमाम विरोधी पक्षांनी सरकारला पाठिंबा दिला होता. भारतातील विशिष्ट जातीचा पगडा असलेल्या पक्षांनीही सरकारसोबत असल्याचे अनेकदा म्हटले होते आणि आपल्या कृतीतून दाखवून दिले होते. पण आता ऑपरेशन सिंदूर संपल्यानंतर राहुल गांधी यांनी त्या सिंदूराची अशी काही चिरफाड केली आहे की, सरकारलाही त्याचे उत्तर देतादेता नाकीनऊ येत आहे. या पाकिस्तानबरोबरच्या लढाईत भारताच्या काही विमानांना झळ बसली आहेच. त्यात राफेलही फेल झाल्याचे आरोप होत आहेत. पण या ऑपरेशन सिंदूर बाबत देशाला स्पष्टपणे सांगण्यास काय हरकत आहे. असा राहुल गांधींचा आरोप आहे. ही गोष्ट अत्यंत वस्तुनिष्ठ आहे, असे बरेच राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील मतभेदांमध्ये तिसऱ्या पक्षाने मध्यस्थी करू नये. असे शिमला करारावेळी ठरलेले होते आणि ते त्रिकालाबाधित सत्य आहे. मग अमेरिकेचे उपटसुंभ अध्यक्ष ट्रम्प यांनी दहादहा, अकरा-अकरा वेळा आपल्यामुळेच युद्ध थांबले. म्हणजे आपण युद्ध थांबविण्याचे काम केले. असा गर्विष्ठपणा का केला. हे अद्याप कोणालाच कळलेले नाही. त्यालाही राहुल गांधी आणि लक्ष्य केलेले आहे. राहुल गांधी सध्या जे आरोप करीत आहेत. त्याचा खुलासा कुणीही करीत नाही. हल्ला करणारे दहशतवादी कुठे गडप झाले हेही समजत नाही. राहुल गांधी मात्र देशद्रोही वक्तव्य करतात. हेच राहुल गांधींच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर असते. जे सध्याच्या कालावधीमध्ये अजिबात संयुक्तिक वाटत नाही, असे जनता म्हणते. मग या आणि अशा परिस्थितीत भारतीय जनता पक्षाला आता काँग्रेसवर गांधी कुटुंबावर चावूनचावून आणि घासूनघासून चोथा झालेले आरोप करावे लागत आहेत. म्हणजेच त्यात काँग्रेसमधील गांधी परिवाराची घराणेशाही, मुसलमानधार्जीणा काँग्रेस पक्ष त्यासोबतच धर्मद्रोही किंवा देशद्रोही वगैरे सारखी उत्तरे देण्यात येत आहेत. एक राहुल गांधी सोडले. तर काँग्रेस पक्षात एवढ्या त्वेषाने बोलणारे कन्हैया कुमार यांच्यासारखे एक दोन वक्ते सोडले. तर काँग्रेस वाल्यांची तोंडे जवळ जवळ बंदच आहेत. पण एकटे राहुल गांधीच आम्ही वर म्हटल्याप्रमाणे जोरदार आरोप करून सरकारला हैराण करीत आहेत. आता परवाच राहुल गांधी यांनी महाराष्ट्र प्रमाणेच बिहारमध्येही मतमोजणी घोटाळा होईल. असा आरोप करून टाकला आहे. महाबलाढ्य भारतीय जनता पक्षाची फौज एकट्या राहुल गांधीच्या आरोपाचे उत्तर देण्यासाठी तेवढी प्रभावी ठरत नाही. एकूणच सध्या एकट्या राहुल गांधी यांनी सरकारच्या नाकीनऊ आणले आहे. असे म्हटले तर, ते वावगे ठरू नये.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# लोकलमधून पडून चार प्रवाशांचा मृत्यू

## मुंब्रा स्थानकाजवळ अपघात






मुंब्रा, दि. ९ प्रतिनिधी

**मुंबईजवळ दिवा-मुंब्रा रेल्वेस्थानकांच्या दरम्यान मोठा रेल्वे अपघात झाला आहे. कसाऱ्याहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला (सीएसएमटी) जणाऱ्या लोकल रेल्वेमधून पडून चार प्रवाशांचा मृत्यू झाला. सकाळी ९.२० च्या दरम्यान, दिवा व मुंब्रा स्थानकांच्या दरम्यान ही घटना घडली आहे. लोकलमधील प्रचंड गर्दीमुळे काही प्रवासी डब्याच्या दरवाज्यात (फूटबोर्ड) लटकत उभे होते. त्याचवेळी बाजूने जाणारी लोकल या प्रवाशांना घासून गेली. या लोकलच्या धक्क्याने १३ प्रवासी दरवाजातून खाली पडले. यापैकी चार जणांचा मृत्यू झाला आहे. नऊ जण गंभीररित्या जखमी झाले आहेत. मृतांमध्ये ठाण्यातील ४४ वर्षीय आयटी इंजिनिअर मयूर शाह, स्टेशनरीमध्ये काम करणारे राहुल गुप्ता, जीआरपीएफ जवान विकी मुख्याद आणि उल्हासनगर येथील सरोज केतन यांचा समावेश आहे.**

मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं की कसाऱ्याहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला (सीएसएमटी) जाणारी लोकल प्रवाशांनी गच्च भरली होती. काही प्रवासी फूटबोर्डवर उभे राहून प्रवास करत होते. त्याचवेळी सीएसएमटीवरून डाऊन दिशेला जाणारी एक लोकल समोरून आली. ज्या ठिकाणी या दोन्ही लोकल गाड्या एकमेकांच्या बाजूने जात होत्या तिथे दोन रेल्वेरुळांमधील अंतर कमी आहे. तसेच अनेक प्रवासी दरवाजात उभे होते, त्यांच्या पाठीवर बॅगा देखील होत्या. हे प्रवासी डाऊन दिशेने जाणाऱ्या लोकलला घासले गेले, त्यांच्या बॅगा दुसऱ्या लोकलवर आदळल्या. त्यामुळे दरवाजात उभे असलेले आठ प्रवासी खाली पडले.

### प्रचंड गर्दीमुळे अपघात

मध्य रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला यांनी या घटनेनंतर पत्रकार परिषद घेतली. स्वप्नील नीला या घटनेची माहिती देत म्हणाले, "आम्हाला त्या लोकलमधील प्रवाशांनी व गार्डने साडेनऊच्या सुमारास फोन करून या घटनेची माहिती दिली. त्यानंतर आम्ही तातडीने या प्रवाशांसाठी रुग्णवाहिका पाठवली. ९.५० च्या दरम्यान रुग्णवाहिका व रेल्वेचे अधिकारी-कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. सर्व जखमींना रुग्णालयात नेलं".

### "पुष्पक एक्सप्रेसचा या अपघाताशी संबंध नाही"

दरम्यान, काही वृत्तवाहिन्यांनी दावा केला होता की सीएसएमटीहून लखनौला जाणाऱ्या पुष्पक एक्सप्रेसमधील प्रवासी पडले आहेत. तर काही माध्यमांनी म्हटलं होतं की पुष्पक एक्सप्रेस व कसारा-सीएसएमटी लोकल बाजूने जात असताना ही दुर्घटना घडली आहे. मात्र, पुष्पक एक्सप्रेसचा या अपघाताशी काहीही संबंध नसल्याचं मध्य रेल्वेने स्पष्ट केलं आहे.

### मध्य रेल्वे प्रशासनाचे तीन निर्णय

स्वप्नील नीला म्हणाले, "या अपघातानंतर रेल्वे प्रशासनाने काही निर्णय घेतले आहेत. ज्या नवीन गाड्या मध्य रेल्वेच्या ताफ्यात दाखल होत आहेत त्यामध्ये ऑटोमॅटिक डोअर क्लोज सिस्टिम (या लोकल गाड्यांचे दरवाजे आपोआप बंद होतील) असेल. २३८ नव्या एसी लोकल आपल्याला मिळणार असून या लोकल डोअर क्लोज फिटमेंटसह येणार आहेत. तसेच आपण आणखी एक निर्णय घेतला आहे. ज्या लोकल गाड्या सध्या मध्य रेल्वेवर धावत आहेत. त्या लोकल्समध्ये रेट्रो फिटमेंटच्या माध्यमातून दरवाजे आपोआप बंद होतील अशी सिस्टिम बसवण्याचा प्रयत्न करत आहोत".

### रेल्वे विभागाने चौकशी सुरू केली आहे: मुख्यमंत्री

या घटनेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर पोस्ट करत प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, "दिवा-मुंब्रा स्थानकादरम्यान लोकलमधून एकूण ८ प्रवासी खाली पडून झालेल्या दुर्घटनेत काही जणांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. जखमींना तातडीने शिवाजी हॉस्पिटल आणि ठाणे सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. स्थानिक प्रशासन समन्वय साधून आहे. जखमींना लवकर आराम मिळावा, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. ही घटना नेमकी कशामुळे घडली, याची चौकशी रेल्वे विभागाने सुरू केली आहे."

### रेल्वे खात्याने अपघाताची गंभीर दखल घ्यावी: शरद पवार

मध्य रेल्वेच्या दिवा आणि मुंब्रा स्थानकादरम्यान ट्रेनमधून पडून प्रवाशांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. सर्व निष्पाप प्रवाशांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. तसेच, काही प्रवाशांवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यांच्याही प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा होवो, अशी प्रार्थना करतो. मध्य रेल्वेवर दररोज सरासरी सहा ते सात प्रवाशांचा लोकलमधून पडून मृत्यू होतो. एका आकडेवारीनुसार समोर आलेली ही माहिती अत्यंत चिंताजनक आहे. लोकल ट्रेन्समधील वाढती गर्दी याचं मुख्य कारण असल्याचं सर्वज्ञात आहे. तरीही, असे अपघात घडल्यानंतर प्रवाशांवरच त्यांच्या मृत्यूचे खापर फोडून चालणार नाही. केंद्रीय रेल्वे प्रशासनाने या दुर्दैवी घटनेची गांभीर्याने दखल घ्यायला हवी. मध्य रेल्वेनेही वेळेचं उत्तम नियोजन करून त्यानुसार महत्वांच्या मार्गांवर लोकल फेऱ्या वाढवणं गरजेचं आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात. वारंवार होणाऱ्या अशा अपघातांना आळा घालण्यासाठी लोकल गाड्यांमध्ये स्वयंचलित दरवाजे बसवण्याच्या निर्णयाची विहित वेळेत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे.

### दरवाजे बंद केले तर गुदमरून मरतील: राज ठाकरे

मी रेल्वेने प्रवास केला आहे, त्यामुळे मला प्रवास माहीत आहे. कारण, त्यावेळी गर्दी कमी असायची. आता, मुंबईत संध्याकाळी मेट्रोत शिरून दाखवा, आज ज्या कर्व्हवर अपघात झालाय तो काय नवा नाही. रेल्वेमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी होत आहे, त्यापेक्षा त्यांनी जाऊन स्थिती बघावी, असेही राज यांनी म्हटले. तर, रेल्वेनं लोकलचे दरवाजे बंद करण्याचा निर्णय घेतला, त्यावरही वास्तववादी प्रतिक्रिया दिली. लोकलचे डोर क्लोज केले तर लोकं गुदमरून मरतील, अशा शब्दात राज ठाकरेंनी मुंबईतील वाढती गर्दी आणि रेल्वे प्रशासनावर परखडपणे भाष्य केलं. पुढे ते म्हणाले, "रेल्वे. वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे. लोकांना चालण्यासाठी फुटपाथ नाही. वाहनांसाठी रस्ते नाहीत. कोण येतंय, जातंय नाहिती नाही. मेट्रो, मोनो इतर सोयीसुविधा याने प्रश्न सुटणार नाहीत. मुंबईत मोनो, मेट्रो असताना गाड्यांचं रजिस्ट्रेशन थांबलं का? निवडणुका, प्रचारात सगळे गुंतले आहेत. शहरं म्हणून याकडे पाहण्यास कोणी तयार नाही. शहरावर बोलल्यास त्याला किंमत नाही".

### दिवा टर्मिनेटींग लोकल ट्रेन सुरू करावी - जितेंद्र आव्हाड

शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे स्थानिक आमदार जितेंद्र आव्हाड यांनी संताप व्यक्त करत थेट रेल्वेच्या कमाईचा मुद्दा उपस्थित करत हल्लाबोल केला आहे. आव्हाड यांनी सर्वसामान्यांच्या मनातील खदखद बोलून दाखवताना मागील बऱ्याच काळापासून दिव्यातून लोकल सोडण्याची मागणी रेल्वे का मान्य करत नाहीये असा सवालच उपस्थित केला आहे. रेल्वेमध्ये पडून पाच जणांचा मृत्यू झाल्यानंतर आव्हाड यांनी आपल्या अधिकृत एक्स अकाऊंटवरून संताप व्यक्त केला आहे. "धावत्या रेल्वेगाडीतून पडून झालेले मृत्यू हे वेदनादायक आहेत. लोकल ट्रेनमध्ये गर्दीच्या वेळेतील प्रवास हा नेहमीच जीवघेणा असतो. रेल्वेचा न सुधारण्याचा अट्टाहास हा अनेकांचा जीव घेऊन जातोय," असं आव्हाड म्हणालेत. तसेच पुढे बोलताना आव्हाड यांनी, "प्रवाशांनी अनेकवेळा मागणी केली आहे की दिवा टर्मिनेटींग लोकल ट्रेन सुरू करावी. गेल्या दशकात दिवा, मुंब्रा आणि कळवा परिसरातील लोकसंख्या हजार पटीने वाढली आहे. मुंबईला प्रवास करणाऱ्या प्रवाशांचीही संख्या हजार पटीने वाढली आहे. लोकल ट्रेनच्या फेऱ्या प्रवाशी संख्येच्या तुलनेत वाढल्यात का? तर त्याचे उत्तर 'नाही' असेच आहे," असे आव्हाड म्हणाले आहेत.

# महापालिका निवडणुका तीन टप्प्यांत; मुंबई सर्वात शेवटी

## राज्यात 29 महापालिका, 257 नगरपालिका, 26 जिल्हा परिषदांसाठी रणधुमाळी सुरू होणार

मुंबई, दि. ९ प्रतिनिधी

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी लवकरच रंगणार असून, ऑक्टोबरमध्ये राज्य निवडणूक आयोग निवडणूकांचे वेळापत्रक जाहीर करण्याच्या तयारीत आहे. विशेष म्हणजे, महानगरपालिका व स्थानिक संस्थांच्या निवडणुका यंदा तीन टप्प्यांत पार पडणार असल्याचे संकेत निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले आहेत.

यंदा होणाऱ्या निवडणुकांमध्ये राज्यातील २९ महापालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषदा आणि २८८ पंचायत समित्यांचा समावेश आहे. अनेक वर्षांपासून या निवडणुका प्रलंबित होत्या, त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांवर सध्या प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, ऑक्टोबरमध्ये या प्रशासकांना निरोप देत लोकशाही प्रक्रियेचा नवा अध्याय सुरू होणार आहे.

**राज्य निवडणूक आयोगाने आखलेल्या प्राथमिक आराखड्यानुसार**

- पहिल्या टप्प्यात उत्तर महाराष्ट्र व दक्षिण महाराष्ट्रातील महानगरपालिका व स्थानिक संस्थांमध्ये मतदान होणार.
- दुसऱ्या टप्प्यात विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात लोकशाहीचा उत्सव रंगणार.
- तिसऱ्या आणि अंतिम टप्प्यात मुंबई, ठाणे आणि कोकणातील महापालिकांमध्ये निवडणूक होणार असून, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

निवडणूक आयुक्त वाघमारे यांनी स्पष्ट केले की, २०११ च्या जनगणनेच्या आधारे प्रभाग रचना केली जाणार आहे. काही शहरांमध्ये प्रभागांची सीमारेषा व संख्या बदलली जाणार आहे. या बदलांविरोधात काही राजकीय पक्ष वा नागरिक न्यायालयात धाव घेऊ शकतात, त्यामुळे प्रभाग रचना अंतिम करण्यासाठी किमान दोन महिने लागण्याची शक्यता आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया तीन ते साडेतीन महिन्यांत पूर्ण केली जाईल, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.

निवडणूक वेळापत्रकाच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनीही कंबर कसली आहे. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट व अजित पवार गट), शिवसेना (शिंदे गट व ठाकरे गट), मनसे अशा प्रमुख पक्षांनी आपल्या पक्ष संघटना आणि प्रचारयंत्रणा सज्ज ठेवण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः मुंबई महानगरपालिकेसाठी ही निवडणूक अत्यंत निर्णायक ठरणार आहे. राज्यात गेल्या काही वर्षांपासून अनेक महापालिका निवडणुका लांबणीवर पडल्या होत्या. त्यामुळे यंदाच्या निवडणुकांकडे नागरिक, पक्ष कार्यकर्ते, तसेच राजकीय निरीक्षकांचे लक्ष केंद्रित झाले आहे. ऑक्टोबरमध्ये शंखनाद होणार, आणि संपूर्ण महाराष्ट्र पुन्हा एकदा मतदानाच्या रंगभूमीवर अवतरणार आहे हे निश्चित झाले आहे.

# जलसंपदा खात्यातील अभियंत्यांच्या बढत्या-बदल्यांना मुख्यमंत्र्यांकडून 'ब्रेक'

मुंबई, दि. ९ प्रतिनिधी

राज्य सरकारच्या जलसंपदा विभागात इंजिनिअर पदावरील 60 हून अधिक बढत्या आणि बदल्यांमागे आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर आरोप होत असतानाच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर तात्काळ कारवाई करत संपूर्ण प्रक्रिया स्थगित केली आहे. या निर्णयामुळे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन व राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वर्तुळात खळबळ उडाली आहे.

गोपनीय सूत्रांच्या माहितीनुसार, जलसंपदा खात्यातील महत्त्वाच्या पदांवर बढती किंवा बदली मिळवण्यासाठी कोट्यवधी रुपयांचे अर्थपूर्ण व्यवहार सुरू होते. यामध्ये मंत्र्यांचे निकटवर्तीय सक्रिय असल्याचे उघड झाले.

गिरीश महाजन (तापी, विदर्भ व कोकण खोरे) आणि राधाकृष्ण विखे-पाटील (गोदावरी व कृष्णा खोरे) या दोन जलसंपदा मंत्र्यांच्या नावांसोबतच, विखे-पाटील यांचे पुत्र सांसद डॉ. सुजय विखे पाटील यांचे काही 'करामती' मुख्यमंत्र्यांच्या कानावर गेल्याचे सांगितले जात आहे. जलसंपदा विभागाचे प्रमुख सचिव दीपक कपूर यांनी या बदल्यांमागे सुरू असलेल्या अनियमितता व पैशांचे राजकारण हेरले आणि त्यांनी थेट संबंधित मंत्र्यांना यासंदर्भात सावध केले. मात्र, मंत्र्यांचे निकटवर्तीय या इशाऱ्याला जुमानत नव्हते. काहींचा तर खुला पवित्रा असा होता की, "तुम्हीच मग खाते चालवा!"

यानंतर कपूर यांनी स्वतःची जबाबदारी पार पाडत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सविस्तर स्थिती अहवाल पाठवला. या अहवालात अनेक गंभीर बाबी उघड झाल्या. या अहवालातील धक्कादायक बाबींनंतर मुख्यमंत्र्यांनी तातडीने निर्णय घेत, सर्व बदल्या व बढती प्रक्रिया स्थगित करण्याचे आदेश जारी केले. या निर्णयामुळे अनेकांची स्वार्थाची गणितं कोलमडली असून, पद मिळवण्यासाठी केलेले आर्थिक व्यवहार हवेत विरले आहेत. महाराष्ट्रासारख्या कृषीप्रधान राज्यात जलसंपदा विभाग अत्यंत संवेदनशील व महत्त्वाचा मानला जातो. या विभागासाठी २०२५-२६च्या अर्थसंकल्पात तब्बल १५,९३२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निधीच्या नियोजनासाठी शेकडो इंजिनिअर कार्यरत असतात, आणि त्यामुळेच या विभागात वर्णी लागण्यासाठी मोठा 'लॉबिंग बाजार' उभा राहिल्याची जोरदार चर्चा आहे. गेल्या काही काळात जलसंपदा विभागातील सत्ताधारी गटाचे वर्चस्व, हस्तक्षेप आणि अनियमित व्यवहारांनी गंभीर स्वरूप घेतले होते. मात्र, मुख्यमंत्री फडणवीस यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता, थेट स्थगिती देत एक उदाहरण ठेवले आहे.

# पीओपी मूर्तींच्या निर्मितीवर बंदी नाही, मात्र नैसर्गिक जलाशयात विसर्जनास मनाई - उच्च न्यायालय

मुंबई, दि. ९ प्रतिनिधी

यंदाच्या गणेशोत्सवात शाडूची की प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) मूर्ती या वादाबाबत मुंबई हायकोर्टात सोमवारी झालेल्या सुनावणीत न्या. आलोक आराधे आणि न्या. संदीप मारणे यांच्या पीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला. पीओपी मूर्तींच्या निर्मितीवर बंदी नसेल, मात्र नैसर्गिक जलाशयात पीओपींच्या मूर्तींचं विसर्जन करण्यास हायकोर्टाने मनाई केली असून या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० जूनला होणार आहे.

मुंबईत पीओपी मूर्तींवरील बंदी प्रकरणी मुंबई हायकोर्टात याचिका दाखल झाली आहे. या याचिकेवर सोमवारी सुनावणी झाली. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (CPCB) हायकोर्टात भूमिका स्पष्ट केली. सीपीसीबीच्या समितीने केलेल्या शिफारसींचा दाखलाही हायकोर्टात देण्यात आला. आमचा आक्षेप हा पीओपीच्या मूर्तींचं नैसर्गिक जलाशयात विसर्जन करण्यावर असून मूर्तींच्या निर्मितीला विरोध नाही. पीओपी मूर्तींचं विसर्जन हे कृत्रिम तलावातच झालं पाहिजे, असं सीबीसीबीएच्या वतीने हायकोर्टात सांगण्यात आले.

सर्व बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यावर हायकोर्टातील न्या. मारणे आणि न्या. आराधे यांच्या पीठाने छोट्या पीओपी मूर्तींचा प्रश्न निकाली काढला. पीओपीच्या मूर्ती बनवण्यास आणि त्याच्या विक्रीवर कोणतेही



निर्बंध नसतील. मात्र, या मूर्तींचं विसर्जन नैसर्गिक जलस्रोतात होणार नाही, असा निर्णय हायकोर्टाने दिला. यापूर्वी पीओपीच्या मूर्तींच्या तयार करणे, विक्री करणे यावर बंदी होती. ती बंदी आता हटवण्यात आली आहे.

छोट्या मूर्तींचा प्रश्न निकाली निघाला असला तरी २० फुटावरील मूर्तींबाबत भूमिका स्पष्ट झालेली नाही. सुनावणीदरम्यान महाधिवक्ता डॉ. विरेंद्र सराफ यांनी पीठाला विनंती की, राज्य सरकारला २० फुटापेक्षा उंच गणेश मूर्तींबाबत काही मोकळीक मिळू शकते का. या मूर्तीही आपल्या संस्कृतीचा भाग झाल्या आहेत.

यावर पीठाने तोंडी सांगितले की, पीओपी मूर्तींचं विसर्जन हे नैसर्गित जलस्रोतांमध्ये होऊ नये याबाबत आम्ही ठाम आहोत. मोठ्या मंडळांनी कृत्रिम तलावांची निर्मिती करून त्यातच विसर्जन केलं तर चालू शकेल. यावर महाधिवक्तांनी सांगितलं की, जर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळं यासाठी तयार असतील तर राज्य सराकरचे काहीच म्हणणे नाही.

याबाबत राज्यसरकारला ३ आठवड्याचा वेळ देण्यात आला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० जूनला होणार आहे.

समुद्रात, तलावात किंवा नदीत विसर्जन केल्यानंतर पीओपी मूर्तींची विटंबना होते. तसेच पीओपी आणि केमिकल मिश्रीत रंगांमुळे जलप्रदुषणातही भर पडते. याविरोधात 30 ऑगस्ट २०२४ रोजी पर्यावरणवादी रोहित जोशी आणि काही मूर्तिकारांनी याचिका दाखल केली आहे.

# मोदी सरकारला ११ वर्षे पूर्ण

नवी दिल्ली, दि. ९ वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्ता स्विकारून आता ११वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त मोदींनी ट्विटमधून विविध गोष्टींची माहिती दिली आहे. त्यांनी शेअर केलेल्या लिंकमधून त्यांनी सध्याच्या केंद्रीय मंत्रीमंडळातील ६० टक्के मंत्री हे एससी, एसटी, ओबीसी प्रवर्गातून आल्याचे म्हटले आहे. हे देशाच्या इतिहासात मंत्रिमंडळात या वंचित गटांचे सर्वाधिक प्रतिनिधित्व असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. काँग्रेससारख्या विरोधी पक्षांकडून सरकारवर या घटकांच्या हिताविरुद्ध काम करत असल्याचा आरोपावर मोदींनी ही माहिती दिली आहे. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी देखील ट्विटमध्ये मोदी सरकारची ११ वर्षे हा सुवर्णकाळ असल्याचे म्हटले आहे. देशाला प्रत्येक क्षेत्रात नंबर वन करण्याचे लक्ष्य असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.



एक्स वरील पोस्टमध्ये पंतप्रधान मोदी म्हणाले की, ११ वर्षांच्या कार्यकाळात भारताने केवळ जगातील सर्वात वेगाने विकसित होणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून स्थान मिळवले नाही, तर हवामान बदल आणि डिजिटल नवोपक्रम यांसारख्या महत्त्वाच्या जागतिक मुद्द्यांवरही महत्वाची कामगिरी केल्याचे म्हटले आहे. गुड गव्हर्नन्स आणि परिवर्तन यावर स्पष्ट लक्ष केंद्रित केले आहे. १४० कोटी भारतीयांच्या आशीर्वादाने आणि सामूहिक सहभागाने भारताने विविध क्षेत्रांत वेगवान परिवर्तन अनुभवले आहे. "सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास" या तत्त्वावर मार्गक्रमण करत एनडीए सरकारने वेग, प्रमाण आणि संवेदनशीलतेसह क्रांतिकारी बदल केले असल्याचे त्यांनी सांगितले. आर्थिक प्रगतीपासून सामाजिक उत्थानापर्यंत, लोककेंद्रित आणि सर्वांगीण प्रगतीवर लक्ष केंद्रित केल्याचे ते म्हणाले.

पंतप्रधान म्हणाले, "आपल्या सामूहिक यशाचा आम्हाला अभिमान आहे, पण त्याच वेळी आपण आशा, आत्मविश्वास आणि विकसित भारत घडवण्याच्या नव्या निर्धाराने पुढे पाहतो आहोत. त्यांनी "११ वर्षे सेवा" हा हॅशटॅग वापरत वेगवेगळ्या क्षेत्रांत घडवलेल्या बदलांची माहिती देणारे दुवे शेअर केले.

# पक्षाच्या प्रवक्त्यांनी जपून वक्तव्य करावे - खा. सुनील तटकरे

मुंबई, दि. ९ प्रतिनिधी

काँग्रेसमध्ये संभाव्य एकत्रीकरणाच्या चर्चांना अलीकडेच प्रवक्ते अमोल मिटकरी यांच्या 'पांडुरंगाच्या इच्छेने एकत्र येऊ' या विधानामुळे गती मिळाली होती. मात्र, हे विधान पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना फारसे पचनी पडले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी थेट इशारा देत मिटकरींना बोलताना जपून बोलण्याचा सल्ला दिला आहे.



सुनील तटकरे यांनी सांगितले, अमोल मिटकरींना सल्ला आहे की त्यांनी वक्तव्य जपून करावे. ते पक्षाचे प्रवक्ते आहेत. त्यामुळे पक्षाची भूमिका एकदा मांडल्यानंतर पुन्हा त्यावर बोलण्याची गरज नाही, असे तटकरे यांनी ठणकावून सांगितले. आम्ही राज्यात महायुतीत आहोत. देशात एनडीएत आहोत. हा आमचा ठाम निर्णय आहे आणि त्यात जराही बदल होणार नाही.

एनडीएमध्ये जाण्याचा निर्णय कुणा एकट्याने घेतलेला नसल्याचेही तटकरे यांनी स्पष्ट केले. अजितदादा, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, दिलीप वळसे पाटील आणि मी, आम्ही सगळ्यांनी मिळून एकमताने हा निर्णय घेतला. राज्यातील जनतेने आमच्यावर विश्वास दाखवला आहे, असे तटकरे म्हणाले.

# केरळच्या किनाऱ्याजवळ सिंगापूरच्या जहाजावर शक्तिशाली स्फोट

कोची, दि. ९ वृत्तसंस्था



केरळच्या किनाऱ्याजवळ सोमवारी सकाळी सिंगापूर ध्वजाखालील मालवाहू जहाज MV Wan Hai 503 वर एक भीषण स्फोट झाला. हे जहाज कोलंबो (श्रीलंका) येथून ७ जून रोजी निघाले होते आणि १० जून रोजी मुंबईत पोहोचण्याचे नियोजन होते, अशी माहिती संरक्षण जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिली आहे. या जहाजातील चार क्रू मेंबर बेपत्ता आहेत. तर ५ क्रू मेंबर जखमी झाल्याचे समोर आले आहे. या मालवाहू जगाजावर एकूण २२ क्रू मेंबर्स होते, अशी माहिती समोर आली आहे.

सुमारे २७० मीटर लांब व १२.५ मीटर खोल असलेले हे कंटेनर जहाज केरळच्या समुद्रकिनाऱ्याजवळ असताना सकाळी १०.३० वाजता जहाजाच्या अंतर्गत भागात स्फोट झाला. या स्फोटाची माहिती मुंबई येथील मेरिटाईम ऑपरेशन्स सेन्टर ने कोचीतील त्यांच्या समकक्ष केंद्राला दिली. या घटनेनंतर, भारतीय नौदलाने तात्काळ आयएनएस सुरत या युद्धनौकेला कोचीला जाण्याऐवजी स्फोटग्रस्त जहाजाच्या दिशेने वळवले. पश्चिम नौदल कमांडने सकाळी ११वाजता हा आदेश दिला. तसेच, कोची येथील आयएनएस गरुडा या नौदल विमानतळावरून एक विमान पाठवण्याचीही तयारी सुरू करण्यात आली , जेणेकरून हवेतून परिस्थितीचे आकलन करता येईल व आवश्यक मदत समन्वय साधता येईल. या स्फोटात जिवीतहानीबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. नौदलाकडून मदतकार्य सुरू असून जहाजाच्या चालक व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्व उपाययोजना केली जात आहे.

महासागर

पालघर

मंगळवार, १० जून २०२५

# सीमा भागात दारु तस्करी सुरुच; 11 लाखांची दारु जप्त

**तलासरी, दि. ९ : प्रतिनिधी**



तलासरी पोलिसांनी बोलेरो पिकअप गाडीतून ११ लाखांहून अधिक किंमतीची विदेशी बनावट दारु जप्त केली आहे. यावेळी अटक करण्यात आलेला आरोपी नालासोपाऱ्यातील रहिवासी आहे. गुजरात राज्यात दारूबंदी असली तरी सीमेलगतच्या भागांतून विशेषतः केंद्रशासित प्रदेशातून अवैध दारूचा प्रवाह अनिर्बंध सुरूच आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्ग हा या वाहतुकीसाठी महत्त्वाचा मार्ग बनलेला आहे. हा मार्ग पोलिसांच्या लक्षात असूनही, अशा प्रकारची तस्करी नियमितपणे सुरुच असल्याचे दिसून येते. दारु तस्करीत अनेक टोळ्या, दलालांचा सहभाग असून विविध सरकारी विभागाच्या छुप्या पाठिंब्याशिवाय दारु तस्करी होऊच शकत नाही. ही साखळी अभेद्य असल्यानेच तस्करी बिनभोबाट सुरु असल्याचे जाणकारांचे मत आहे.

# वसई पुरवठा विभाग खासगी कर्मचाऱ्यांच्या हाती; सर्वसामान्य कार्डधारक त्रस्त

**वसई, दि. ९ : प्रतिनिधी**




वसई तहसीलदार कार्यालयातील पुरवठा विभागात खासगी कर्मचारी मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. खासगी कर्मचारी पैसे देणाऱ्यांची तसेच दलालांची कामे त्वरित करत असून सर्वसामान्य कार्डधारकांना वेठीस धरत असल्यामुळे सर्वसामान्य रेशन कार्डधारक त्रस्त झाले आहेत. दलालांची कामे करणारा खासगी कर्मचारी अभिषेक घरत याची हकालपट्टी करण्याची मागणी भारतीय जनता पार्टी वसई रोड मंडळ अध्यक्ष महेश सरवणकर यांनी वसईचे तहसीलदार अविनाश कोष्टी यांच्याकडे केली आहे.

वसई तहसीलदार कार्यालयातील पुरवठा विभागात अनागोंदी कारभार सुरू असून पुरवठा अधिकारी भागवत सोनार यांच्या खास मर्जीतला खासगी कर्मचारी अभिषेक घरत याने संपूर्ण पुरवठा विभागाचा ताबा घेतला आहे. अभिषेक घरत ठराविक दलालांची कामे करत आहे. पुरवठा विभागाचा लॉगिन आयडी अभिषेक घरत हॅण्डल करत असल्यामुळे पैसे देणाऱ्या दलालांचे काम अभिषेक घरत करत आहे. मात्र सर्वसामान्य रेशनकार्डधारकांना रेशनकार्ड ऑनलाईन करण्यासाठी पुरवठा विभागाच्या फेरी माराव्या लागत आहेत, अशी सरवणकर यांची तक्रार आहे.

पुरवठा विभागाच्या बाहेर लावण्यात आलेली ऑनलाईनची लिंक ओपन होत नाही. ओपन झाली तर पुढे सरकत नाही. बारकोड स्कॅन करून देखील सर्वसामान्य नागरिकांचे रेशनकार्ड ऑनलाईन होत नाही. त्यामुळे सर्वसामान्य कार्डधारक त्रस्त आहेत. मात्र, अभिषेक घरत ठराविक महा-ई-सेवा केंद्राच्या तसेच दलालांचे मार्फत आलेल्या अर्जांवर तत्काळ कारवाई करून रेशनकार्ड ऑनलाईन करत आहे. सर्वसामान्य रेशनकार्डधारकांना त्रास देणाऱ्या तथा दलालांची कामे करणाऱ्या खासगी कर्मचारी अभिषेक घरत याची तत्काळ हकालपट्टी करण्याची मागणी महेश सरवणकर यांनी केली आहे.

## सदनिकेच्या नावाखाली फसवणूक; गुन्हा दाखल

**वसई, दि. ९ : प्रतिनिधी**

सदनिका विकत देण्यासाठी करारनामा करून साडेसात लाख रुपये घेतल्यानंतर एका महिलेची फसवणुक केल्याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात दोन जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खुशबू सन्नी ठाकूर यांनी विरार पूर्वेकडील गुरुदत्त नगरमधील कैलाश बिल्डींगमध्ये दोन सदनिका विकत घेण्यासाठी निर्माण उमेश सिंह आणि मुन्ना कैलाश झा यांना साडेसात लाख रुपये ३० मे २०२२ रोजी दिले होते. त्यावेळी निर्माण सिंह आणि मुन्ना झा यांनी नोटरी करारनामा करून दिला होता. मात्र, त्यानंतर रुम देण्यास टाळाटाळ होत असल्याने खुशबून ठाकूर यांनी तक्रार दिल्यावर विरार पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

## तोतया पोलिसांकडून फसवणूक

**वसई, दि. ९ : प्रतिनिधी**

पोलीस असल्याची बतावणी करून नोकरीचे आमिष दाखवून एका महिलेला एक लाख २३ हजार रुपयांचा गंडा घातल्याचे उजेडात आला आहे. याप्रकरणी वसई पोलीस ठाण्यात तोतया पोलीस निखिल खाडेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निखिल खाडे यांनी स्वतः पोलीस असल्याची बतावणी करत नायगावच्या कोळीवाड्यात राहणाऱ्या प्रतिक्षा कोळी (२४) हिच्यासह तिच्या मैत्रीणीला नोकरी लावतो, असे आमिष दाखवले होते. त्यानंतर दोघींकडून निखिलने एक लाख २३ हजार रुपये उकळले होते. मात्र, आपली फसवणुक झाल्याचे लक्षात आल्यावर प्रतिक्षा कोळी यांनी तक्रार दिल्यावर वसई पोलीस ठाण्यात निखिल खाडेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## माजी नगरसेविकेला 66 लाखांचा गंडा

**भाईंदर, दि. ९ : प्रतिनिधी**

मीरा भाईंदर महापालिकेच्या माजी नगरसेविकेला व्यवसायाला गुंतवणूक केल्यास जादा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून ६६ लाख रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार उजेडात आला आहे. मीरारोडमधील पूनम व्हॅली येथे राहणाऱ्या निरज खंडेलवाल याइसमाने स्वतःला व्यावसायिक असल्याचे भासवून माजी नगरसेविका हेमा राजेश बेलानी यांना व्यवसायात गुंतवणूक केल्यास जादा परतावा देऊ असे सांगितले होते. याभूलथापांना बळी पडून हेमा बेलानी यांनी गुंतवणूक केली होती. पहिल्यांदा गुंतवणूक केलेल्या रकमेवर निरजने नियमित परतावा देत हेमा बेलानी यांचा विश्वास संपादन केला होता. परतावा मिळत असल्याने हेमा बेलानी यांनी थोडी थोडी रक्कम करत तब्बल ६६ लाख रुपये निरज खंडेलवाल याला दिले होते. मात्र, काही महिन्यातच निरजने परतावा देण्याचे बंद केले. तसेच पैसे परत करण्यासही टाळाटाळ करू लागला. आपली फसवणुक झाल्याचे लक्षात आल्यावर हेमा बेलानी यांनी तक्रार दिल्यावर मीरा रोड पोलीस ठाण्यात निरज खंडेलवालविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शेअर बाजारात गुंतवणूकीच्या नावाखाली 36 लाखांची फसवणूक

**वसई, दि. ९ : प्रतिनिधी**

शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका महिलेला ३६ लाख ८६ हजार रुपयांचा गंडा घातल्याप्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात तीन जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निलेश धुरी, अतुल कुलकर्णी आणि यश चावरीया अशी त्यांची नावे आहेत. सीमा गुप्ता यामहिलेला यातिघांनी शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळवून देऊ, अशी बतावणी करत त्यांच्याकडून ३६ लाख ८६ हजार रुपये उकळले होते. मात्र, दोन वर्षे उलटून गेल्यानंतरही काही पदरात न पडल्याने फसवणुक झाल्याचे लक्षात आलेल्या सीमा गुप्ता यांनी तक्रार दिल्यानंतर नालासोपारा पोलीस ठाण्यात निलेश धुरी, अतुल कुलकर्णी आणि यश चावरीया यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पालघरमध्ये लाखोंचे अमली पदार्थ जप्त

**पालघर, दि. ९ : प्रतिनिधी**

पालघर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पालघर-बोईसर परिसरात विविध ठिकाणी पेट्रोलिंग करून सहा जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून तीन लाख रुपयांचा गांजा, ५ हजार ७०० रुपयांचे एमडी अमली पदार्थ यांच्यासह ९ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याकारवाईत पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली असून पालघर पोलीस ठाण्यात दोन तर पालघर पोलीस ठाण्यात एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिक्षक यतिश देशमुख, अपर पोलीस अधिक्षक विनायक नरळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदिप पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल व्हटकर, पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील देसाई, गोरखनाथ राठोड, हवालदार दिपक राऊत, संदीप सुर्यवंशी, संदीप सरदार, राकेश पाटील, भगवान आव्हाड, दिनेश गायकवाड, कैलास पाटील, कपिल नेमाडे, भारती पाटील, कल्याण केंगार, प्रशांत निकम, वैभव जामकर यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# घराचे अनधिकृत बांधकाम बंद केल्याच्या रागातून उपसरपंचास धमकी

**वाडा, दि. ९ : प्रतिनिधी**

तालुक्यातील सोनाळे ग्रामपंचायत हद्दीतील घराचे अनधिकृत बांधकाम नोटीस देऊन बंद केल्याच्या रागातून सोनाळे ग्रामपंचायतीचे उपसरपंच सचिन तिखंडे यांना मोबाईल वरून धमकी दिल्याप्रकरणी आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल गोरे, कल्पेश कोर अशी आरोपींची नावे आहेत. सोनाळे ग्रामपंचायत हद्दीत अजय कुमार चोखणी यांचे घर बांधणीचे काम सुरू केले होते. सदरचे काम अनधिकृत असल्याने ग्रामपंचायतीने हे काम नोटीस देऊन बंद केले होते.याचा राग मनात धरून आरोपींनी उपसरपंच सचिन तिखंडे यांना दूरध्वनीवरून तु आमचे साईटवरचे काम का बंद केले. तुमचा त्याच्याशी काही संबंध येत नाही. तु उद्या तेथे ये तुला बघून घेतो असे बोलून धमकी दिली. याबाबत वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस नाईक जी एल मोंढे करीत आहेत. दरम्यान या धमकीचा उपसरपंच संघटनेने निषेध केला असून आरोपींवर कडक कारवाई करण्याचे मागणी केली आहे.

# जिप शाळा इमारतींचा कायापालट



**मोखाडा, दि. ९ : प्रतिनिधी**

मोखाडा तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळाच्या इमारतीची अवस्था दयनीय आहे. यावर दरवर्षी दुरुस्त्या देखील मोठ्या प्रमाणात केल्या जातात. मात्र नुसतीच दुरुस्ती न करता या शाळांचे थेट रुपडे पालटण्याचे काम स्पार्क फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थाकडून केले गेले आहे.

आदर्श शाळा प्रकल्पाअंतर्गत हे काम करण्यात आले असून आता जेव्हा या शाळा भरल्या जातील तेंव्हा विद्यार्थ्यांसाठी ही बदललेली शाळांची इमारत एक आश्चर्याचा धक्का असणार आहे. कारण अतिशय सुंदर रंगरंगोटी, छत बदलेले, बांधकाम दुरुस्ती, नवीन फरशी आदी सर्व कामे करून या शाळांना एकदम स्मार्ट लुक देण्यात आला असून अगदी खासगी शाळे प्रमाणे या शाळा दिसून येत आहेत.

यावेळी खोडाळा विभागातील हट्टीपाडा,सप्रेवाडी व करोळ या तीन शाळांच्या वर्गखोल्यांचे सर्वंकष नूतनीकरण करण्यात आले.

करोळ शाळेच्या स्वयंपाकघराचे देखील नूतनीकरण झाल्याने मध्यान्ह भोजन कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.शाळा समस्यामुक्त झाल्याने सुमारे 300 विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. त्यामुळे परिसरातील ग्रामस्थ व शिक्षक समाधान व्यक्त करत आहेत. तर स्पार्क फाऊंडेशनचे देखील शिक्षण विभाग आणि ग्रामस्थांनी आभार मानले आहेत.

# सामान्य जनतेची सत्ता जाता कामा नये-ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे

**वसई, दि. ९ : प्रतिनिधी**

भारत हा देश कोणत्या एका पक्षाचा, जातीचा, धर्माचा नाही तर तेथे राहणाऱ्या सर्व नागरिकांचा आहे. सर्वांना संविधाने दिलेल्या अधिकारातून बोलण्याचा व व्यक्त होण्याचा हक्क आहे. देशात व राज्यात सत्ता कोणत्याही पक्षाची येवो किंवा जावो पण सामान्य जनतेची सत्ता मात्र कधीच जाता कामा नये, असे परखड मत ज्येष्ठ पत्रकार संपादक संजय आवटे यांनी वसई येथे बोलताना व्यक्त केले.

ज्येष्ठ समाजवादी नेते वसईचे माजी आमदार प्रा. स गो वर्टीसरांच्या जंयती निमित्ताने स.गो. वर्टी फाउंडेशन आयोजित व्याख्यानसभेत संजय आवटे आजची सामाजिक व राजकीय स्थिती या विषयावर न्यू इंग्लिश स्कूल, वसई येथे बोलत होते. त्यांनी सध्याच्या राजकीय व सामाजिक स्थितीवर चौफेर विचार मांडले.

भारत देशाला सध्या युद्धाची नाही तर गांधीं व बुद्धाच्या विचाराची गरज आहे. जाती व धर्माच्या मुद्द्यावर खोटे नेरेटिव्ह पसरविले जात आहे. मन की बात करत असताना संविधानाचीही बात ही झाली पाहिजे. धर्माच्या संकल्पनेवर देश टिकत नाही हे पाकिस्तान व अफगाणिस्तानातील देशाच्या परिस्थितीने सिद्ध झाले आहे. सध्या आपल्या देशात संविधानाची पायमल्ली संविधानिक मार्गानेच सुरू आहे. म्हणून आपल्या देशाला सांस्कृतिक राजकारणाची गरज आहे. ही गरज राष्ट्रसेवा दल व समाजवादी परिवार जनसंघटनाने भरून काढावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमाची प्रस्तावना वर्टीसर फाउंडेशनच्या अध्यक्षा जयश्री सामंत यांनी केले. वर्टीसराच्या कार्याचा गौरव करून वर्टीसर व त्यांच्या विचारांना जिवंत ठेवण्यासाठी फाऊंडेशन नेहमी कार्यरत राहील अशी ग्वाही त्यांनी दिली. त्याचप्रमाणे आजपर्यंत ट्रस्टने केलेल्या सत्कार आणि पुरस्कार दिलेल्या व्यक्तींचा उल्लेख केला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्र सेवा दल सैनिकांनी, राष्ट्रसेवा दल प्रार्थना गीताने झाली. पाहुण्यांची ओळख व स्वागत कुमार राऊत, सूत्रसंचलन केलीस ब्रास तर उपस्थितीतांचे आभार पायस मच्याडो ह्यांनी मानले. कार्यक्रमाला वसईतील सिसिलिया करवालो, अशोक कुलास, शोभा बागुल, जॉन परेरा, जगदीश राऊत,आशय राऊत व विविध पक्ष, संघटना व संस्थांचे मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अर्नाळा किल्ल्याला अभ्यास भटकंतीने मानवंदना

**वसई, दि. ९ : प्रतिनिधी**



किल्ले वसई मोहीम परिवार अंतर्गत जंजिरे अर्नाळा २८८ व्या स्मरणदिनाचे आयोजन करण्यात आलेले होते. जंजिरे अर्नाळा किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर सकाळी ८ ते दुपारी २.०० वेळेत आयोजित उपक्रमात एकूण २१ दुर्गमित्र सहभागी झालेले होते. किल्ले वसई मोहीम परिवार अंतर्गत गेली अनेक वर्षे जंजिरे अर्नाळा स्मरण दिनानिमित्त विविध उपक्रमांनी किल्ल्यास मानवंदना देण्यात येते. दरवर्षीप्रमाणे इतिहास अभ्यासक श्रीदत्त नंदकुमार राऊत यांची विशेष जंजिरे अर्नाळा इतिहास मार्गदर्शन सफर संपन्न झाली.

या मोहिमेत समग्र जंजिरे अर्नाळा किल्ला वास्तुविशेष अभ्यास भटकंती मार्गदर्शन, गडदेवता पूजन व दर्या पूजन, जंजिरे अर्नाळा आरमार मानवंदना, जंजिरे अर्नाळा ऐतिहासिक संदर्भ प्रकाशन, किल्ले वसई मोहीम विशेष सन्मान, मान्यवरांचे मनोगत व मार्गदर्शन, इतिहास मार्गदर्शन सफर, श्री त्रंबकेश्वर महादेव पूजन, जंजिरे अर्नाळा संवर्धन आवश्यकता, जंजिरे अर्नाळा भगवे ध्वज मानवंदना, जंजिरे अर्नाळा विशेष संशोधन मार्गदर्शन, किल्ल्यातील पीर दर्गा कागदपत्रे मातृश्री राधाबाई उल्लेख प्रकाशन, श्री आदिशक्ती भवानी कालिका मंदिर इतिहास मार्गदर्शन, पोर्तुगीजकालीन नकाशे तपशील इत्यादी उपक्रम पूर्ण करण्यात आले. आजच्या संशोधनपर सत्रात श्री भवानी देवी उगम कथा, श्री हनुमंत कथा, वसईची मोहिम, गडावरील पाणी व्यवस्थापन निर्मिती, बुरुजांची बदलती नावे, जेट्टी व इतर बांधकामे, चौकी व बुरुज नामावली, गडावरील लुप्त अष्टविनायक, आरमार बेलोसे योगदान, गडावरील तारखाने शौचकुपे, कोठी व इतर दालने, पेशवेकालीन धर्मादाय उल्लेख इत्यादी विषयावर राऊत यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. सदर दिनाचे औचित्य साधून किल्ले वसई मोहिमेचे प्रमुख व इतिहास अभ्यासक श्रीदत्त नंदकुमार राऊत यांची २७७ वी इतिहास मार्गदर्शन सफर ही दुर्गमित्रांसाठी विशेष ज्ञानवर्धक पर्वणीच ठरली.

इतिहास अभ्यासक श्रीदत्त राऊत यांच्या मते "इतिहास मार्गदर्शन, संकलन, संवर्धन, संशोधन या सर्वच माध्यमातून जंजिरे अर्नाळा बोलका होऊन पुढील पिढीला मार्गदर्शन करणे आवश्यक आहे." किल्ले वसई मोहिमेचे दुर्गमित्र भरत पाटील राई यांच्या मते "जंजिरे अर्नाळा किल्ल्यावर संशोधन माध्यमातून प्रसिद्ध होणारे सर्वच नवीन संशोधन पैलू वेळोवेळी समस्त दुर्गमित्रांना मार्गदर्शक होत आहेत. आज दिवसभर मार्गदर्शन करण्यात आलेल्या नव्या कथा व घटना प्रसंग चिरंतर स्मरणात राहतील.

# नुकसानग्रस्तासाठी 2 कोटी 70 लाखाचा निधी मंजूर

## पालकमंत्री गणेश नाईक यांच्या प्रयत्नांना यश

**पालघर, दि. ९ : प्रतिनिधी**

अवकाळी पावसामुळे पालघर जिल्ह्यातील घरे ,शेती फळशेती, मत्स्य उत्पादने, पशु इत्यादीचे नुकसान झाल्यामुळे वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी मंत्रिमंडळ बैठकीमध्ये नुकसान ग्रस्तासाठी निधीची आग्रही मागणी करून 2 कोटी 70 लाखाचा निधी मंजूर करून घेतला आहे.

पालघर जिल्ह्यात आलेल्या अवकाळी पावसासह वादळी वाऱ्यांमुळे एप्रिल आणि मे २०२५ महिन्यांत मोठ्या प्रमाणावर घरांची पडझड झाली. ४ ते ६ एप्रिल, ६ व ७ मे आणि २३ ते २५ मे २०२५ या कालावधीमध्ये जिल्ह्यात एकूण 38 घरे पूर्णतः तर 3 हजार 852 घरे अंशतः बाधित झाली आहेत. याशिवाय 10 झोपड्या पूर्णतः नष्ट झाल्या असून 6 गोठ्यांचेही नुकसान झाले आहे.

या आपत्तीग्रस्तांसाठी शासनाच्या महसूल व वन विभागाकडून रु. २ कोटी ५० लाख ६३ हजार ९२५ इतक्या निधीची मागणी करण्यात आली होती. यासंदर्भात दि. २ जून २०२५ रोजी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. या बैठकीत प्रस्तावाची सविस्तर माहिती घेऊन पालकमंत्री गणेश नाईक यांनी मंत्रिमंडळ बैठकीत हा मुद्दा मांडला. मुख्यमंत्री यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तात्काळ निधी वितरित करण्याचे निर्देश दिले.



यानुसार विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांचेमार्फत रु.२ कोटी ७० लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला असून तो संबंधित तहसिलदारांमार्फत बाधितांना वितरित करण्याचे काम सुरू आहे. या आपत्तीमुळे जिल्ह्यातील अनेक कुटुंबे उघड्यावर आली असून, शासनाकडून मिळणारी ही आर्थिक मदत त्यांच्या पुनर्वसनासाठी दिलासादायक ठरणार आहे. असे जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी सांगितले.

या अवकाळी पावसासह वादळी वाऱ्यामुळे दि. 4 व 5 एप्रिल 2025 रोजी पूर्णतः नष्ट झालेली घरे 1, अंशत: नुकसान झालेली घरे-339, नष्ट झालेल्या झोपड्या-1, नुकसान झालेले गोठे-3 एकूण निधी रु. 18 लाख 94 हजार 230 आणि दि. 6 ते 8 मे, 2025 पूर्णतः नष्ट झालेली घरे 3, अंशत: नुकसान झालेली घरे-2120, नष्ट झालेल्या झोपड्या-4, एकूण निधी रु. 1 कोटी 20 लाख 15 हजार 195, तसेच दि. 23 ते 25 मे, 2025 रोजी पूर्णतः नष्ट झालेली घरे 34, अंशत: नुकसान झालेली घरे-1393, नष्ट झालेल्या झोपड्या-5, नुकसान झालेले गोठे-3 एकूण निधी रु. 1 कोटी 11 लाख 54 हजार 500 असा आहे. जिल्ह्यात नुकसान झालेल्या कालावधी एकूण पूर्णत: नष्ट झालेली घरे 38 , अंशत: नुकसान झालेली घरे 3852, नष्ट झालेला झोपड्या 10, नुकसान झालेले गोठे 6 यासाठी आवश्यक निधी 2 कोटी 50 लाख 63 हजार 925 रुपये इतका आहे.

# आमदार स्नेहा दुबे यांच्या निधीतील विकासकामांचे भूमीपूजन

**वसई, दि. ९ : प्रतिनिधी**




आमदार स्नेहा दुबे-पंडित यांच्या स्थानिक विकास निधी व नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत वसई विधानसभेतील विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. या भूमिपूजनामध्ये मुख्यत्वे करून अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण, डांबरीकरण, गटार दुरुस्ती आणि इतर पायाभूत सुविधांची कामे यांचा समावेश आहे. ही कामे वसईच्या सर्वांगीण विकासाची दिशा निश्चित करणारी आहेत.

वसई पश्चिम मंडळातील काही प्रमुख विकास कामे: १)नवापूर नाका ते मंथन रिसॉर्ट रस्ता. २) मंथन रिसॉर्ट ते स्मशानभूमी रस्ता. ३)फॉर्म व्ह्यु हॉटेल ते गोपचार गाव रस्ता. ४)बेथेल ते उमेश पाटील घर रस्ता. ५)सिल्कोस व्हिला ते प्रकाश पाटील घर रस्ता. ६) सचिन वझे घर ते क्षेत्रपाल मंदिर रस्ता. वसई शहर मंडळातील महत्त्वाची कामे: ६)साईबाबा मंदिर ते टोकपाडा अंतर्गत रस्ता. ७)नवपाडा गटार दुरुस्ती व बांधकाम. ८)भडाळे पाडा अंतर्गत रस्ता. ९)एम.जी. परुळेकर शाळेसमोरील रस्ता. १०)शांतीवन ते चिंचपाडा डांबरीकरण. ११) एम एस अपार्टमेंट ते न्यू पुष्पक अपार्टमेंट. १२)लूड्स पार्क ते चेलसा अपार्टमेंट रस्ते सुधारणा.

या भूमिपूजन सोहळयाला भाजपा वसई विरार जिल्हा अध्यक्षा प्रज्ञा पाटील, महेंद्र पाटील, रामदास मेहेर, वसई पश्चिम मंडळ अध्यक्ष आशिष सुरेश जोशी, वसई शहर मंडळ अध्यक्षा गीतांजली दरिवाला, कपिल म्हात्रे, भूपेश राऊत, नंदकुमार महाजन, उत्तम कुमार, अपर्णा पाटील, मयुर नाईक, सिद्धेश तावडे, आशा चव्हाण, विजय पाटील, देवदत्त मेहेर, राजल नाईक, निशा फाटक, कल्पेश नाईक,विजेता सुर्वे, युगा वर्तक, रुशल म्हात्रे, कल्पेश नाईक, मनमित राऊत, प्रतिक चौधरी, हरीश बेदी यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनीही या उपक्रमाला उस्फूर्त प्रतिसाद दिला. या सर्व कामांमुळे वसईतील रस्त्यांची सुधारणा, वाहतुकीची सुलभता आणि नागरी सुविधा अधिक सक्षम होतील,असा विश्वास स्थानिक वसईकर नागरिकांनी व्यक्त केला.

कुळगांव बदलापूर नगरपरिषद

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.

ईमेल:- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in. वेबसाईट:- https://kbmc.gov.in

**जा.क्र : कुबनप/श. स्व.वि/४४/२०२५-२६ दिनांक:- ०६/०६/२०२५**

**चौथी मागणी फेर निविदा सुचना**

कुळगाव बदलापूर नगरपरिषदेची नवीन प्रशासकीय इमारत व आवश्यकतेनुसार नगरपरिषदेच्या मालकीच्या मालमत्तामधील दैनदिन साफसफाईचे काम बाह्य यंत्रणेद्वारे करणे या कामाची निविदा निविदा फॉर्म दिनांक १०/०६/२०२५ ते दिनांक १७/०६/२०२५ पर्यंत ई-टेंडरिंग (E-tendering) संगणक प्रणालीच्या कुबनप संकेतस्थळावर http://mahatenders.gov.inप्राप्त होतील. निविदा फॉर्म फी व निविदा अनामत फी ऑनलाईन भरणेचे आहे. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध होईल. निविदेचे सादरीकरण दिनांक १७/०६/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर online सादर करणेचे आहे.

सही/-
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

# समाज सुधारण्याची संधी देऊन 'वैष्णवी' कायमची गेली!
# आता तरी मराठा समाजाने सुधारणा करावी

**सर्वच समाजाला व विशेषतः मराठा समाजाला सुधारण्याची जणू एकप्रकारची संधी देऊन 'वैष्णवी' आपल्यातून कायमची निघून गेली. पुण्यातील वैष्णवी हागवणेला तिच्या आई वडिलांनी हुंडा म्हणून दिलेले ५१ तोळे सोनं, चांदीची भांडी, फॉर्च्युनरसारखी आलिशान गाडी अशा अनेक गोष्टी हुंडा म्हणून दिल्यानंतरही तिचे प्राण वाचू शकले नाही. इतकं सगळं दिल्यानंतर देखील तिच्या पतीची लालसा वाढतच होती. वैष्णवीचे वडिल अनिल कस्पटे यांच्याकडे दोन कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती, पण त्यांनी पैसे न दिल्याने हागवणे कुटुंबाने वैष्णवीचा शारीरिक आणि मानसिक छळ वाढवला. सनीज वर्ल्ड या ठिकाणी लग्न करुन देण्याच्या बोलीवर मुलीशी लग्न करुन दिलं होतं. पण हे सर्व काहीच कामी आले नाही. आता वैष्णवीची सासु लता हागवणे, नणंद करीश्मा हागवणे, सासरे राजेंद्र हागवणे, दिर सुशील हागवणे सर्वजण तुरुंगाची हवा चाखत आहे. पण प्रश्न असा पडतो की, हुंड्यात दिलेला पैसा मुलीच्या कधी कामात येतो का? तर नाही ! परंतु मुलीला तिच्या पायावर उभी करण्यासाठी, आई वडीलांनी केलेला खर्च नक्कीच तिला एक मजबुत भविष्य देते. आज प्रत्येक मुलीला व तिच्या आई वडीलांना वाटत की, आपली मुलगी मोठ्या घरात किंवा पैसेवाल्यांच्या घरात दिली तर ती सुखी होईल. पण ते तसं काही नसतं. तुमच्या मुलीला चांगलं शिकवा. तिला तिच्या पायावर उभे करा आणि नंतरच तिचे लग्न करा. जेणे करून भविष्यात वाईट प्रसंगी, तिने कोणाच्या पुढे हात पसरायला नको; सर्वात महत्वाचं म्हणजे, तिच लग्न जमवताना समोरचा परीवार पैशाने श्रीमंत नसला तरी चालेल. पण शिक्षणाने व मनाने मात्र तो खुप श्रीमंत पाहीजे. विवाहाला जीवनातील सोळा संस्कारा पैकी एक पवित्र संस्कार म्हटले आहे. परंतु नवीन पिढी वेगळ्या दिशेने जात असून विवाहसोहळ्याला विकृत स्वरूप येत आहे. प्री वेडींग पासून तर मोठ्या आवाजातील डीजे व त्यावर अनेक तास तरुण मुले व मुली, महिला नाचतात. त्यामुळे लग्न दोन ते तीन तास उशिरा लागते. नाचणारी मंडळी कुणाचेही ऐकत नाही. त्यावरून विनाकारण वाद होतात. परिसरात राहणा?या लोकांना त्रास होतो. काही लोक केवळ आपले वैभव दाखविण्यासाठी लग्नामध्ये पालखी, भालदार, चोपदार, तुता?या असे अनेक प्रकार त्यानंतर पुढा?यांचे सत्कार, भाषणे अश्या अनेक चुकीच्या प्रथा एकमेकाचे पाहून चालू झाल्या आहे. मध्यम व गरीब लोकांना त्यांची ऐपत नसतांना सुद्धा बरोबरी करायची म्हणून प्रसंगी मुलीच्या वडिलांना कर्ज काढावे लागते. हा सर्व प्रकार आता कुठेतरी थांबला पाहिजे. मराठा समाज संपूर्ण महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर सुद्धा पसरला आहे. पुणे, नगर, नाशिक, सातारा सारख्या अनेक ठिकाणी समाजातील जाणत्या जेष्ठ, श्रेष्ठ लोकांनी यावर विचार करून मिटींगा घेऊन विवाह सोहळ्याची आदर्श विवाह आचार संहिता तयार केली पाहीजे. ज्या महिलेचा सासरच्यांकडून छळ होत असेल, त्यावेळी तिच्या माहेरचे लोक ठामपणे तिच्यापाठीशी उभे राहतील, अशी व्यवस्था होणे गरजेचे आहे. कोणत्याही प्रकारचे ओंगळवाणे प्रदर्शन न मांडता विवाह सोहळे साधेपणाने आणि वेळेवर केले जातील, तसेच मानपानाचे सामाजिक प्रदर्शन केले जाणार नाही, अशी व्यवस्था तयार झाली पाहीजे.**



सध्या जे संकट मराठा समाजाच्या संदर्भात प्रामुख्याने हुंडा देणे, सोनं चांदी देणे, मोठमोठ्या गाड्या देणे, अवाजवी खर्च करून लाखो रुपए लग्न कार्यात अक्षरशः वाया घालवले जातात. लग्न संस्कार जो आजकाल इव्हेंट झाला आहे.

अन्नाची नासधूस, त्यासोबत मानपान, मोठी वाद्ये अशी अनेक महागडी दर्शने लग्नात घडवली जातात. वेळेत विवाह लागत नाही. समाजातील गरीब कुटुंबातील मुलांना मुली दिल्या जातं नाही, मिळत नाही. अश्या कितीतरी मोठ्या संकटात मराठा समाज आहे.

एकीकडे आरक्षण नाही, दुसरीकडे नैसर्गिक अवकाळी संकट. मुलांची मुलींची शिक्षणे, नापिकी, मातीमोल शेतीमाल भाव, जमिनीचे होणारे तुकडे, शिकलेल्या मुलांना नोकऱ्या नाहीत, अश्या अनेक संकटाला मराठा समाज तोंड देत आहे. त्यात मुलांमुलींचे विवाह, त्यातील अनिष्ट प्रथा, खर्चिक लग्ने, वर पक्षाच्या आवास्तव मागण्या, मानपान, श्रीमंती मिरवणे यावर सामाजिक निर्बंध असावेत अशी चर्चा समाजात सुरू झाली.

मराठा समाजाने लग्ना संबंधी आचारसंहिता घालून दिली. पुण्यापाठोपाठ अहिल्या नगर जिल्ह्यातील सकल मराठा समाजातील सामाजिक राजकीय मंडळींनी एकत्र येत असाच निर्णय घेतला. विदर्भ व मराठवाड्यातूनही आता सुरूवात केली पाहीजे.

नाशिक जिल्हा सुद्धा वैचारिक सामाजिक राजकीय पुढारलेला जिल्हा आहे. समाजातील काही लोकांची कोअरकमीटी निश्चित करून समाजाला दिशा देण्याची भुमिका घेतली पाहिजे. मराठा समाजाच्या लग्न समारंभासाठी आता निश्चित अशी आचारसंहिता लागू झाली पाहीजे. मराठा समाजात निर्माण झालेल्या विविध समस्यावर विचार करून समाजाला काही गोष्टी सांगता येतील. लग्न सोहळा शंभर ते दोनशे मर्यादित लोकात केला जावा.

प्री-वेडिंग प्रकार बंद करावा. केलाच तर तो लग्न सोहळ्यात जाहीर दाखवू नये. कसल्याही परिस्थितीत लग्न वेळेवरच लावावे. कर्ज काढून लग्नात खर्च करू नये, मराठा समाजात लग्नाच्या कर्जामुळेच अनेक आत्महत्या झालेल्या आहेत. नवरदेवापुढे दारू पिऊन नाचणाऱ्या तरुण-तरुणींना पायबंद घालावा. लग्नात फक्त वधूपिता आणि वर पिता यांनीच फेटे बांधावेत. पाहुण्यांचे फेटे व इतर सत्कार बंद करावेत. लग्न, वाढदिवस, उद्घाटन कार्यक्रमात, पुस्तके, झाडाची रोपे किंवा रोख स्वरूपात आहेर करावेत.

लग्नात प्रमुख व्यक्तीच्या हस्ते सोन्याचे दागिने, गाडीच्या चाव्या, वस्तू देऊ नयेत. देखावा करू नये. लग्नात हुंडा देऊ, घेऊ नये. वडिलांची खूपच इच्छा असेल तर मुलीच्या नावावर एफडी करावी. लग्नानंतर मुलीच्या आईने मुलीच्या संसारात ढवळाढवळ करू नये. मोबाईलचा वापर गरजे पुरताच करावा. पैशासाठी सुनेचा छळ करू नये. समाजातील नव उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या ऐपतीप्रमाणे आर्थिक मदतीचा हात द्यावा. नुसत्या शुभेच्छा नकोत.

विविध कार्यक्रमानिमित्त होणाऱ्या भोजन प्रसंगी, अन्नाची नासाडी टाळण्यासाठी, सुकी भोजन पाकीट व्यवस्था असावी. लग्न आणि दशक्रिया विधीला मान्यवरांचे आशीर्वाद, श्रद्धांजली हा कार्यक्रम बंद करावा. गावाच्या वेशीवर मोठे होर्डिंग उभे करुन त्यावर पत्रिका, नवरा मुलगा-मुलीचे मोठे कटआउट लावण्याची अहमहमिका चालू असते. ही मंडळी फार पैसेवाले असतात असेही नाही. फक्त दिखावा, एकमेकांना तुलनात्मक रित्या कमतरता भासू नये असा दुबळा प्रयत्न करतात इतकेच.

सर्वच जाती धर्मामध्ये हा प्रकार आहे. परंतु मराठा जात ही महाराष्ट्रातील एक महत्वाची जात असल्याने तिथून सुरुवात होणे हे अत्यंत महत्वाचे आहे. आता यानंतर सर्वच जातींनी पुढे यावे. त्यातील संघटना यांनी एकत्र येऊन असे निर्णय जाहीर करावेत व अशी लग्न होत असतील तरच आम्ही उपस्थित राहू अशी भूमिका घ्यावी. राजकीय नेत्यांनाही लग्नात आशीर्वाद भाषणे करू नका असे आवाहन करावेसे वाटते.

भारतीय समाजात आजही जातीला महत्व असल्याने जातीतील प्रमुख लोकांनी सांगितले तर लवकर पटते. त्यामुळे या गोष्टीला खूप महत्व आहे. या अवास्तव दलदलीतून बाहेर पडल्याशिवाय आपणा सर्वांना नवीन क्षितीज, नवीन रस्ता सापडणार नाही. या लोकांना सुधारावेच लागेल. फक्त त्यांना त्यांची गती वाढवावी लागेल.

गावा गावांमध्ये मराठा समाजाला याबाबत प्रबोधन करणे गरजेचे आहे. तरच विवाह सोहळे मोठ्या खर्चामध्ये होणार नाही. अलिकडे ठराव होतात, निर्णय होतात, पण त्याची अंमलबजावणी कोण करणार ?



थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९९४२०

मुळातच मराठा समाजाच्या म्हणाव्या तशा संघटनाच नाही. स्वतःच्या काही लोकांच्या धंदेवाईक संघटना असून त्यातून समाज हितापेक्षा स्वतःकडे पाहण्याकडे अनेकांचा हेतू असतो. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचे आदर्श फक्त पुस्तकात व भाषणापुरतेच काही लोकांनी मर्यादित ठेवले आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची महती जनसामान्यांपर्यंत पोहोचत नाही. छत्रपती शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, राजमाता अहिल्यादेवी, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या चरित्राचा अभ्यास केला तर मराठा समाजाला कोणीही काही शिकवण्याची गरज नाही.

या थोर व्यक्तींच्या चरित्रातच राज्य कारभार कसा करावा याचे मूर्तीमंत दर्शन दिसते. मराठा समाजात खरच बदल घडवायचा असेल, तर नुसत्या बैठका, ठराव, मेळावे, अधिवेशने, निर्णय घेऊन उपयोग नाही. मराठा समाजातील व्यक्तींच्या अंतःकरणापर्यंत प्रत्येकाच्या भावना पोहोचवल्या तरच मराठा समाज या पुढील काळात प्रगती करेल.

### समाज सुधारकांनी पुढे आले पाहिजे

मराठा समाजातील उच्चपदस्थ अशा अनेक मान्यवरांशी चर्चा केल्यानंतर मराठा समाजाने काही कठोर निर्णय घेणे गरजेचे आहे असे वाटते. महाराष्ट्राचे माजी पोलीस महानिरीक्षक भगवंतराव मोरे, माजी कृषीमंत्री बाळासाहेब थोरात, रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अँडव्होकेट भगीरथ शिंदे, महाराष्ट्राचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, छाया मेधणे- झाडे, राजेंद्र खताळे अशा समाजातील जाणकारांमध्ये समाज सुधारण्याची ताकद आहे. लग्नकार्यात आलेल्या काही मोजक्या श्रीमंत पैसेवाले व मोठ्या लोकांचे स्टेजवरून नाव घेऊन स्वागत करण्याची पद्धत म्हणजेच आलेल्या इतर सर्व नातेवाईक व मित्रपरिवाराचा अप्रत्यक्षपणे अपमान समजावा का? माजी आमदार स्वर्गीय भाऊसाहेब थोरात यांनी कधीही कुणाच्याही लग्नात फेटा किंवा शाल स्वीकारली नव्हती. कारण ते म्हणजे वेळात वेळ काढुन आले आणि बाकीचे येणारे काही रिकामटेकडे आहेत का? अशा फालतू प्रथा बंद करायला पाहिजेत, असे त्यांना सुचवावेसे वाटले. आज ते हयात नाही परंतु त्यांनी सुरू केलेली प्रथा समाजाने आता पुढे नेली पाहिजे. प्रतिष्ठित असोत की पुढारी, कुणाचेही शब्दसुमनानी स्वागत करणे हेही बंद केलं पाहिजे. प्रतिष्ठित मान्यवरांचे नाव घेऊन स्वागत करायचे म्हणजे लग्नाला पैसे खर्चून येणारे बाकीचे हॉलमधील सगळे समाजबांधव अप्रतिष्ठीत असतात का? तर नाही. निमंत्रणाचा स्वीकार करून वधुवरांना शुभेच्छा देण्यासाठी आलेले सर्वच समाज बांधव आणि भगिनी, आप्तेष्ट तसेच मित्रपरिवार देखील आलेले असतात, जे विवाह सोहळ्यास वेळेवर उपस्थित राहून सोहळ्याची प्रतिष्ठा वाढवितात. तेव्हा प्रारंभीच उपस्थित सर्व वऱ्हाडी मंडळींचे शाब्दिक स्वागत करून पुढील विवाह विधी नियोजित वेळेवर पार पाडण्याची काळजी घेतली पाहिजे.

नाशिकमधील मराठा समाजाचा क्रांतिकारी निर्णय नाशिक शहरातील मराठा समाजाने एक चांगला निर्णय घेतला. मराठा समाजातील कोणाच्याही लग्नात सहा पदार्थांपेक्षा जास्त पदार्थ असतील, तर त्या लग्नात वधू वरांना फक्त आशीर्वाद द्यायचे. परंतु जेवण करायचे नाही आणि मग याचे अनुकरण करत इतर काही समाजानेही वरील निर्णय राबवायचे ठरवले आहे. याबरोबरचं लग्नपत्रिका छपायची नाही तर फक्त व्हाट्सअप व फोन द्वारे निमंत्रण द्यायचे. खास निर्णय म्हणजे प्रि- वेडींग व संगीतसंध्या कार्यक्रमावर बंदी घातली आहे. समाजाने विवाह समारंभाचे रुपांतर विवाह संस्कारामध्ये केले पाहिजे. काही दिवसांपूर्वी करोनामुळे गर्दी नको म्हणून शासनाने विवाहाच्या उपस्थितीला मयार्दा घातल्याने त्यावेळी ही बाब प्रकर्षाने लक्षात आली होती, परंतु लोक परत ते सगळं विसरून गेले आणि लाखो करोडो रुपये उधळू लागले. आपण विनाकारण लाखो रूपयांची उधळपट्टी करून कर्जबाजारी होत आहोत. आतातरी आपण बदलले पाहिजे. नाही तर काळ आपणांस माफ करणार नाही. कारण दिवसेंदिवस शेतीचे उत्पन्न कमी होत आहे. शेती मालाला भाव नाही. सरकारी नोक?या राहिल्या नाहीत. खाजगी नोकरीत शाश्वती नाही. मुलीच्या लग्नाला १००००००/- रुपये खर्च येत असेल, तर मुलालाही ८००००००/- रुपये खर्च येतो. कर्जात जन्मलो, कर्जात वाढलो व कर्जात मरतो आमच्या काही पिढ्या गेल्या. आता तरी डोळे उघडले पाहिजेत. कितीही मोठं लग्न केलं तरी लोक विसरून जातात. आजवर मोठं लग्न केले म्हणून कोणाला अवॉर्ड मिळाला नाही. आपण शेती विकून गुंठ्यावर आलो, तर व्यापारी एका दुकानाचे चार दुकाने करत आहे. व्यापारीवर्गाला नाव ठेवण्यापेक्षा त्यांचे अर्थशास्त्र समजून घेतले पाहिजे. इर्षा नको तर सुदृढ स्पर्धा असली पाहिजे. भाऊबंदकीतील जीवघेणी स्पर्धा कुठेच नको. विवाह प्रसंगी तर नकोच नको. वर-वधू यांना नेहमीच उपयोगी पडणारा पोशाख घेतला पाहिजे.? वरमाईने सुध्दा रुसवे फुगवे करू नयेत. आपल्यालाही मुलगी आहे. सून उद्याची आपली काळजी घेणारी आपली मुलगीच आहे. ही भावना रुजली पाहिजे. जेवणावळी, मानपान ही पद्धत बंद करून खर्च कमी करून वधू वरांच्या भावी प्रगतीला हातभार लावावा. संसारात कधीच उपयोगी न पडणारी भांडी, फर्नीचर तर नकोच. मेहंदी, वैदिक पध्दत, हळदीच्या कार्यक्रमात होणारी गर्दी टाळावी. स्वागत समारंभात साधेपणा आणावा.??क्रिकेट ५ दिवसाचा, वन-डे वरुन २० - २० वर आला. तर आपण विवाह छोटेखानी आटोपशीर करायला काय हरकत आहे ? मोजक्याच लोकांत सगळ्या पाहुण्यांशी निवांत संवाद साधता येतो. कोणत्याही जातीधर्मांतील चांगल्या गोष्टींचा स्विकार केला पाहिजे.

### मुलगी व आईनेही विचार करावा

मुलींच्या लग्नाचे बहुतेक निर्णय मुलगी व आई दोघीच घेणार, वडीलांनी मध्ये बोलणे आता गुन्हा होत चाललाय. मुलगी आणि तीची आई यांच्यात एक मैत्रीच नात होत चालल आहे, ही चांगली बाब असली तरी, मुलीच्या फॉरवर्ड विचाराला आई कडून चालना मिळते म्हणून ही मैत्री आहे. एखाद्या आईने चालीरीती शिकवायचा प्रयत्न केला, तर लगेच त्या आईला तू जुन्या, मागासलेल्या विचारांची म्हणून हिणवायचे. स्वतःच्या पायावर उभे असलेल्या मुलींची माहेरी, सासरी मनमानी न विचारलेली बरी. फक्त पॅकेज पाहून मुलगा पसंती. एवढे करुनही किती दिवस संसार टिकणार हे कुणी सांगु शकत नाही. कारण एकतर मुलींची सहनशीलता कमी होत चालली, त्यात आईची फुस आणि स्वतःच्या पायावर उभे असल्याचा माज. शहरी मुलींची वागणूक पाहिल्यावर कोणत्याही वडीलांना आपल्या मुलीची लाज वाटेल. त्यामुळे कोणतीही तमा न बाळगता घटस्फोट होत आहेत. एक लक्षात घेतलं पाहीजे की, पिढ्यानपिढ्या शिक्षणापासून अलिप्त ठेवलेल्या समाजाला शिक्षणाची दार समाजसुधारकांनी उघडली, गावोगावी शाळा काढल्या. अशा शाळेत जाणारी अडाणी आईबापाची लेकरं ही, जन्म तारीख विचारली तर, 'ह्यो जन्मला तवा संक्रांत चार दिवसावर होती, दिवाळी तोंडावर होती, तवाच्या साली दुष्काळ पडलाता बघा' अशी उत्तरे मिळत. गुरुजींनीच मग शाळेसाठी म्हणून एक जून अशा तारखा टाकल्या. रीतसर शिक्षण घेणारी ही पहिली पिढी आपल्या कर्तृत्वाने यशस्वी झाली. नेटाने संसार केला. आपल्या पोरांना इंजिनिअरिंग, मेडिकल असं उच्चशिक्षण दिलं. म्हणूनच काही न देता घेताही संसार सुरळीत झाले.

### संसार म्हणजे तडजोड हे विसरुन चालणार नाही

शहरी व ग्रामीण आईच्या बारावी नापास मुलीलाही पुण्यातला इंजीनियरच हवा असतो. त्यांच्या आईंना इंजीनियरच काम काय असतं ते माहिती नाही, इंजीनियर शब्दाच स्पेलिंग येत नाही. तरीही जावई इंजीनियर पाहिजे तोही दहा लाखा वरील पॅकेजचा. काहींना वाटेल, मग खेड्यातील मुलींना इंजीनियर मिळूच नये का ? तर मिळावा पण त्या मुलाच्या अपेक्षांना तुम्ही उतरा ना! सर्वच महिला अशा आहेत असे अजिबात नाही. अनेक महिलांनी अत्यंत प्रतिकुल स्थितीतही स्वतःच्या हिमतीवर घर तोलून धरलेली उदाहरणे आहेत, तर काही पुरुष अपेक्षांचा डोंगर वाढवतात. बायकोच्या पदरा आडून आपला स्वार्थ साध्य करतात. संसार सुरु करण्यासाठी त्या मुलाची काय दमछाक होत असेल, तोही माणूस आहे. घाण्याच्या बैला पेक्षा जास्त त्याला संसारा भोवती फिरावे लागणार याचा विचार कुणी करीत असेल का? महिलांनो आणि मुलींनो आपल्या अपेक्षांना आवर घाला. मध्यमवर्गीय संसार थाटण्यात काही कमीपणा नाही. घरातील एकच भाकरी अर्धीअर्धी खाल्लात तर नवरा बायकोचे प्रेम नक्कीच वाढेल. जेमतेम बचत करुन एखादी वस्तू खरेदी करुन पहा, तुमच्या आनंदाला पारावार रहाणार नाही. संस्कृती जपा, कुलधर्म कुलाचार, सणवार साजरे करा. मोठ्यांचे मानसन्मान ठेवा, घराचे घरपण सांभाळा. बचत करा, हौसमौज घरच्यां बरोबर करा, आयुष्य फार सुंदर आहे. फक्त पैसा पॅकेज म्हणजेच सर्वकाही, हे मनातून काढून टाका. शेवटी लग्न ही एक व्यवस्था आहे आणि संसार म्हणजे तडजोड आहे हे विसरुन चालणार नाही.

**रविकुमार ढोमसे**

---

# जागतिक नेत्रदान दिन

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

आज १० जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो.

डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे. शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे.

त्यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यात १० जून १९२४ रोजी झाला. घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या. १० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले. या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे.

आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्यांशीवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांद्वारे आपल्याला ७५ टक्के ज्ञान मिळते. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो.

काही असेही दुर्दैवी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो. त्यांना दृष्टीच नसते. जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात. जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे.

अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करुन त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे. भारतामध्ये असलेल्या कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर करावे.

हे नेत्रदान चष्मा असणारे, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले तसेच मधुमेह आणि मानसिक त्रास असलेले व्यक्तीही करू शकतात. नेत्रदान करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी जवळच्या नेत्रपेढीत जाऊन नेत्रदानाची नोंद करावी.

मृत व्यक्तीने नेत्रदानाची नोंद केली नसली तरी त्या व्यक्तीच्या वारसदारांनी इच्छा व्यक्त केली तरी त्या व्यक्तीचे नेत्रदान होऊ शकते. मृत्यूनंतर जास्तीतजास्त सहा तासाच्या आत नेत्रदान होऊ शकते. ज्या व्यक्तीला नेत्रदानासाठी कॉर्नियाचा वापर करायचा आहे त्याला चोवीस तासाच्या आत कॉर्नियाचे प्रत्यारोपण करणे गरजेचे असते.

नेत्रदानाचा अर्थ शरीरातून संपूर्ण डोळा काढून घेणे असा होत नाही. यात मृत व्यक्तीच्या डोळ्याचा कॉर्नियाचा वापर करण्यात येतो. एका मृत्यू झालेल्या व्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन तर प्रकाशमान होतेच पण मृत व्यक्ती मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहू शकते. आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.

■ ■ ■

---

## वाचक लिहितात

### वटवृक्षाचे महत्त्व !

वटपौर्णिमा हे व्रत ज्येष्ठ पौर्णिमेच्या तिथीला करतात. वटवृक्ष हे ब्रह्मा, श्रीविष्णु, महेश, नृसिंह, नील आणि माधव यांचे निवासस्थान मानले जाते. वटवृक्ष अक्षय्य मानला जातो कारण तो स्वतःपासून अनेक वृक्ष उत्पन्न करतो.

वटवृक्ष २४ तास प्राणवायू देतो. त्यामुळे वायुप्रदूषण कमी होते. हा वृक्ष ढगांना आकर्षित करतो, त्यामुळे पावसाचे प्रमाण वाढते. जगातील कुठल्याही झाडाच्या तुलनेत याचा घेर अधिक असतो, त्यामुळे याखाली भरपूर सावली मिळते. तसेच या वृक्षावर अनेक जीवजंतू वास्तव्यास असतात. त्यांची विष्ठा, मूत्र आणि झाडाची कुजलेली पाने मिळून झाडाखालची भूमी अत्यंत सुपीक बनते. ही माती शेतात वापरल्यास ती भूमीही सुपीक होते.

वटवृक्षाची मुळे, साल, पाने आणि दूध यांचा उपयोग आयुवेर्दात विविध रोगांवर केला जातो. उदाहरणार्थ, मधुमेह, त्वचाविकार, दातदुखी, जखमा इत्यादींवर याचा उपयोग होतो.

आज जंगलतोड आणि वाढते प्रदूषण यामुळे पर्यावरणाची हानी होत आहे. त्यावर काही प्रमाणात नियंत्रण मिळवण्यासाठी वटवृक्षाची लागवड अत्यंत गरजेची आहे. वटवृक्षाचे धार्मिक, सामाजिक, औषधी आणि नैसर्गिक महत्त्व लक्षात घेता, प्रत्येकाने या वृक्षाची लागवड आणि संवर्धन करायला हवे.

■ **सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.**

### वाहतुक कोंडीचे काय करणार?

नागपूर शहराच्या बहुतेक भागात वाहतुक कोंडीमुळे सर्वसामान्य नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत असून, मनपा प्रशासन तथा वाहतूक पोलीस विभागाचे कायम दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते . नागपूर शहराच्या मध्यवर्ती भागातील गणेशपेठ बसस्थानक परिसरातील वाहतुकीची कोंडी ही जीवघेणी ठरत आहे .या भागात खाजगी ट्रॅव्हल्स कंपनीच्या बसेसचा तर अक्षरशः धिंगाणा असतो . रस्त्यावर कुठेही या बसेस अस्ताव्यस्त उभ्या केल्या जातात. साधी दुचाकी काढणे कठीण झाले आहे. तक्रारी झाल्या की एक दोन दिवस वाहतूक पोलीस दिसतात. नंतर परिस्थिती जशीच्या तशीच. शहराच्या अन्य भागातही अशीच स्थिती असून, शहरातील वाहतूक व्यवस्था पूर्णतः कोलमडल्याचे दिसते.

■ **विशाल बडवाईक, नागपूर.**

---



## या भाज्या देखील आहेत प्रथिनांचे मुबलक स्त्रोत

आजकाल बहुतेकजण फिटनेसबद्दल जागरूक होत आहेत. त्यामूळे त्यांच्या आहारात अनेक प्रकारचे पोषक घटक समाविष्ट करत आहेत, त्यापैकी एक म्हणजे प्रथिने. प्रथिनेयुक्त पदार्थांचे सेवन केल्याने आपल्या शरीराला फायदेशीर ठरते.

परंतु बऱ्याच लोकांचा असा विश्वास असतो की प्रथिने फक्त मांसाहारी आणि दुग्धजन्य पदार्थ जसे की अंडी, मांस किंवा दूध यांमधूनच मिळतात. विशेषतः शाकाहारी लोकं सहसा असे विचार करतात की त्यांच्यासाठी प्रथिनांचा पुरेसा पर्याय नाही. पण तसे नाही, काही भाज्या अशा आहेत ज्या प्रथिनांचा एक उत्तम स्त्रोत आहेत.

**ब्रोकोली :** ब्रोकोली हे एक सुपरफूड मानले जाते जे केवळ अँटीऑक्सिडंट्स आणि फायबरने समृद्ध नाही तर प्रथिने देखील समृद्ध आहे. 100 ग्रॅम ब्रोकोलीमध्ये सुमारे 2.5 ग्रॅम प्रथिने असतात. त्यात व्हिटॅमिन के आणि कॅल्शियम देखील भरपूर प्रमाणात असते जे हाडे मजबूत करण्यासाठी आवश्यक असतात.

**हिरवे वाटाणे :** एक कप उकडलेल्या हिरव्या वाटाण्यामध्ये सुमारे 8.58 ग्रॅम प्रथिने असतात, जे एका अंड्यापेक्षा जास्त असतात. यासोबतच हिरवे वटाणे हे व्हिटॅमिन सी, लोह आणि फायबरचा देखील चांगला स्त्रोत आहे. ते केवळ रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करत नाही तर हाडे मजबूत करण्यास देखील मदत करतात.

**पालक :** पालक हा बऱ्याचदा लोहाचा चांगला स्त्रोत मानला जातो, परंतु त्यात प्रथिने देखील चांगली असतात. एक कप शिजवलेल्या पालकामध्ये सुमारे 6 ग्रॅम प्रथिने असतात. त्यात असलेले जीवनसत्त्वे अ, उ आणि ङ हाडे आणि त्वचा दोन्हीसाठी फायदेशीर असतात.

**ब्रुसेल्स कोबी :** ब्रुसेल्स स्प्राउट्स लहान कोबीसारखे दिसत असले तरी पोषक तत्वांनी परिपूर्ण आहेत. त्यामध्ये प्रति 100 ग्रॅम सुमारे 3.4 ग्रॅम प्रथिने असतात. ते हाडांची ताकद वाढवण्यास, जळजळ कमी करण्यास आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतात.

**ग्रीन बीन्स :** ग्रीन बीन्स केवळ चविष्टच नाहीत तर पौष्टिकतेनेही परिपूर्ण असतात. हेल्थलाइनच्या मते, एक कप ग्रीन बीन्समध्ये सुमारे 2.7 ग्रॅम फायबर असते. याशिवाय एक कप ग्रीन बीन्समध्ये सुमारे 2 ग्रॅम प्रथिने असतात. हे ग्रीन बीन्स कॅल्शियम, पोटॅशियम आणि फायबरचा देखील चांगला स्त्रोत आहे.

■ ■ ■

---

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### शिव राज्याभिषेक सोहळा

शिवराज्याभिषेक सोहळा
आजही
कां केला जातो साजरा
' लोकशाहीतील राजे '
यापासून खरचं
बोध घेतील का जरा?

आले किती गेले किती
सांगा कोण करे गणती
शिवबांची तत्वे अंगीकाराल
तर तुमच्याही
राज्याभिषेकाची
अमर राहील स्मृती

# आकाश एज्युकेशनल सादर करत आहे 'एनईईटी रिवाइंड आणि रिबूट'

**नागपूर, ९ जून :** आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (AESL) भारतातील टेस्ट प्रिपरेशन सेवा क्षेत्रातील आघाडीची संस्था अभिमानाने सादर करते एनईईटी रिवाइंड आणि रिबूट, ही एक रणनीतीपूर्ण मास्टरक्लास आहे, जी एनईईटी २०२५ पासून एनईईटी २०२६ या प्रवासात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालील या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यास, तयारीच्या रणनीतींचे पुनर्मूल्यांकन करण्यास आणि भविष्यासाठी सुजाण निर्णय घेण्यास मदत करणे हा आहे.

विद्यार्थ्यांच्या यशासाठीच्या आपल्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेचा एक भाग म्हणून, एईएसएलने कॉन्सेप्ट कुंडली हे अत्याधुनिक, एआय-चालित साधन सुरू केले आहे, जे आकाश एआय-लॅबद्वारे विकसित करण्यात आले आहे. कॉन्सेप्ट कुंडली नीटच्या तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रगतीविषयी सखोल आढावा देऊन, सुधारणा करण्याच्या क्षेत्रांची ओळख करून देऊन, आणि खरोखरच महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्यास मदत करून सक्षम करते. हे अधिक हुशार, जलद आणि धोरणात्मक तयारीसाठी डिझाइन करण्यात आले आहे.

एनईईटी रिवाइंड आणि रिबूटची मुख्य वैशिष्ट्ये :

* एनईईटी २०२५ चा एकूण विश्लेषण: या वर्षीच्या परीक्षेतील विषयवार कामगिरी आणि मुख्य प्रवृत्तीचे विश्लेषण.
* एनईईटी धोरणांवर तज्ज्ञ मार्गदर्शन: AESL च्या सर्वोत्तम शिक्षकांकडून २०२६ मध्ये एनईईटी प्रयत्न किंवा पुनःप्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कार्यक्षम टिप्स.
* टॉपर्सची कथा आणि त्यांचा प्रवास: एनईईटी २०२५ च्या टॉपर्सच्या प्रेरणादायी कथा आणि तयारीची माहिती, जे भविष्याच्या इच्छाशक्तीला प्रोत्साहन देईल.
* एनईईटी २०२५ मधील अपेक्षित कट-ऑफ आणि रँक: श्रेणी-आधारित आणि राज्य-आधारित अपेक्षित रँक आणि कट-ऑफ मार्क्सवरील अंतर्दृष्टी.
* एनईईटी २०२५ नंतर काय करावे: करिअर काऊन्सेलिंग सत्रे, वैद्यकीय आणि संबंधित आरोग्य विज्ञानांच्या पर्यायांवर मार्गदर्शन, आणि पुढील पाऊल कसे निवडावे याबाबत सल्ला.



कॉन्सेप्ट कुंडली ही तयारीतील अंदाज वर्तवण्याची गरज दूर करण्यासाठी तयार करण्यात आलेली आहे. ती विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे बारकाईने विश्लेषण करते आणि त्या डेटावर आधारित एक कृतीयोग्य अभ्यास योजना तयार करते.

* अचूक गॅप विश्लेषण: अध्यायानुसार, प्रश्नप्रकारानुसार विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे विश्लेषण करते आणि नेमके strengths आणि weaknesses दाखवते, जेणेकरून अभ्यास अधिक केंद्रित करता येईल.
* स्मार्ट सुधारणा आराखडा: जास्त गुण मिळवणाऱ्या अध्यायांना आणि महत्त्वाच्या विषयांना प्राधान्य देते, ज्यामुळे विद्यार्थी स्पष्ट ध्येय ठरवू शकतात आणि प्रगतीला गती मिळते.
* वैयक्तिक अभ्यास यंत्रणा: दररोज अभ्यासासाठी मार्गदर्शन करते आणि सरावासाठी सूचवलेले कृती पद्धती सांगते, ज्याचा थेट परिणाम स्कोअरवर होतो.

याबद्दल बोलताना, डॉ. एच.आर. राव, चीफ ऐकडेमिक आणि बिझनेस हेड, आकाश एज्युकेशनल सर्विसेस लिमिटेड, म्हणाले, AESL मध्ये, आम्ही केवळ कोचिंग संस्थाच नाही, तर आम्ही विद्यार्थ्यांचे समस्येचे समाधान करणारे, मार्गदर्शक आणि त्यांच्या यशस्वी प्रवासाचे भागीदार आहोत. एनईईटी रिवाइंड आणि रिबूट हा त्याच वचनबद्धतेचा पुढील टप्पा आहे. हे विद्यार्थ्यांना थोडा वेळ घेण्याची, त्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्याची आणि भविष्याच्या संदर्भात सुज्ञ निर्णय घेण्याची संधी देते. एखादा विद्यार्थी यावर्षी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेत असो किंवा एनईईटी २०२६ साठी तयारी करत असो, आमचा मार्गदर्शक नकाशा त्याला प्रत्येक पाऊलावर मार्गदर्शन करण्यासाठी तयार आहे.

एनईईटी ही राष्ट्रीय चाचणी एजन्सीद्वारे प्रत्येक वर्षी घेतली जाते, जी विद्यार्थ्यांना भारतातील सरकारी आणि खासगी संस्थांमध्ये अंडरग्रॅज्युएट वैद्यकीय, दंत आणि आयुष इत्यादी) कोर्सेससाठी पात्रतेची चाचणी करते, तसेच परदेशात प्राथमिक वैद्यकीय पात्रता घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी देखील आहे.

# दलित पँथरच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी बुद्धभूषण गोटे यांची नियुक्ती



**मुंबई, ९ जून :** दलित समाजाच्या हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या दलित पँथर या संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी आंबेडकरी समाजाचे युवा नेतृत्व असलेले बुद्धभूषण कुंदन गोटे यांची, दलित पँथरच्या पक्षश्रेष्ठी मलिका नामदेव ढसाळ यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देत नियुक्ती करण्यात आली. दलित पँथरचे मुख्य प्रवक्ते संदीप जाधव यांनी राष्ट्रीय अध्यक्षपद नियुक्तीची घोषणा केली.

यावेळी मार्गदर्शन करताना मलिका ढसाळ यांनी सांगितले की, बुद्धभूषण गोटे यांचा गेल्या अनेक वर्षांचा सामाजिक कार्याचा अनुभव संघटनेच्या उन्नतीस उपयोगी ठरेल. ही नव्या संघर्षाची तयारी असून दलित पँथरला आज पन्नास वर्षांहून अधिक काळ झाला आहे, तरीही पँथरचे गारूड जनमानसात कायम असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे आजही आवेशात लढणारे पँथर्स आहेत. कारण दलित पँथर हा सकारात्मक विचार असून, हे एक हत्यार आणि ज्वाला आहे. ही क्रांतीची ज्वाला बुद्धभूषण गोटे विझू देणार नाही, हा विश्वासही मलिका ढसाळ यांनी व्यक्त केला.

यावेळी मार्गदर्शन करताना ॲड. नितीन खैरे यांनी सांगितले की, दलित पँथर इथल्या प्रस्थापित समाजव्यवस्थेला भगदाड पडण्याची ताकद असणारी शक्ती आहे. तसेच सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी लढा देणारी ही संघटना असल्याने, बुद्धभूषण गोटे यांच्याकडे या लढाऊ संघटनेचे नेतृत्व आल्याने ही संघटना मोठ्या ताकदीने उभी राहील, हा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तसेच सोलापूर येथील पँथर रायप्पा, संतोष भालेराव आणि कविता मगरे यांनीही आपले मनोगत व्यक्त करत, दलित पँथरची आजही गरज आहे असे सांगत दलित पँथरचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष बुद्धभूषण कुंदन गोटे यांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला रिपब्लिकन चळवळीचे नेते नितीन मोरे यांनीही समाजावरील होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध आपण खांद्याला खांदा लावून लढा देऊ, असे स्पष्ट केले आणि श्री. गोटे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तसेच नव्या नेतृत्वाच्या माध्यमातून संघटनेला नवसंजीवनी मिळेल आणि दलित समाजाच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडली जाईल, अशी अपेक्षा संघटनेच्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे.

यावेळी दलित पँथरचे सदस्य जनार्धन धायमुक्ते, कविता मगरे, पारापा डवरे, भुजंग साळवी, संतोष भालेराव, दीपक साळवी, कय्युम सय्यद, किरण मांदळे आणि दलित पँथरचे महाराष्ट्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# झी५ तर्फे नवीन ब्रँड आयडेंटिटीचे अनावरण, भाषेला प्राधान्य देणारा, प्रत्येकाला आपलासा वाटणारा कंटेंट देण्यावर भर देणारा प्लॅटफॉर्म बनण्याचे ध्येय

**मुंबई, ९ जून :** झी५ ने आज नवीन ब्रँड ओळख आणि नवे धोरण जाहीर केले असून त्यातून भारतातील आद्य मनोरंजक प्लॅटफॉर्मचे स्थान आणखी बळकट करण्याची योजना आहे. हे रिलाँच झी५ च्या विकासातील महत्त्वाचा टप्पा असून ते आपली भाषा, आपल्या गोष्टीचं (विविध भाषा, अगणित गोष्टी) आश्वासन देणारं आहे. या कॅम्पेनद्वारे सांस्कृतिकदृष्ट्या अस्सल कथा, वेगवेगळ्या भाषांसह स्थानिक स्पर्श आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर जास्त भर दिला जाणार आहे.

नवीन व्हिज्युअल आयडेंटिटी, उत्पादनाचा नवा अनुभव आणि भारतातील प्रमुख भाषांचा समावेश असलेले भाषिक प्लॅन्स यांसह झी५ ने प्रेक्षकांशी असलेले नाते आणखी घट्ट करण्याचे ठरवले आहे. हा धोरणात्मक बदल तीन प्रमुख स्तंभांवर आधारित आहे कंटेंट, अनुभव आणि वाजवीपणा. यातून भारताच्या डिजिटल क्षेत्रातील मागणी पूर्ण केली जाणार आहे. झी५च्या भाषिक कंटेंट धोरणामुळे लोककथा, खऱ्या आयुष्यातले हिरोज, प्रादेशिक आख्यायिका यांपासून प्रेरित स्थानिक कथांवर जास्त भर दिला जाणार आहे. प्रत्येक भाषेतील कंटेंटमध्ये व्यापकता आणि अस्सलपणाला प्रमुख स्थान असेल.

भाषिक प्लॅन्स प्रती महिना १२० रुपयांपासून सुरू होतील. हिंदी पॅक (पंजाबी व भोजपुरीसह) प्रती महिना २२० रुपयांना उपलब्ध असेल. ऑल ॲक्सेस पॅक प्रती महिना ३२० रुपयांना उपलब्ध असेल आणि सर्व पॅक्सचे वार्षिक व्हेरिएंट्स दिले जातील. आर्थिक वर्ष २६ मध्ये १३०+नवीन कंटेंट टायटल्स त्यात ओरिजनल्स, सिनेमे, नॉन- फिक्शन तसेच लाइव्ह कंटेंट आणि वेगवेगळ्या भाषिक कंटेंटचा समावेश आहे.

आगामी काळात पुढील भाषिक कंटेंट उपलब्ध केला जाणार आहे डिटेक्टिव्ह शेरदिल (हिंदी), छल कपट द डिसेप्शन (हिंदी), सत्तामम नीतीयम (तमिळ), मॉथबारू लव्हस्टोरी (तेलुगू), इन्स्पेक्शन बंगालो (मल्याळम), मारीगुल्लू (कन्नड), आता थांबाया नाय (मराठी) आणि विभिषण (बंगाली) यांचा समावेश असेल.

प्रेक्षकांना आकर्षिक करण्यासाठी प्लॅटफॉर्मद्वारे इन्ट्युटिव्ह डिझाइन आणि एआय- पॉवर्ड पर्सनलायझेशनवर भर दिला जाणार असल्यामुळे भारतातील विविध ठिकाणच्या प्रेक्षकांना त्यांच्या आवडीनुसार कंटेंटची शिफारस मिळेल. डेटावर आधारित इनसाइट्सच्या आधारे झी५ द्वारे अधिक संवादी आणि सोपी सेवा प्रेक्षकांन दिली जाईल. पर्यायाने प्रेक्षकांना सर्व डिव्हायसेसवर आवडीनुसार शिफारसी मिळतील आणि दर्जेदार स्ट्रीमिंगचा आनंद घेता येईल.

झी एंटरटेनमेंट एंटरप्रायझेस लि. च्या डिजिटल बिझनेस आणि प्लॅटफॉर्म्सचे अध्यक्ष अमित गोएंका म्हणाले, आमची नवीन ब्रँड आयडेंटिटी भाषेला महत्त्व देणारा प्लॅटफॉर्म बनण्याच्या आमच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे आणि त्यात भारतीय प्रेक्षकांच्या वैविध्यतेचे प्रतिबिंब दिसून येते. आमचा धोरणात्मक दृष्टीकोन स्पष्ट आहे भारतात, जगभरात आमचे अस्तित्व मजबूत करणे, सांस्कृतिकतेला साजेशा कथांसह प्रेक्षकांना आकर्षिक करणे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने इंट्युटिव्ह आणि वैयक्तिक आवडीनुसार कंटेंट उपलब्ध आहे. आज जगभरात भारतीय मनोरंजनाकडे पाहाण्याचा आणि त्याच्याशी कनेक्ट होण्याचा दृष्टीकोन झपाट्याने बदलत आहे.

# पालकमंत्री बावनकुळे यांनी घेतला मनपाच्या पावसाळ्यापूर्व नियोजन कार्याचा आढावा

**नागपूर, ९ जून :** राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मनपाच्या पावसाळ्यापूर्व नियोजनासह अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या नदी/नाल्यांच्या सुरक्षा भिंतीच्या व क्षतिग्रस्त झालेल्या रस्त्यांच्या कामांचा आढावा घेतला. पावसाळापूर्वी आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात आढावा घेण्यासाठी पुढील आठवड्यात मनपा आयुक्तांनी आमदार व माजी नगरसेवकांसोबत झोननिहाय बैठक घेऊन अहवाल तयार करावा, असे निर्देश यावेळी पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हाधिकारी सभा कक्षात झालेल्या आढावा बैठकीत खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार अभिजीत वंजारी आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, माजी आमदार सुधाकर कोहळे, मनपाचे मुख्य अभियंता मनोज तालेवार, माजी नगरसेवक नरेंद्र (बाल्या) बोरकर, कार्यकारी अभियंता रवींद्र बुंदाडे, सचिन रक्षमवार, विजय गुरुबक्षांनी, श्रीमती अश्विनी एलचटवार, गेडाम यांच्यासह उपअभियंता आदी अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मनपाद्वारे शहरात सुरू असलेली कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी. कामांमुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश दिले. याशिवाय मंत्रीमहोदयांनी क्षतिग्रस्त नदी/नाल्यांच्या सुरक्षा भिंतीच्या बांधकामाचा आणि क्षतिग्रस्त रस्त्यांच्या कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रगतीपथावरील कामांची गती वाढविण्याचे ही निर्देश दिले. आपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत असलेली उर्वरित कामे करण्याकरिता वाढीव निधीचा अतिरिक्त प्रस्ताव महानगरपालिकेने राज्य सरकारकडे पाठवाव, असे निर्देश यावेळी पालकमंत्री बावनकुळे यांनी दिले. बैठकीत आमदारांनी आपल्या मतदार संघातील विविध कामांची माहिती जाणून घेतली.

बैठकीत सर्वप्रथम पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यापुढे मनपाद्वारे करण्यात आलेल्या विविध कामाचे सादरीकरण करण्यात आले. याद्वारे अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या ५६ नदी/नाल्यांच्या सुरक्षा भिंतीचे बांधकाम आणि क्षतिग्रस्त झालेल्या ४१ रस्त्यांच्या कामांसाठी मंजूर २०४.७१ कोटी निधीची माहिती देण्यात आली. यात क्षतिग्रस्त नदी/नाल्यांच्या सुरक्षा भिंतीची मनपाच्या दहाही झोनमध्ये एकूण ५६ कामे केली जाणार आहे. यात ८९५३ मीटर लांबीच्या कामाचा समावेश आहे. याकरिता १६३.२३ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. याद्वारे ५० कामे पूर्ण करण्यात आली असून, ५ कामे प्रगतीपथावर असल्याचे सांगण्यात आले. तर दहाही झोन मध्ये एकूण ४१ क्षतिग्रस्त रस्त्यांची कामे केली जात आहेत. यात ४७६८० मीटर लांबीची कामे केली जाणार आहे. याकरिता ३३.७४ कोटी रुपये निधी मंजूर झाला आले. याद्वारे ४० कामे पूर्ण करण्यात आली असून, १ काम प्रगतीपथावर असल्याचे सादरीकरणाद्वारे सांगण्यात आले.

# टेलिव्हिजन अभिनेत्रींचे पावसाळ्यामधील स्किनकेअर सिक्रेट्स जाणून घ्या!



**मुंबई, ९ जून :** पावसाळा अनेकांचा आवडता ऋतू आहे, पण त्वचेची काळजी घेण्यासाठी अनेक आव्हानेदेखील घेऊन येतो. आर्द्रता आणि ओलसरपणा वाढल्याने मुरुमांपासून ते डिहायड्रेटेड त्वचेपर्यंत त्वचेच्या विविध समस्या उद्भवू शकतात. त्वचा टवटवीत, कोमल आणि चमकदार ठेवण्यासाठी एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री पावसाळ्यामध्ये त्वचेची काळजी घेण्यासाठी त्यांचे सर्वोत्तम सिक्रेट सांगत आहेत. या अभिनेत्री आहेत गीतांजली मिश्रा (राजेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'हप्पू की उलटन पलटन' मधील गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, ''आर्द्रतेमुळे माझी त्वचा कोरडी होती, त्वचा वरून चिकचिकित होण्यासह आतून डिहायड्रेटेड राहते. यावर उपाय म्हणून मी पोषक, पण हलक्या-फुलक्या घटकांचा वापर करते, जे माझ्या त्वचेला ओलावा देतात, ज्यामुळे तेलकटपणा येत नाही. दिवसाच्या सुरूवातीला मी मध व दह्याचे साधे क्लीन्सिंग मिश्रण वापरते. मध नैसर्गिक आर्द्रतेप्रमाणे काम करते, तर दही लॅक्टिस ॲसिड देते, जे त्वचेला हळूहळू एक्स्फोलिएट व हायड्रेट करते. या संयोजनामुळे माझी त्वचा स्वच्छ, कोमल व टवटवीत राहते, ज्यामुळे दिवसभर उत्साहित वाटते. क्लीन्सिंगनंतर मी ताज्या काकडीचा रस व ग्लिसरीनसह बनवलेल्या टोनरचा वापर करते. यामुळे त्वचेमधील जळजळ कमी होते, मुरमं न होण्यास मदत होते आणि त्वचेला ओलावा देखील मिळतो, म्हणून हे पावसाळ्यामध्ये त्वचेवर येणाऱ्या चिकटपणाला दूर करण्यासाठी परिपूर्ण आहे. मी आठवड्यातून दोनदा चेहऱ्यावर केळी व मधापासून बनवलेला फेस मास्क लावते. केळ्यांमध्ये पोटॅशियम व व्हिटॅमिन्स मोठ्या प्रमाणात असतात, जे त्वचेला आतून पोषण देतात, तर मध ओलावा कायम ठेवते. हा मास्क माझ्या त्वचेला चमकदार बनवतो आणि मेकअप व स्टुडिओ लाइट्सखाली दीर्घकाळपर्यंत त्वचा कोरडी होण्याला प्रतिबंध करते.''

मालिका 'भाबीजी घर पर है'मधील विदिशा श्रीवास्तव ऊर्फ अनिता भाबी म्हणाल्या, ''पावसाळा त्वचेसाठी आव्हानात्मक ठरू शकतो. सतत आर्द्रतेमुळे त्वचेवर मुरमं, तेलकटपणा येण्यासोबत त्वचा कोरडी होऊ शकते. म्हणून मी या ऋतूदरम्यान माझे स्किनकेअर रूटिन साधे, पण चांगले ठेवते. माझा आवडता उपाय म्हणजे दोन चमचे मीठ, एक चमचा ताज्या लिंबाचा रस आणि काही थेंब ऑलिव्ह ऑइलसह बनवलेले नॅचरल फेशियल स्क्रब. मीठ सौम्य एक्स्फोलिएण्टप्रमाणे काम करते, त्वचेमधील मृत पेशींना दूर करते आणि छिद्रे मोकळी करते, तर लिंबाचा रस त्वचेला उजळवतो आणि तेलकटपणा नियंत्रित करण्यास मदत करतो. ऑलिव्ह ऑइल त्वचेला पोषण देते, एक्सफोलिएशननंतर त्वचा हायड्रेटेड आणि कोमल ठेवते. मी त्वचेला आतून स्वच्छ करण्यासाठी आठवड्यातून एकदा किंवा दोनदा या स्क्रबचा वापर करते, ज्यामुळे त्वचा फ्रेश, कोमल व टवटवीत दिसते. पावसाळ्यामधील परिणामांना प्रतिबंध करण्यासाठी माझ्या त्वचेला याच उपायाची गरज आहे.''

# कॉमेडियन एहसान कुरेशी 'सरु' या मालिकेतून टेलिव्हिजनवर परत येतोय!



**मुंबई, ९ जून :** झी टीव्हीवरील 'सरु' मालिकेने प्रेक्षकांशी भावनिक नाते तयार केले आहे. हृदयाला स्पर्श करणारी कथा आणि दमदार अभिनयामुळे या मालिकेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. जसजसा हा शो पुढे जातो आहे तसतसा सरु (मोहक मटकर) चा मोठ्या शहरातला प्रवास तिच्या धैर्य आणि आत्मविश्वासाचे प्रतिबिंब बनत आहे. या प्रवासात अनेक रंगतदार पात्रेही तिच्या सोबत आहेत आणि त्यातलंच एक पात्र म्हणजे नारायणजी ज्याला शोमध्ये एनजे म्हणून ओळखले जाते आणि हे पात्र साकारत आहेत प्रसिद्ध अभिनेता आणि हास्यकलाकार एहसान कुरेशी. टेलिव्हिजनवर पुनरागमन करताना एहसान एका अशा भूमिकेत झळकणार आहेत, जी त्यांच्या हास्यप्रद आणि कवितेतल्या अंगाला अगदी नैसर्गिकरित्या समोर आणते. ते वेद (शगुन पांडे) यांचा बालपणीचा काळजीवाहू आणि आयुष्यभराचा विश्वासू मित्र आहेत. एनजे फक्त साथी नाही तर मार्गदर्शक, सल्लागार आणि वेदच्या आयुष्यात आनंद व ऊब देणारा एक आधारस्तंभ आहे. शायरीने भरलेली त्यांची पंचलाईन आणि कमालीचं वेळेचं भान यामुळे एनजे एक हलकंफुलकं आणि तरीही भावनिकदृष्ट्या मजबूत पात्र म्हणून दिसणार आहे. आपल्या भूमिकेबद्दल आनंद व्यक्त करताना एहसान कुरेशी म्हणाले, खूप दिवसांनंतर मी पुन्हा कॅमेरासमोर उभा आहे, पण ना माईकपासून दूर गेलोय, ना विनोदाच्या सवयीपासून! झी टीव्हीवरील माझ्या पहिल्याच मालिकेसाठी काम करायला मी उत्सुक आहे आणि शशि सुमीत प्रॉडक्शन्सच्या अद्वितीय टीमसोबत पुन्हा एकदा काम करण्याची संधी मिळाल्यामुळे मी अतिशय आनंदित आहे. सरुच्या जगात पाऊल ठेवताना असं वाटतंय की हे माझ्या आयुष्यातील पुढचे पान आहे. या मालिकेमध्ये अर्थ आहे आणि भावनिक खोलपणाही. एनजे माझ्यासाठी फक्त पात्र नाही तो प्रत्येकाचा आवाज आहे, जो आयुष्यातल्या अवघड वळणांवरही हसणं कसं जपावं हे जाणतो. एनजे वेद आणि सरुच्या आयुष्यात एक सकारात्मक साथ आहे. शायरीद्वारे थोडंसं शहाणपण शेअर करायचं आणि विनोदाच्या माध्यमातून दिलासा द्यायचा हेच मी सरुमध्ये आणू इच्छितोय.

एहसान कुरेशी आता सरु मालिकेत आपला कवितेचा स्पर्श घेऊन येत आहेत आणि मालिकाही नवीन संघर्षांसोबत पुढे जात आहे विशेषतः अनिका सरुच्या मार्गात नवनवीन अडथळे आणत आहे.

# शब्दकोडे क्रमांक २१३३



**आडवे शब्द :-**
१) निमग्न, गुंग
३) उदा हिंदू, मुस्लीम ख्रिश्चन इ
४) पावसाची धार
६) आर्जव
९) गर्दभ
१०) दाखला
१२) संरक्षक जाड भिंत
१४) घर
१५) शरीरातील वात दूर करणारा
१६) नव्वद अंशाच्या आतील कोन
१७) वेळ वाया घालविणे
१९) दुःखाची छाया
२१) ज्या प्रमाणे
२२) आश्रय, थारा
२४) बेतास बेत
२७) दात
२८) पंख
२९) त्याला (सं)
३०) एका बाजूस झुकणे
३२) नात्यातील मनुष्य
३३) जकात
३६) धनी
३७) लष्करी छावणीतील बाजार
३९) महिना
४०) दरवाजा
४२) डावरा
४४) पंख
४५) एक चतुर्थांश भाग
४६) अपशकुन (करणे)
४८) कातडी
४९) वडिलांचे वडील
५०) साहसी कृत्य, मूर्खपणाचे काम करणारा
५१) पशू
५२) कायदा मोडणे
५५) झकास
५६) पुन्हा
५७) तीन पानांचा एक म्हणीतील वृक्ष
५९) अंबाडीसारखे एक झाड, त्याचा वाख
६०) जावयाला पहिल्या दिवाळीत मिळणारी भेटवस्तू
६१) गावातील नागरिक, गावात राहाणारे
६२) वात्रट
६३) आवाज होणे
६४) काम करण्याची पात्रता
६६) तापापूर्वीचे अंग मोडून येणे
६७) खर्चात कपात, कतरबेत,
६८) पुष्पदल

**उभे शब्द :-**
१) पहारेकरी
२) होडी
३) श्रीमंत
४) सारखा
५) वाळवंट
६) दोस्त, सूर्याचे एक नाव
७) रागाची चरफड,
८) सभ्यपणाची रीत
१०) निघून जाणे
११) पाणी वाहण्याचे गवंड्याकडील साधन
१३) रोखलेली नजर
१४) भारताचे एक बेट
१५) उत्तराधिकार
१७) शाळेतील फळ्याचा पूर्वीचा रंग
१८) उपस्थित
२०) पुरुषांनी नेसावयाचे रेशमी वस्त्र
२२) निर्यात
२३) मीठ
२५) फक्त, केवळ
२६) संपूर्ण
२८) वेतन
२९) सिद्ध
३१) मागणीचा सततचा हट्ट
३२) अंगरखा
३३) दुखणे, रोग, विकार
३४) मिळवता, कमाई करणारा
३५) उगाच
३६) नारळाचे झाड
३७) खोलवर
३८) पूर्वज
४१) मार्ग
४३) माल साठविण्याची जागा, गुदाम
४५) गवताचे पान
४७) दुर्दशा
४९) लांबट चौकोन
५०) दाह, अग्नी, ज्वाला
५१) कथिल आणि शिसे यांचा मिश्र धातू
५२) राबता, भोगवटा, रिवाज
५३) निमित्त, सबब
५४) अतिशय त्रास देणे, सळो की पळो करणे
५५) नंतर
५६) उथळ, पसरलेला आकार
५७) परीक्षा घेणारा
५८) समानता
५९) तारणारा
६०) वासर
६१) एक रंगीत कंदमूळ
६२) चक्र
६३) गंध
६५) पाक तयार करताना साखरेतून निघणारा मळ

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# श्रीक्षेत्र आंभोरा येथे गंगा दशहार उत्सव साजरा

**वेलतुर :** श्रीक्षेत्र आंभोरा येथे देवस्थान पंचकमेटीच्या वतीने गंगा दशहार उत्सव नुकताच साजरा करण्यात आला. या गंगा दशहार उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त आहे. यावेळी हजारो भाविकांनी आपली उपस्थिती दर्शवली. दहा दिवस चाललेल्या दशहार समाप्ती उत्सवानिमित्त ह.भ.प.योगेश चाकोले महाराज यांच्या वाणीतून गोपालकाल्याचे कीर्तन होऊन दहीहंडी फोडून गोपालकाला वितरित करण्यात आला.यावेळी महाप्रसादचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी देवस्थान व्यवस्थापक पंचकमेटीचे अध्यक्ष रत्नाकर ठवकर, सचिव केशवराव वाडीभस्मे, उपाध्यक्ष नरेश ठवकर, कोषाध्यक्ष मदन खळसिंगे,कमलेश ठवकर, प्रा.सुरेश नखाते, भाष्कर भोंगाडे, प्रा.डॉ. रामेश्वर पाठेकर,बाबाराव तुमसरे, प्रा.डॉ. अविनाश तितरमारे, नामदेव तितरमारे,धनराज कुर्जेकार, जनार्दन बावनकुळे, रामेश्वर भोंगाडे आदी उपस्थित होते.


# कार्यालय नगरपंचायत बेसा पिपळा
ता.जि.नागपुर

जा.क्र.न.पं.बे. पि./बांध. का. वि. १८०९/२०२५
कार्यालय नगर पंचायत बेसा-पिपळा
दिनांक : २९/०५/२०२४

**निविदा सूचना**

प्रशासक नगर पंचायत बेसा पिपळा, जि. नागपूर यांचा वतीने नगर पंचायत बेसा पिपळा हदीतील सन २०२५-२०२६ नगर पंचायत निधी/विकास निधी अनुदान योजना अंतर्गत ०२ कामाची बि-१ दोन लिफाफा पद्धतीने निविदा पद्धतीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून, निविदा मागविण्यात येत आहे. कार्यालयीन वेळेवर संबंधित विभाग मध्ये दिर्नाक ३०/०५/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध आहे. करिता कामाची तपशील खालील प्रमाणे आहे.

प्रशासक
नगरपंचायत बेसा पिपळा


# राशीभविष्य

**मेष :** प्रत्येक पावलाचा विचारपूर्वक आढावा घ्या. तुमच्या मनाचा कौल घेणे गरजेचे आहे, कारण तुम्हाला तुमचे अंतर्मन योग्य मार्ग दाखवेल. कोणतीही मोठी जोखीम घेण्यापूर्वी नीट तपासून घ्या.

**वृषभ :** आज तुमच्या समस्या जास्त वाढू देऊ नका. त्या लवकर सोडवण्याचा प्रयत्न करा. तुमच्या जवळच्या मित्रांसोबत भागीदारीत कोणतेही काम करू नका. कामाच्या क्षेत्रात स्वत: निर्णय घ्या.

**मिथुन :** आज तुमच्यासमोर काही आव्हाने उभी राहतील, पण त्यामुळे तुम्हाला प्रगतीची नवी संधी मिळेल. तुम्हाला आयुष्यात नक्की काय मिळवायचे आहे, यावर लक्ष केंद्रित करा.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी वादविवाद टाळा. आर्थिक बाबतीत थोडी सावधगिरी बाळगा. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा, अन्यथा आर्थिक नियोजन बिघडू शकते. कामाच्या ठिकाणी तुमच्या मताला महत्त्व दिले जाईल.

**सिंह :** जेव्हा तुमचे ध्येय स्पष्ट असते, तेव्हा मार्ग आपोआप सापडतो. जीवनातील नवीन संधी स्वीकारण्यासाठी तयार राहा. आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवल्यास योग्य निर्णय घेऊ शकाल.

**कन्या :** योग्य व्यक्तीला काम सोपवल्यास तुमचा भार हलका होईल. कोणत्याही समस्येतून मार्ग काढण्याचे कौशल्य आणि क्षमता तुमच्याकडे आहे, फक्त स्वत:वर विश्वास ठेवा.

**तुळ :** कामाच्या ठिकाणी जास्त मेहनत करावी लागेल. सहकाजयांशी समन्वय साधण्याची गरज भासेल. कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे कमी होतील. उत्पन्नाचे स्रोत वाढतील.

**वृश्चिक :** आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा आव्हानात्मक असू शकतो. कामाचा ताण वाढेल. विनाकारण हट्ट करु नका. आपल्या सहकाजयांची किंवा मित्रांची मदत घ्यायला संकोच करू नका.

**धनु :** आज तुमच्या आजूबाजूला बदलाचे वारे वाहतील, ज्यामुळे मनात थोडी अस्वस्थता निर्माण होईल. पण कोणताही निर्णय घेताना विचार करता. अतीघाई करु नका.

**मकर :** आज, तुमच्या प्रिय व्यक्तीकडून पैसे आणि भेटवस्तू मिळाल्याने तुम्ही आनंदी व्हाल. कौटुंबिक जीवनात परस्पर स्नेह वाढेल. कामाच्या ठिकाणी विरुद्ध लिंगाच्या जोडीदाराची जवळीक तुम्हाला दिलासा देईल.

**कुंभ :** आज तुमच्यामध्ये प्रचंड आत्मविश्वास आणि ऊर्जा असेल. तुमच्यासमोर कोणतेही आव्हान आलं तरी तुम्ही ते सहजपणे हाताळू शकाल. काही मतभेद असल्यास शांतपणे संवाद साधून ते मिटवा.

**मीन :** व्यवसायात प्रगतीसोबतच तुम्हाला नफाही मिळेल. तुमच्या गुप्त रणनीतीत तुम्हाला यश मिळेल. नोकरीत वरिष्ठ अधिकाजयांच्या जवळीकतेचा फायदा तुम्हाला मिळेल.

# भिवंडीत रुग्णालये झाली उदंड पण शासकीय योजनांचा दुष्काळ कायम

**भिवंडी, दि. ९ : प्रतिनिधी**

भिवंडी या शहरा सोबतच लगतच्या ग्रामीण भागात लोकसंख्या १५ लाखांहून अधिक आहे.तर दररोज कामानिमित्त येणाऱ्या स्थलांतरित चाकरमानी कामगारांची संख्या लाखांमध्ये आहे.मुंबई नाशिक महामार्गावरील अपघात यामुळे अशा सर्वांसाठी भिवंडी शहरातील खाजगी रुग्णालय मोठ्या प्रमाणावर आहेत.पण शहरातील १४० खाजगी नोंदणीकृत रुग्णालयांपैकी अवघ्या दोन रुग्णालयात शासकीय मोफत योजनांचा लाभ मिळत आहे. त्यामुळे शहरासोबत ग्रामीण रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार करून घेण्यासाठी आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. अशा परिस्थिती मध्ये अनेक रुग्णांना मोफत योजनांचा लाभ घेण्यासाठी ठाणे मुंबई येथे जावे लागत असल्याने ही रुग्णांची हेळसांड थांबवणे गरजेची आहे.पण शासकीय आरोग्य व्यवस्थे कडून याबाबत कोणतीही पावले उचलली जात नाहीत हे दुर्दैव आहे.शहरात पालिके कडे नोंदणीकृत १४० रुग्णालये आहेत. त्यापैकी २२ रुग्णालयात २५ पेक्षा अधिक बेड आहेत.साधारण शासकीय योजनांचा लाभ देणाऱ्या रुग्णालयात ५० बेड असणे आवश्यक आहे.पण त्यात शिथिलता आणत ती बेड संख्या २५ वर आणून ठेवली आहे.पण शहरातील गल्लोगल्ली सुरू असलेल्या रुग्णालयात याची वानवा आहे.

महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री आयुष्यमान कार्ड ज्यामध्ये ५ लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत देण्याची जाहिरातबाजी सरकार मोठ्या प्रमाणावर करते पण खरच या योजनांचा लाभ नागरिकांना मिळतो का हा सुद्धा संशोधनाचा विषय ठरला आहे.शहरात असलेल्या रुग्णालयांपैकी १३ रुग्णालयात ३० पेक्षा अधिक बेड आहेत.पण या रुग्णालय व्यवस्थापनाकडून शासकीय योजनांसाठी अर्ज सुद्धा केले गेले नाहीत.जेणेकरून आलेल्या रुग्णांकडून अव्वाच्या सव्वा फी आकारण्यास हे मोकळे झाले आहेत.कामगार वस्तीचे शहर म्हणून ओळख असलेल्या शहरात अल्प उत्पन्न असलेल्यांचे प्रमाण अधिक आहे.अशा परिस्थिती मध्ये एकमात्र शासकीय उपजिल्हा रुग्णालय उपलब्ध आहे.पण तेथे ही तुटपुंजे उपचार होत असल्याने रुग्णांना ठाणे मुंबई येथे उपचारासाठी रवाना केले जाते.त्यामुळे शासकीय योजनेतून मोफत योजनेचा लाभ काही भिवंडीकर रुग्णांना घेता येत नाही.

शहरात फक्त सिराज हॉस्पिटल व नोबल हॉस्पिटल या दोनच ठिकाणी शासकीय योजना लागू आहेत.शासनाने रुग्णांना मोफत उपचार सुविधा देणाऱ्या शासकीय योजना राबवण्या साठी ५९ बेडची अट शिथिल केली असून,३० बेड असणाऱ्या रुग्णालयांमध्ये सुद्धा उपचार घेणाऱ्या रुग्णांना आता या योजनांचा लाभ देता येणार आहे.त्यामुळे यापुढे नोंदणी होणाऱ्या सर्व रुग्णालयांना शासकीय योजना राबविणे क्रमप्राप्त ठरणार आहे अशी माहिती पालिकेचे वैद्यकीय आरोग्य विभागाचे नियंत्रण अधिकारी डॉ. जयवंत धुळे यांनी दिली आहे.तर शहरातील २५ बेड सुविधा असणाऱ्या २१ रुग्णालय व्यवस्थापनांना भिवंडी शहरातील रुग्णांना महात्मा जोतिबा जन आरोग्य योजना या शासकीय मोफत उपचार योजनांचा लाभ मिळवून देणे बंधनकारक आहे.त्यासाठी पालिका आरोग्य विभागाने सर्वांना पत्र देऊन योजने मध्ये लवकरात लवकर समाविष्ट होण्या बाबत कळविण्यात आल्याची माहिती शेवटी डॉ. जयवंत धुळे यांनी दिली आहे.शासन रुग्णांना मोफत आरोग्य सेवा देण्यासाठी तत्पर आहे,नव्हेच तर अपघातग्रस्तांना तात्काळ मदत दिली जाईल असे सांगत असताना माझ्या कडे प्रधानमंत्री आयुष्मान कार्ड असतानाही शहरातील सिराज रुग्णालयाने मोफत उपचार नाकारले अशी खंत दाभाड किरवली येथील शेतकरी शिवाजी राऊत यांनी व्यक्त केली आहे.पावसामुळे चिखलाच्या झालेल्या दाभाड किरवली रस्त्यावर २८ मे रोजी दुचाकी सरकल्याने अपघात होऊन शिवाजी राऊत यांच्या डोक्याला जबर मार लागला होता.

भिवंडीत उपचारासाठी आल्यावर आयुष्यमान कार्ड असतानाही सिराज रुग्णालयाने मोफत उपचार करण्यास नकार दिला याची तक्रार जिल्हा शल्यचिकित्सक व राज्य आरोग्य मंत्रालयाच्या पोर्टलवर केली आहे.पण अजून ही कोणतेही समाधानकारक उत्तर प्रशासनाकडून मिळाले नाही.मग अशा रुग्णालयावर कारवाई होणार कधी असा सवाल शिवाजी राऊत यांनी उपस्थित केला आहे.याबाबत सिराज हॉस्पिटल व्यवस्थापनाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो न झाल्याने त्यांची भूमिका समजू शकली नाही.

## शहापूर जीवरक्षक टीम धावली महावितरणच्या मदतीला
# वैतरणा नदीपात्रात तुटून पडलेल्या वीज वाहिनीची प्रतिकूल परिस्थितीत दुरुस्ती

**कल्याण, दि. ९ : प्रतिनिधी**



रविवारी (०८ जून) मध्यरात्री अचानक जोराचा वारा सुटल्याने आसनगावला वीजपुरवठा करणारी उच्चदाबाची वीजवाहिनी तुटून वैतरणा नदी पात्रात पडली. नदीपात्र खोल असल्याने दुरस्तीच्या कामात अडथळे येत होते. परंतू शहापूरच्या जीवरक्षक टिमने मदत केल्याने सोमवारी सकाळी बाधित भागाचा वीजुपरवठा सुरळीत करता आला.

आसनगाव गाव तसेच शहापुर, खुटघर, चेरपोली या गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या पंपिंग स्टेशनला वीजपुरवठा करणारी उच्चदाब वाहिनी रविवारी मध्यरात्री तुटून वैतरणा नदीपात्रात पडली. वीज कर्मचाऱ्यांनी रात्रीच धाव घेऊन दुरस्तीचा प्रयत्न केला. परंतू नदीपात्र खोल असल्याने दुरुस्तीसाठी बोटीची गरज होती. शहापूरचे उपकार्यकारी अभियंता यादव इंगळे यांनी जीवरक्षक टिमचे समीर चौधरी यांच्याशी संपर्क करून नदीपात्रात काम करण्यासाठी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या स्पीडबोटीची मागणी केली. या मागणीला तत्काळ प्रतिसाद देत चौधरी यांनी सोमवारी पहाटेच त्यांच्या तन्मय निमसे व इतर सहकाऱ्यांसमवेत बोट उपलब्ध करून दिली. बोटीच्या साह्याने वीजवाहिनी शोधून जनमित्र व सतिश इलेक्ट्रिकल इंजिनीअर्सच्या कामगारांनी तातडीने दुरुस्ती करत सकाळी दहा वाजता बाधित वीजपुरवठा पूर्ववत केला.

कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता विजय फुंदे, शहापूरचे उपकार्यकरी अभियंता यादव इंगळे दुरुस्तीच्या वेळी स्वत: उपस्थित होते. कल्याण परिमंडलाचे चंद्रमणी मिश्रा यांनी प्रतिकूल परिस्थितीत बाधित वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी जनमित्रांनी केलेल्या कामाचे कौतूक केले आहे.

## नागरी प्रश्नांवर उत्तर न मिळाल्याने आंदोलनाचा इशारा

**भाईंदर, दि. ९ : प्रतिनिधी**

मिरा भाईंदर शहरातील विविध प्रश्नांबाबत महापालिकेच्या वतीने योग्य रित्या उत्तर न मिळाल्याने मिरा भाईंदर शहरातील मनसेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष रेश्मा तपासे यांनी मिरा भाईंदर महानगर महापालिकेच्या विरोधात आंदोलन करण्याचा ईशारा दिला आहे. तपासे यांनी मिरा भाईंदर शहरातील काही मुद्याबाबत मिरा भाईंदर महानगर पालिकेला पत्र व्यवहार करून त्यांना प्रश्नाची उत्तरे मागितली होती. त्यात शहरातील फुटपाथवर लावण्यात येणाऱ्या लोखंडी रेलिंगवर असलेल्या नावाबाबत, चेना गाव येथील कांदळवन नष्ट केल्या बाबत, कॅफे हॉलिडे बाबत प्रश्न विचारले व त्याबाबतीत उत्तरे मागितली होती. मात्र महापालिकेच्या मार्फत देण्यात येणारी उत्तरे तपासे यांना पटली नसल्याने त्यांनी लवकरच आंदोलन करणार असल्याचा ईशारा दिला आहे. याच बरोबर शहरातील काही राजकारण्याचा याला पाठिंबा असल्याचा देखील त्यांनी सांगितले.

## आक्षेपार्ह फोटो वायरल करणारा अटकेत

**भाईंदर, दि. ९ : प्रतिनिधी**

सोशल मिडीयावर ओळख झालेल्या एका झारखंडमधील तरुणीची मैत्री झाल्यानंतर तिचे आक्षेपार्ह फोटो सोशल मीडियावर व्हायरल करून तिला मारण्याची धमकी देणाऱ्या तरुणाला अटक करण्यात आली आहे. इमामुल होदा (२५) असे आरोपीचे नाव आहे. काशिमिरा गुन्हे शाखेने अटक केलेल्या इमामुलचा ताबा झारखंड पोलिसांना दिला आहे.

झारखंडच्या रांची जिल्ह्यातील एका गावात राहणाऱ्या तरुणीशी सोशल मीडियावर खोटी माहिती देत इमामुलने मैत्री केली हाती. त्यानंतर तिचा विश्वास संपादन करून तिचे फोटो मागून घेतले होते. काही दिवसांनी तिने इमामुलशी बोलण्यास नकार दिल्यावर त्याने तिचे आक्षेपार्ह फोटो सोशल मीडियावर वायरल केले होते. त्यानंतर संपर्कात राहिली नाही तर असिड टाकून जीवे ठार मारण्याची धमकीही दिली होती. त्यामुळे त्रस्त झालेल्या तरुणीने तक्रार दिल्यानंतर झारखंड पोलिसांनी इमामुलविरोधात गुन्हा दाखल केला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर झारखंड पोलीस त्याचा माग काढत होते. तांत्रिक विश्लेषणात इमामुल मीरा भाईंदर परिसरात असल्याची माहिती मिळाल्यावर झारखंड पोलिसांनी मीरा भाईंदर पोलिसांशी संपर्क साधला होता. त्यामाहितीच्या आधारे काशिमीरा गुन्हे शाखेच्या पथकाने इमामुलला काशिमीरा परिसरातून अटक केली. अटकेनंतर इमामुलला झारखंड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## भिवंडीतील 957 संशयास्पद जन्म नोंदी बाबत किरीट सोमय्या यांची पोलिसांकडे तक्रार

**भिवंडी, दि. ९ : प्रतिनिधी**

भिवंडीतील महानगरपालिका व स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा शासकीय रुग्णालय या ठिकाणी एकूण ९५७ संशयास्पद जन्म नोंदी आढळल्या असून याबाबत आपण शांतीनगर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविण्याची माहिती भाजपा नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी दिली आहे. माजी खासदार किरीट सोमय्या यांनी सोमवारी भिवंडी शहरात स्व.इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालय,महानगरपालिका मुख्यालय या ठिकाणी भेटी देऊन तेथील संशयास्पद जन्म नोंदीच्या तपासणी केली. त्यांच्या या भेटी दरम्यान भाजपा शहराध्यक्ष रवी सावंत सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.स्व.इंदिरा गांधी रुग्णालयात अधीक्षका डॉ.माधवी पंदारे यांनी त्यांना माहिती दिली तर पालिका मुख्यालयात आयुक्त अनमोल सागर यांच्या कडून त्यांनी माहिती घेतली.या दोन्ही ठिकाणी भेटी नंतर किरीट सोमय्या यांनी आपला मोर्चा शांतीनगर पोलिस ठाण्यात वळवून तेथे सहाय्यक पोलिस आयुक्त सचिन सांगळे,वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड यांच्याकडे या संदर्भात तक्रार केली आहे.महाराष्ट्रात विलंबित जन्म नोंदी प्रमाणपत्र घोटाळा झाला आहे.भिवंडीत अशा प्रकारे ९५७ नोंदी झाल्याचे आज सिद्ध झाले आहे.पालिका ,तहसीलदार,रुग्णालय यांच्या सोबतच्या बैठकीत त्यांना कोणतेही अधिकार नसताना हे जन्म प्रमाणपत्र दिलेत हे स्पष्ट झाले आहे.

# लाभार्थ्यांना तीन महिन्याचे मोफत धान्य वाटप

**पालघर, दि. ९ : प्रतिनिधी**

आगामी पावसाळा आणि परिणामी पूरपरिस्थिती इत्यादी प्रतिकूल हवामान परिस्थितीमुळे कार्यक्षम लॉजिस्टिक्स आणि साठवणुकीसाठी राज्ये, केंद्रशासित प्रदेशांनी ऑगस्ट 2025 पर्यंत एनएफएसए अंतर्गत वाटप केलेले अन्नधान्याची आगाऊ उचल करण्यास केंद्र शासनाने मंजूरी दिली असून, सदर अन्नधान्याची उचल व वाटप केलेले अन्नधान्याची उचल आणि वाटपाबाबतची कार्यवाही विहित कालमर्यादेत दि.30 जून,2025 पर्यंत करण्याबाबत शानाकडून निर्देश प्राप्त झालेले आहे. त्याअनुषंगाने पालघर जिल्हयातील 1 हजार 85 रास्त भाव धान्य दुकानातून अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांना प्रति शिधापत्रिका 25 किलो तांदुळ व 10 किलो गहू आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी 3 किलो तांदुळ व 2 किलो गहू मोफत एकत्रित तीन महिन्याचे धान्य वाटप करण्यात येणार आहे.

माहे जून, जुलै व ऑगस्ट, 2025 करीता रास्त भाव धान्य दुकानदारांच्या पॉस मशिनला धान्य साठा एन्ट्री करण्यासाठी IAeSCM प्रणालीवर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच ePOS मशीनवर NFSA-6 (June 2025), NFSA-7 (Jully 2025), NFSA-8 (Augest 2025) वाटपासाठी ऑपशन उपलब्ध करण्यात आलेले आहेत. पालघर जिल्ह्याचे धान्य पुढीलप्रमाणे मंजूर करण्यात आले आहेत. (आकडे क्विटलमध्ये) माहे जून 2025 अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिकांची संख्या 98 हजार 317 प्राधान्य कुटूंब लाभार्थी संख्या 14 लाख 55 हजार 889 एकूण राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचे मंजूर नियतन तांदूळ-63 हजार 866.13 गहू-37 हजार 076.54 एकूण-10 लाख 0942.67 माहे जुलै,2025 अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिकांची संख्या 98 हजार 317 प्राधान्य कुटूंब लाभार्थी संख्या 14 लाख 55 हजार 889 एकूण राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचे मंजूर नियतन तांदूळ-60 हजार 857.26 गहू-36 हजार 523.33 एकूण-97 हजार 380.59 माहे ऑगस्ट,2025 अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिकांची संख्या 98 हजार 317 प्राधान्य कुटूंब लाभार्थी संख्या 14 लाख 55 हजार 889 एकूण राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचे मंजूर नियतन तांदूळ-60 हजार 857.26 गहू-36 हजार 523.33 एकूण-97 हजार 380.59 आहे. तरी नागरिकांनी याचा लाभ घ्यावा,असे आवाहन सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी,पालघर यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळवले आहे.

# खरीप हंगामातील भातशेतीच्या कामांना वेग
## शेतकऱ्यांची भातपेरणीची लगबग, हवामान विभागाचा "अंदाज" रामभरोसे ठरणार

**भिवंडी, दि. ९ : प्रतिनिधी**

मे महिन्याच्या मध्यांतरी सुरू झालेल्या अवकाळी पावसाने बागायत दारांसह शेतकऱ्यांची आर्थिकपणे पुरता दशा केली.त्यानंतर महाराष्ट्र राज्यात मान्सूनची वाटचाल संथगतीने सुरू झालेली असतानाच सद्यस्थितीत सुरू असलेल्या पावसाच्या सरी खंडाने कोसळत असल्या तरी खरीप हंगामातील भात शेतीकरिता पोषक आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. दरम्यान शेतकऱ्यांनी शेती मशागतीची कामे पूर्ण करून भात पेरणीच्या कामांना जोमाने सुरुवात केल्याचे रविवारी भिवंडी तालुक्यातील ग्रामीण मधून दिसून आले आहे. यासाठी बळीराजाने भात बियाणे पेरणी करून बियाणे



शेतात रुतण्यासाठी आणि जमीन चारही बाजूंनी समांतर करण्यासाठी चार मजबूत काड्यांचा चौकोनी (झीट) तयार करून शेतात फिरवून वेगवेगळ्या भात प्रकारातील भातबियाणांची शेतात रोवणी केली आहे.दरम्यान भिवंडी तालुक्यातील भात पिकाचे क्षेत्र १६८०० हेक्टर असून यावर्षी शंभर टक्के भात लागवड होण्याची शक्यता भिवंडी तालुका कृषी अधिकारी ज्ञानदेव शिंदे यांनी व्यक्त केली आहे.एकीकडे हवामान विभागाने यंदा मान्सूनची वाटचाल केरळ पाठोपाठ महाराष्ट्रात लवकर सुरू होणार असल्याचे भाकित केले होते.त्याप्रमाणे सुरुवात ही झाली.परंतु त्यानंतर पावसाने एकाकी पाठ फिरवली आहे.असे असले तरीही मागील काही दिवसांपासून अधून मधून बरसणारा वरुण राजा शेतकऱ्यांना दिलासा देणारा आहे.त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून रविवारी खरीप हंगामातील भातशेतीच्या बियाणे पेरणीच्या कामांना वेग आल्याचे दिसून आले.असे असले तरी पाऊस हवामान विभागाच्या रामभरोसे "अंदाज" नुसार कोसळणार की, निसर्गाच्या नियमानुसारच बरसून बळीराजा समाधानी होणार हे पाहणे औत्सुक्याचे असणार आहे.

## टँकरच्या धडकेत एकाचा मृत्यू

**बोईसर, दि. ९ : प्रतिनिधी**

तारापूर एमआयडीसीतील एका कारखानाच्या आवारात टँकरच्या धडकेत एकाचा मृत्यू झाला. या अपघातप्रकरणी टँकर चालकाला अटक करण्यात आली आहे. तारापूर एमआयडीसीतील एका कारखान्याच्या प्रवेशद्वाराजवळ टँकर घेत असताना कारखान्याचे देखभाल दुरुस्ती विभागातील वरिष्ठ व्यवस्थापक निलेश कुमार सिंह यांना टँकरची धडक बसून ते जखमी झाले होते. त्यांना रुग्णालयात दाखल केले. मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे अधिकाऱ्यांनी घोषित केले.

# सीएसआर संकल्पनेतून जिल्ह्यात कंपन्यांची संख्या वाढली-राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

**पालघर, दि. ९ : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आणि मुख्यमंत्री यांनी CSR ची संकल्पना आणली त्यामुळे अनेक मोठया कंपन्याची संख्या आणि प्रमाण वाढले असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम ( सार्वजनिक उपक्रम ) राज्यमंत्री मेघना साकोरे – बोर्डीकर यांनी सांगितले.

लुपिन फाउंडेशन अंतर्गत मोबाईल व्हॅनचे उद्घाटन वाडा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र गोऱ्हे येथे करण्यात आले.

यावेळी खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार राजेंद्र गावित,हरिश्चंद्र भोये, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, तसेच डॉक्टर आणि वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित मान्यवर उपस्थित होते.

रुपीन आणि पालघर यांच नातं अनेक वर्षांपासून असून रुपीन फाऊंडेशन हे पालघरच्या आदिवासी वाड्यावरती, पड्यांवरती राहणाऱ्या जनतेसाठी काम करत आहे. यापूर्वी रुपीन आपल्या पालघरमध्ये जे सुंदर पद्धतीने शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मोगरा लागवड करतो आहे जी अनिता डोंगरे यांच्या ब्रँड जो भारतातच नव्हे तर जगभरात प्रसिद्ध आहे. त्याची चालल्या पद्धतीने व्याप्ती आहे. त्याप्रमाणे आपल्या आदीवासी पाड्यावरील महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांना सुद्धा बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे काम या रूपीन फाऊंडेशनने केले आहे असल्याचे मेघना साकोरे –बोर्डीकर यांनी सांगितले.

. आपण समाजाचे काही देणं लागतो ह्या संकल्पनेतून काम करत राहावे. आपण समाजासाठी काही तरी केलं पाहिजे इथपर्यंत न करता खऱ्यार्थाने लोकांना सगळ्या गोष्टींचा फायदा त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कसा होऊ शकतो यांचे प्रत्यक्ष उदाहरण पालघर जिल्ह्यामध्ये काम करणाऱ्या संस्थांनी दाखवून दिले आहे.



आरोग्यासाठी आपले जीवन हे प्रत्येक व्यक्तीच्या हातात आहे. माणसाच्या शरीरामध्ये सुद्धा आजारपणाने बदल होत असतो. जसं बीपी. शुगर किंवा इतर काही आजार असतात की, जे दुसऱ्याला आपल्यापासून त्याचा संसर्ग होणार नाही पण त्या व्यक्तीचा सुद्धा आयुष्यमान कमी करण्यामध्ये किती घातक असतात म्हणून याची तपासणी आपल्या व्हॅनच्या माध्यमातून होणार आहे. आणि आरोग्यदायी असा पालघर जिल्हा रूपीनच्या माध्यमातून होणार आहे. हे बघून आनंद होत आहे. आपण सर्वांनी या आजारापासून मुक्ती हवी असेल तर रोज सकाळी चालले पाहिजे. म्हणून देशाचे प्रधानमंत्री सांगतात 'हम फिट तो इंडिया फिट' म्हणून आपला देश हा सशक्त देश बनणार असलं काही विश्वास राज्यमंत्री बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

.आपल्या देशातील तरुण पिढी मुळे आपला देश जगातील सगळयात तरुण देश आहे. त्यामुळे या आजारांना आपण वेळीच शोधू शकलो तर आपल्या जीवनामध्ये थोडेफार बदल घडवून आणले तर निश्चितच आपले जीवनमान चांगले होणार आहे.

.गडचिरोली सारखा मागासलेला जिह्यात आज क्रांती होऊ शकते तर निश्चितच पालघर जिल्हा सुद्धा मागे राहणार नाही. महाराष्ट्रात सुद्धा पालघर जिल्हा हा प्रगतशील जिल्हा म्हणून नावारूपाला येईल यात शंका नाही. या जिल्ह्यातील जनतेच्या ज्या मागण्या आहेत त्या पूर्ण करण्यासाठी मी कटीबद्ध आहे. मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय हवे आहे. त्याचप्रमाणे पालघर जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय होणार यासाठी मी प्रयत्नशील आहे. आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सदैव प्रयत्नशील असल्याचे श्रीमती बोर्डीकर यांनी सांगितले.

# आज महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना तिसरा व अंतिम लकी ड्रॉ

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

महावितरणच्या लकी डिजिटल ग्राहक योजनेचा तिसरा व अंतिम लकी ड्रॉ ऑनलाईन पध्दतीने दि. १० जून २०२५ रोजी काढण्यात येणार आहे. यातून प्रत्येक उपविभाग स्तरावर एक प्रमाणे पहिल्या क्रमांकाकरिता ६५१ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन बक्षिस म्हणून दिला जाणार आहे. तर प्रत्येक उपविभागात प्रत्येकी दोन प्रमाणे दुसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन व प्रत्येकी दोन प्रमाणे तिसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट वॉच बक्षिस म्हणून दिले जाणार आहे. दि. ७ एप्रिल व दि. ७ मे रोजीच्या पहिल्या व दुसऱ्या लकी ड्रॉ मधील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले आहे.

महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. दि.१ जानेवारी ते ३१ मे




२०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले ऑनलाईन पध्दतीने भरणाऱ्या सर्व लघुदाब वीज ग्राहकांना या योजनेचा फायदा होणार आहे.

ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू (एल टी- लाईव्ह) वीजग्राहकांसाठी लागू असून, ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा ऑनलाईन पध्दतीने भरणा केलेला नाही. अधिक माहितीसाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल ॲपची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ग्राहकांना देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीज बिल भरणा सूट दिली जाते. परिणामी सध्या राज्यात ७० टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील.

# भिवंडीमध्ये बकरी ईद सण उत्साहात साजरी
## 8067 जनावरांची कुर्बानी; पालिका प्रशासनाच्या व्यवस्थेची अनेकांकडून प्रशंसा

**भिवंडी, दि. ९ : प्रतिनिधी**

७ ते ९ जून दरम्यान साजरी होणारी बकरी ईद चा सण भिवंडी शहरात उत्साहात साजरा करण्यात आला आहे.या तीन दिवसांच्या दरम्यान शहराती ५६ कुर्बानी सेंटर येथे एकूण ८०६७ जनावरांची कुर्बानी केली गेली.तर या निमित्त पालिकेच्या तिजोरीत १७ लाख ८९ हजार ६५० रुपयाचा महसूल फी स्वरुपात वसुली झाली आहे.बकरी ईदसाठी ५६ कुर्बानी केंद्राकरिता विविध वाहन ,तर कुर्बानीनंतर तेथील भागाची स्वच्छता करण्यासाठी पाण्याचे टँकरचे यांची पूर्वनियोजित व्यवस्था करण्यात आली होती. कुर्बानीपुर्वी जनावरांची तपासणी करण्याकरिता पशुवैद्यकीय विभागाकडून ६० पशुवैद्यकीय अधिकारी सुद्धा नियुक्त होते.यावर्षी प्रत्येक प्रभागसमिती निहाय वाहनांचे सुयोग्य वाटप करुन ती वाहने आदल्या दिवशीच प्रभाग समितीमध्ये रवाना करण्यात आली होती.ज्यामुळे कुर्बानींनंतर अपशिष्ट उचलणे, तेथे पाण्याने स्वच्छता करणे आणि औषध फवारणी करणे ही कामे वेळेआधीच पुर्ण करण्यात आरोग्य विभागाला यश आले आहे. महानगरपालिकेच्या या व्यवस्थे बद्दल स्थानिक नागरीक,माजी नगरसेवक तसेच समाजसेवक यांनी देखील पालिका प्रशासनाच्या सुयोग्य नियोजन बद्दल समाधान व्यक्त करुन प्रशंसा केली आहे.तर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांनी यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कामाचे कौतुक केले आहे. मार्केट,आरोग्य,पाणी पुरवठा,वाहन विभाग तसेच पशु वैद्यकीय अधिकारी आणि पोलीस प्रशासन या सर्वांच्या आपापसातील समन्वय आणि कर्मचाऱ्यांचे नियोजन यामुळे तसेच,सर्व पालिका कर्मचारी संघटना आणि शहरातील नागरिकांनी केलेल्या सहकार्यामुळे बकरी ईद हा सण आनंदात तसेच शांततेत पार पडल्याचे नमुद करुन सर्वांचे आभार व्यक्त केले आहेत.

# गरमागरम मुगडाळ भजी

झटपट रेसिपी

दोस्तांनो, आता प्रत्येकाला पावसाचे वेध लागले आहेत. रिमझिम पावसात गरमागरम भजीचा आस्वाद घेण्यासारखा दुसरा आनंद नाही. हॉस्टेलमध्ये गप्पांचा फड जमवताना मस्त मूग डाळ भजी समोर असतील तर दोस्तांची मैफल छान रंगेल. मूग डाळ भजीची रेसिपी जाणून घेऊ.

**सामग्री:** अर्धा किलो मूग डाळ,चमचाभर आलं-लसूण पेस्ट, बारीक चिरलेली हिरवी मिरची, चिरलेली कोथिंबिर, अर्धा टी स्पून चाट मसाला, एक चमचा गरम मसाला, चिमूटभर हिंग, मीठ आणि तेल.

**कृती:** मूग डाळ रात्रभर भिजत घाला. सकाळी पाणी काढून मिक्सरमध्ये रवाळ वाटून घ्या. एका भांड्यात काढून त्यात हिंग, गरम मसाला, चाट मसाला, आलं-लसूण पेस्ट, मिरचीचे तुकडे, कोथिंबिर आणि मीठ घालून नीट मिक्स करा. कढईत तेल गरम करा. भजीचं पीठ या तेलात हळूच सोडा. नीट तळून घ्या. सॉस किंवा चटणीसोबत खा.



# जोश

## फंडू एसएमएस

धडकने लगे दिल की तारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो।

उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

# सीएची तयारी सोडून रमला मसाला शेतीत

अचिव्हर

बिहारमधील मुझफ्फरपूरमधून एक अनोखी यशोगाथा समोर आली आहे. पारंपारिक शेतीपासून दूर जाऊन, एक तरुण मसाल्याच्या शेतीकडे वळला. सीएची तयारी सोडून त्याने शेती करण्याचा विचार केला. त्याच्या प्रयत्नांना फळ आलेले दिसत आहे. एवढेच नाही, तर तो जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांनाही प्रेरणा देत आहे. मुजफ्फरपूरमध्ये शेतीने प्रेरित होऊन विकास कुमार नावाच्या एका तरुणाने आपली सीएची तयारी सोडून मसाल्यांची शेती सुरू केली.

**सुरुवातीला त्रास**

विकास कुमारला सुरुवातीला अनेक अडचणी आल्या. हळूहळू त्याचे उत्पन्न वाढत गेले. सध्या तो दरमहा किमान १ ते १.५ लाख रुपये कमावत आहे. शेतीतून उत्पन्न वाढवण्यासाठी त्याने एक रोपवाटिकादेखील सुरू केली आहे. तिथून तो मसाल्याच्या पिकांच्या रोपांची विक्री करतो. विकास कुमार या कामावर खूप खूश आहे. तो म्हणतो, एवढी कमाई गावात कुटुंबासह राहण्यासाठी पुरेशी आहे. आता त्याची मोठ्या प्रमाणात मसाले वाढवण्याची तयारी सुरू आहे.



**मसाल्यांच्या पिकाने बदलले आयुष्य**

विकास कुमार मुशारी ब्लॉकमधील रोहुआ गावचा रहिवासी आहे. त्याने वाणिज्य शाखेत पदवी प्राप्त केली आहे. त्याचे स्वप्न सीए होण्याचे होते. वडील शेतकरी आहेत. शेती आणि बागकामातील त्यांचे समर्पण आणि कठोर परिश्रम पाहून विकास कुमारने आपला विचार बदलला. सीएची तयारी सोडून दिली. घरी शेती आणि बागकामाला प्रोत्साहन देण्यासाठी मसाल्यांवर संशोधन केले. रात्री झोपताना त्याच्या मनात मसाल्यांच्या शेतीचा विचार आला.

**मसाल्याच्या पिकांची रोपवाटिका**

विकास कुमार म्हणतो, त्याने पश्चिम बंगालमधून दालचिनी, वेलची, लवंग यासह सर्व प्रकारच्या मसाल्याच्या वनस्पती आणल्या आणि त्यांची लागवड करून त्याचे उत्पन्न वाढवले. मसाल्याची लागवड ही जिल्ह्यातील एक अनोखी गोष्ट आहे. जवळच्या शेतकऱ्यांना मसाल्याच्या शेतीबद्दल कळले तेव्हा तेही ते मागण्यासाठी येऊ लागले. मसाल्याच्या वनस्पतींची मागणी पाहून त्याने रोपवाटिका सुरू केली. आता दरमहा किमान १ ते १.५ लाख रुपये उत्पन्न आहे. उत्पन्नात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

## गॅजेटच्या दुनियेत

### गुगलचा 'एआय' चष्मा साधणार संवाद

'गुगल'ने त्यांच्या गुगल आय/ओ २०२५ या वार्षिक डेव्हलपर कॉन्फरन्समध्ये अनेक मोठ्या आणि आश्चर्यकारक घोषणा केल्या आहेत. या वेळी कंपनीचे संपूर्ण लक्ष 'आर्टिफिशियल इंटेलिजेंस' (एआय) वर होते. या परिषदेत सर्वाधिक चर्चेचा विषय म्हणजे गुगलचे नवीन स्मार्ट चष्मे. ते 'अँड्रॉइड एक्सआर' तंत्रज्ञानावर आधारित आहेत. या चष्म्यांमध्ये 'गुगल'चा शक्तिशाली 'जेमिनी एआय' वापरण्यात आला आहे. एका कार्यक्रमात 'स्मार्ट ग्लास'चे प्रदर्शन करण्यात आले. तिथे दोन गुगल प्रतिनिधी, एक हिंदी बोलणारा आणि दुसरा फारसी होते. कोणत्याही भाषेच्या अडथळ्याशिवाय ते संवाद साधू शकले. हे सर्व शक्य झाले ते चष्म्यातील 'एआय फीचर'मुळे. ते दोघांनाही संभाषण इंग्रजीत भाषांतरित करून समजण्यास मदत करत होते. म्हणजे आता संवादात भाषा अडथळा ठरणार नाहीत. हे चष्मे केवळ भाषांतरच करत नाहीत, तर वापरकर्त्यांच्या प्रश्नांची उत्तरेदेखील देऊ शकतात. म्हणजे आता तुम्हाला काही माहिती हवी असेल तर फक्त प्रश्न विचारा. चष्मा तुम्हाला लगेच उत्तर देईल.




## टेक टॉक

### अँड्रॉइड एक्सआर



या कार्यक्रमात 'गुगल'ने 'अँड्रॉइड एक्सआर प्लॅटफॉर्म'ची घोषणा केली. तो क्वालकॉम आणि सॅमसंगच्या सहकार्याने विकसित करण्यात आला आहे. या नवीन प्लॅटफॉर्मचा उद्देश स्मार्टफोनच्या पलीकडे जाऊन 'स्मार्ट ग्लासेस'सारख्या उपकरणांमध्येदेखील अँड्रॉइड अनुभव प्रदान करणे हा आहे. 'गुगल'च्या म्हणण्यानुसार प्रोजेक्ट मोहन अंतर्गत अँड्रॉइड एक्सआर या वर्षीच लाँच केला जाईल. कंपनीने 'स्मार्ट चष्म्या'च्या किंमतीबद्दल अद्याप कोणतीही माहिती दिलेली नसली तरी लवकरच त्याची किंमतदेखील उघड होईल.

## ॲप वर्ल्ड

### 'मेटा'शी थेट स्पर्धा

'गुगल'चे हे पाऊल 'स्मार्ट ग्लासेस' आणि 'मेटाव्हर्स' सारख्या प्रकल्पांमध्ये आधीच सहभागी असलेल्या 'मेटा'शी थेट स्पर्धा मानले जात आहे. गुगल ग्लास आणि अँड्रॉइड एक्सआर दोन्ही प्लॅटफॉर्म वापरकर्त्यांना एक नवीन डिजिटल अनुभव देण्याचा दावा करतात. या कार्यक्रमात 'गुगल'ने 'एचपी'च्या सहकार्याने 'गुगल बीम' हे नवीन व्हिडीओ कम्युनिकेशन डिव्हाइस सादर केले. याशिवाय 'गुगल मीट'मध्ये लाईव्ह ट्रान्सलेशनची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे वेगवेगळ्या भाषांमधील लोक एकमेकांशी सहजपणे बोलू शकतील. एवढेच नाही तर कंपनीने व्हिडीओ जनरेशन प्लॅटफॉर्म व्हीओ ३ ची एक नवीन आवृत्ती देखील लाँच केली आहे. त्यात आता नेटिव्ह साउंड सपोर्ट असेल आणि व्हिडीओ बनवणे पूर्वीपेक्षा सोपे होईल. कंपनीला फक्त स्मार्ट फोनपुरते मर्यादित राहायचे नाही.




# डेटा वाचवायचाय?

टेक्नोहेल्थ


हुशार युजर्स काही सोप्या पद्धतींचा अवलंब करतात. त्यामुळे इंटरनेटचा वापर कमी होऊनही त्यांचे काम सुरळीत होते. यासाठी प्रत्येक हुशार युजर पुढील ५ सोप्या आणि प्रभावी युक्त्या वापरतो.

*** ॲप्सना ऑटो-अपडेट होण्यापासून थांबवा**

अनेक ॲप्स तुमच्या नकळत बॅकग्राउंडमध्ये अपडेट होतात. त्यामुळे डेटा खूप लवकर खर्च होतो. हुशार युजर्स ऑटो-अपडेट्स बंद करतात आणि ते फक्त वाय-फायवरून अपडेट करण्यासाठी सेट करतात. यामुळे मोबाईल डेटाची बचत होईल आणि 'वाय-फाय'शी कनेक्ट झाल्यावर आवश्यक अपडेट्स मिळतील.

*** डेटा सदोदित सुरू ठेवू नका**

तुमचा फोन हवामान ॲप्स, सोशल मीडिया ॲप्स किंवा ईमेल सारख्या अनेक ॲप्सना न विचारता इंटरनेटशी कनेक्ट करत राहतो. हे सर्व बॅकग्राउंडमध्ये डेटा वापरत राहतात. अशा परिस्थितीत, तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही फोन सेटिंग्जमध्ये जाऊन या ॲप्सचा बॅकग्राउंड डेटा बंद करू शकता. त्यामुळे डेटा फक्त गरजेनुसार वापरला जातो.




*** व्हिडीओच्या गुणवत्तेकडे लक्ष द्या**

बहुतेक ॲप्स आपोआप उच्च-गुणवत्तेचे व्हिडीओ प्ले करतात. त्यामुळे जास्त डेटा वापरला जातो; परंतु इंटरनेट योग्य प्रकार वापरणारे व्हिडीओची गुणवत्ता ४८० डीपीआय किंवा त्यापेक्षा कमी वर सेट करतात. युट्यूब, इंस्टाग्राम किंवा फेसबुकवरील व्हिडीओची गुणवत्ता मॅन्युअली कमी करता येते.

*** डेटा सेव्हर मोड चालू करा**

डेटा वाचवण्यासाठी तुम्ही तुमच्या फोनमध्ये 'डेटा सेव्हर मोड' देखील चालू ठेवू शकता. यामुळे फोन स्वतःच अनावश्यक ॲप्सना डेटा देण्यापासून थांबवतो. तुम्ही क्रोम ब्राउझर वापरत असाल, तर त्यात 'डेटा सेव्हिंग फीचर'देखील आहे. त्यामुळे 'वेबपेज' हलके होते आणि कमी डेटामध्ये लोड करते.

*** वाय-फायचा योग्य वापर**

मोफत वाय-फाय उपलब्ध असेल तर मोबाईल डेटा बंद करा आणि वाय-फायशी कनेक्ट व्हा.

# उन्हाळ्यात हे कपडे देतात थंडावा आणि आरामही !

फॅशन पॅशन

उन्हाळ्याच्या काळात कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी, बहुतेक लोक घरीच राहणे पसंत करतात. या ऋतूतील कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी योग्य कपडे निवडणे खूप महत्त्वाचे आहे. उन्हाळ्यात घरी राहून, लोकांना हलके आणि जुने कपडे घालायला आवडते. अशा कपड्यांमध्ये कमी गरम होते.



**उन्हाळ्यासाठी पाच सर्वोत्तम कापड प्रकार**

*** कॉटन फॅब्रिक:** हे सर्वात प्रसिद्ध नैसर्गिक फॅब्रिकपैकी एक आहे. ते उन्हाळ्यासाठी सर्वोत्तम मानले जाते. कापसाच्या रोपात आढळणाऱ्या तंतुमय गोळ्यांपासून बनवलेले हे कापड घाम सहजपणे शोषण्यास मदत करते. सुती कापडामुळे तंतूंमधून हवा वाहू लागते. त्यामुळे शरीर थंड राहते. हे नैसर्गिक आणि हलके कापड उन्हाळ्यात घालण्यासाठी सर्वोत्तम आहे.

*** शीअर फॅब्रिक:** उन्हाळ्यात सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या कापडांपैकी एक म्हणजे शीअर फॅब्रिक. हे पूर्णपणे सुती कापड आहे. इतर जड कापडांप्रमाणे, हे कापड उन्हाळ्यात तुमच्या शरीराला चिकटत नाही.

*** लिनन फॅब्रिक:** लिनन हे कपाशीच्या तंतूंपासून बनवलेले एक नैसर्गिक कापड आहे. हे जगातील सर्वात जुन्या कपड्यांपैकी एक मानले जाते. हे कापड सुती कापडापेक्षा मजबूत असते. तथापि, त्याची किंमत सुती कापडापेक्षा जास्त असते.

*** रायन रेयॉन:** हे उन्हाळ्यासाठी चांगले कापड आहे. त्याच्या कृत्रिम स्वरूपामुळे ते हलके असते आणि उष्ण हवामानात शरीराला चिकटत नाही. उन्हाळ्यात हे कापड घालण्यास खूप आरामदायी आहे.

*** शिफॉन कापड:** हे सर्व कापडांमध्ये सर्वात हलके आणि मऊ असते. स्टाईलचा विचार केला तर, शिफॉन फॅब्रिक तुमचा उन्हाळा अधिक आरामदायी बनवते. साडी, ब्लाउज, शर्ट, कुर्ती बनवण्यासाठी शिफॉन फॅब्रिक चांगले आहे.

# आईला नातं मान्य नाही

मॅच मेकिंग

मी २६ वर्षांची तरुणी असून उत्तम करीअर करते आहे. माझ्या वडिलांच्या मद्यपानाच्या व्यसनामुळे आई त्यांच्यापासून वेगळी झाली. तिनेच मला आणि बहिणीला वाढवलं. तारुण्यातही मला वाईट अनुभव आले. नोकरी लागल्यानंतर माझ्या आयुष्याला एक दिशा मिळाली. माझी आई आम्हा बहिणींची खूप काळजी करते. ती थोड्या जुन्या वळणाची आहे. मास्टर्स पदवी मिळवल्यानंतर आईने माझ्यासाठी स्थळं शोधायला सुरूवात केली. लग्नाला माझी ना नव्हती. पण तिने माझ्या पसंतीकडे पूर्ण दुर्लक्ष केलं. तिला योग्य वाटणाऱ्या मुलाशी माझं लग्न लावून द्यायचं होतं. मधल्या काळात मी एका मुलाच्या प्रेमात पडले. दीड वर्ष एकत्र घालवल्यानंतर आईला याबद्दल सांगितलं. पण तिला हे नातं मान्य नाही. तो ख्रिश्चन आणि मी हिंदू आहे. त्यातच तो माझ्यापेक्षा सहा महिन्यांनी लहान आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यामुळे तो माझ्यासाठी योग्य नसल्याचं तिचं म्हणणं आहे. ती माझा मानसिक आणि शारीरिक छळ करते आहे. माझ्यासाठी तोच योग्य असल्याचं अनेकदा समजावूनही ती ऐकत नाही. आमचं नेहमी भांडण होतं. मी काय करू?



**उत्तर :** आईने तुम्हा दोघा बहिणींना एकटीने वाढवलं. त्यामुळे तिला तुमची खूप काळजी वाटते. तिच्याप्रमाणे तुझं आयुष्य उध्वस्त होऊ नये, असंही तिला वाटत असावं. म्हणूनच तुमच्या लग्नाच्या बाबतीत ती खूपच जपून पावलं टाकत आहे. महत्त्वाचं म्हणजे या मुलाबद्दल तुला खात्री वाटते का, तो तुझा आणि तुझ्या कुटुंबाचा आदर करेल का, याचा विचार कर. आईशी मनमोकळा संवाद साध. या नात्याला तिचा का नकार आहे, हे जाणून घे. हा मुलगा कसा योग्य आहे हे तिला पटवून दे. गरज पडली तर समुपदेशकांची मदत घेता येईल.



# आवर्जून पाहा 'ही' ठिकाणे

भटकंती

राजस्थान शाही वारशासाठी, भव्य किल्ल्यांसाठी आणि वाळवंटासाठी जगभर प्रसिद्ध आहे. पण येथील तलाव स्वर्गापेक्षा कमी नाहीत. दरवर्षी लाखो देशी तसेच परदेशी पर्यटक केवळ किल्ले आणि राजवाडे पाहण्यासाठीच नव्हे तर येथील तलावांच्या सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी येतात. येथील किल्ल्यांसोबतच सुंदर तलावही लोकांना आकर्षित करतात. राजस्थानमधील उदयपूर जिल्ह्याला तलावांचे शहर म्हटले जाते. या ठिकाणचे तलाव अवश्य पाहा

*** पिछोला तलाव**

पिछोला तलाव राजस्थानातील उदयपूर जिल्ह्यात आहे. हा तलाव उदयपूरच्या सौंदर्याचा आणि ऐतिहासिक वारश्याचा महत्त्वाचा भाग आहे. उदयपूर शहराच्या मध्यभागी असलेला हा तलाव अरवली पर्वतरांगांनी वेढलेला आहे. त्यामुळे त्याचे नैसर्गिक सौंदर्य आणखी खुलते. त्याच्या सभोवतालचे टेकड्या, राजवाडे आणि घाट खूपच आकर्षक दिसतात. पर्यटकांसाठी या तलावात बोटिंगची सुविधा आहे. सूर्यास्ताच्या वेळची बोट सफर विशेष लोकप्रिय आहे. इथे बोटीतून प्रवास करण्याची मजा वेगळीच असते. हा तलाव अंदाजे ६.९६ चौरस किलोमीटरमध्ये पसरलेला आहे. तलाव परिसरात किंगफिशर, इग्रेट्स, टर्न्स, कूट आणि बगळे असे विविध प्रजातींचे पक्षी आढळतात. त्यामुळे पक्षी निरीक्षकांसाठी हे एक उत्तम ठिकाण आहे. पिछोला तलावाच्या मध्यभागी चार बेटे आहेत. जग मंदिर हे तलावाच्या मध्यभागी बांधलेले आहे. २०१९ पासून उदयपूरमध्ये मुंबई आणि गोवाच्या धर्तीवर क्रूझ सेवा सुरू झाली आहे. तलावाच्या काठावर सिटी पॅलेस, बागोर की हवेली आणि इतर ऐतिहासिक इमारती आहेत. त्या पर्यटकांसाठी आकर्षण ठरतात.

*** फतेहसागर तलाव**

उदयपूरच्या 'लेक सिटी' या नावाला सार्थ ठरवणारा फतेहसागर हा तलाव पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे. अरवली टेकड्यांनी वेढलेला हा तलाव शांत वातावरणासाठी खूप प्रसिद्ध आहे. येथे भेट देण्यासाठी दूरदूरहून पर्यटक येतात. फतेहसागर तलाव बोटिंगसाठी खूप प्रसिद्ध आहे. सुमारे चार चौरस किलोमीटर क्षेत्रावर हा तलाव पसरलेला आहे. हा तलाव प्रामुख्याने पाणीपुरवठा आणि शेतीसाठी बांधला गेला. परंतु आता तो पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. तलावाच्या काठावरील रस्त्यावर ड्राइव्ह करणे किंवा सायकलिंग करणे यात वेगळी मजा आहे. हा रस्ता स्थानिकांमध्ये 'फतेहसागर ड्राइव्ह' म्हणून ओळखला जातो.

# कमी गुणांची काळजी नको

वेगळ्या वाटा

बारावी तसंच पदवी परीक्षेत कमी गुण मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांचा चांगलाच हिरमोड होतो. अशावेळी आपल्या आवडीनिवडींना मुरड घालावी लागते. वेगळे अभ्यासक्रम निवडावे लागतात. काही तडजोडी कराव्या लागतात. पण मित्रांनो, कमी गुण मिळाले म्हणून निराश होण्याची आवश्यकता नाही. आज करीअरचे अनेक मार्ग तुमच्यापुढे आहेत. आपली गुणवत्ता, आवड, कौशल्यं या बाबींचा विचार करून योग्य अभ्यासक्रमाची निवड तुम्ही करू शकता.




* पदवीला प्रवेश घेण्याऐवजी पॉलिटेक्निक डिप्लोमा अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येईल. यासोबतच इंटिरिअर डेकोरेशन, एअरलाईन क्रू ट्रेनिंग, मास कम्युनिकेशन अँड व्हिडिओ प्रॉडक्शन, ट्रॅव्हल अँड टूरिझम मॅनेजमेंट, फॅशन टेक्नॉलॉजी, इव्हेंट मॅनेजमेंट, टेक्सटाईल ग्राफिक डिझाइन यांसारख्या विषयांशी संबंधित डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण करू शकता.

* पब्लिक रिलेशन्स, कलिनरी आर्टस,ॲडव्हेंचर स्पोर्टस, फिटनेस ट्रेनिंग, वेब डिझायनिंग, व्हिडिओ एडिटिंग, टूर गाईड, सोशल मीडिया मार्केटिंग, ई-कॉमर्स, फॅशन स्टायलिंग, इव्हेंट मॅनेजमेंटसारख्या क्षेत्रांमध्येही अनेक संधी आहेत.

* आवडत्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला नाही तर तुम्ही दूरस्थ शिक्षण पद्धतीने पदवी मिळवू शकता. बरीच विद्यापीठं ही सुविधा उपलब्ध करून देतात.

* व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी वेगळ्या प्रवेश परीक्षा असतात.



# सेन्सेक्सची 256 अंकांची उसळी
## गुंतवणूकदारांनी कमावले 4 लाख कोटी



**मुंबई, दि. ९ प्रतिनिधी**

भारतीय शेअर बाजार आज ९ जून रोजी सलग चौथ्या दिवशी वधारून बंद झाले. सेन्सेक्स २५६ अंकांनी वधारला. निफ्टीने २५,१०० चा आकडा ओलांडला. यामुळे आज गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ४ लाख कोटी रुपयांची वाढ झाली. जागतिक बाजारपेठेतील मजबूत संकेत आणि आरबीआयच्या अलिकडच्या निर्णयांमुळे बाजारातील भावना उंचावल्या राहिल्या.

बीएसई स्मॉलकॅप निर्देशांक १.१९ टक्क्यांनी आणि मिडकॅप निर्देशांक १.०३ टक्क्यांनी वधारला. क्षेत्रीय निर्देशांकांत रिअल्टी क्षेत्र वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांक वधारून बंद झाले. आयटी, बँकिंग आणि मीडिया शेअर्समध्ये सर्वाधिक वाढ दिसून आली. बँक निफ्टीने आज व्यवहारादरम्यान पहिल्यांदाच ५७,००० चा टप्पा ओलांडत नवीन सार्वकालिक उच्चांक गाठला. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स २५६.२२ अंकांनी वाढून ८२,४४५.२१ वर बंद झाला. तर निफ्टी १००.१५ अंकांनी किंवा ०.४०% ने वाढून २५,१०३.२० रुपयांवर पोहोचला.

आज ६ जून रोजी बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ४५५.०८ लाख कोटी रुपयांवर पोहोचले, जे मागील व्यवहार दिवशी म्हणजेच गुरुवार, ५ जून रोजी ४५१.१३ लाख कोटी रुपये होते. अशाप्रकारे, बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे

**सेन्सेक्स 82,445**

**निफ्टी 25,103**

बाजार भांडवल ३.९५ लाख कोटी रुपयांनी वाढले आहे. दुसऱ्या शब्दांत गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ३.९५ लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

बीएसई सेन्सेक्समधील ३० पैकी २२ शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये, कोटक महिंद्रा बँकेच्या शेअर्समध्ये सर्वाधिक ३.२० टक्के वाढ झाली. यानंतर, बजाज फायनान्स, ॲक्सिस बँक, पॉवर ग्रिड आणि इंडसइंड बँकेचे शेअर्स १.६० टक्क्यांपासून २.५१ टक्क्यांपर्यंत वाढीसह बंद झाले.

तर सेन्सेक्सचे उर्वरित ८ शेअर्स घसरून बंद झाले. यामध्ये इटरनल सर्वाधिक १.८९ टक्क्यांनी घसरला. तसेच आयसीआयसीआय बँक, टायटन, महिंद्रा अँड महिंद्रा (एम अँड एम) आणि अदानी पोर्ट्सचे शेअर्सही घसरले. सोमवार ९ जून रोजी सोन्याच्या किंमतीत घसरण झाली. दिल्लीत २२ कॅरेट सोने ८९,९४० रुपये आणि २४ कॅरेट सोने ९८,११० रुपये प्रति १० ग्रॅम होते. गेल्या आठवड्याच्या तुलनेत आज सोने १६३० रुपयांनी स्वस्त झाले आहे. मुंबईतही २२ कॅरेट सोने ८९,७९० रुपये आणि २४ कॅरेट सोने ९७,९६० रुपये प्रति १० ग्रॅम दराने विकले जात आहे. पटना, लखनौ, जयपूर सारख्या शहरांमध्येही सोन्याचे दर याच्या आसपासच आहेत.

# राजा रघुवंशी हत्येप्रकरणी पत्नीसह चौघांना अटक

**गाझीपूर, दि. ९ वृत्तसंस्था**



मेघालयात हनिमूनसाठी गेलेल्या इंदूरमधील नवविवाहित दाम्पत्य राजा रघुवंशी आणि सोनम रघुवंशी प्रकरणी आज झालेल्या खुलाशाने सर्वांनाच धक्का बसला आहे. राजा रघुवंशी हत्या प्रकरणाचे गूढ उकलण्यात पोलिसांना यश आले आहे. पत्नी सोनम रघुवंशीसह अन्य चौघांना अटकही झाली आहे. हे संपूर्ण प्रकरण पूर्वनियोजित कट असल्याची प्राथमिक माहितीही पोलीस तपासात समोर येत आहे.

राजा रघुवंशी आणि त्यांची पत्नी सोनम २२ मे रोजी हनिमूनसाठी शिलाँगला गेले होते. २३ मे रोजी संध्याकाळपासून ते चेरापुंजी जवळील ओसारा हिल्स येथून बेपत्ता झाले होते. त्यानंतर त्यांचा कुटुंबाशी संपर्क झाला नाही.राजा रघुवंशी यांचा मृतदेह ११ दिवसांनंतर शिलाँगमधील एका पर्यटनस्थळी २०० फूट खोल दरीत झाडावर लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. ड्रोनच्या मदतीने त्यांचा मृतदेह शोधून काढण्यात आला. नवदाम्पत्यांच्या कुटुंबियांनी या प्रकरणी सीबीआय चौकशीची आणि सोनमचा शोध घेण्यासाठी भारतीय लष्कराची मदत घ्यावी, अशी मागणी केली होती.

मागील काही दिवस पोलीस हा सोनम रघुवंशीचा शोध घेत होते. ती उत्तर प्रदेशातील वाराणसी-गाझीपूर मुख्य रस्त्यावरील काशी ढाब्यावर सापडल्याने या प्रकरणाला अनपेक्षित वळण मिळाले. उत्तर प्रदेशचे वरिष्ठ पोलीस अधिकारी अमिताभ यश यांनी माध्यमांनासांगितले की, मूळची मध्य प्रदेशमधील इंदूर येथील रहिवासी असणारी सोनम रघुवंशी (वय२४) ही रविवारी रात्री वाराणसी गाझीपूर मुख्य रस्त्यावरील काशी ढाब्यावर सापडली. तिला प्राथमिक उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यानंतर तिला पोलिसांनी ताब्यात घेतले.

याचवेळी पोलिसांनी ललितपूरमधील महारौनी पोलिस स्टेशन परिसरातील आकाश कुमार या व्यक्तीलाही अटक केली आहे. मात्र सोनम ही गाझीपूरला कशी पोहचली? याची माहिती उत्तर प्रदेश पोलिसांना मिळालेली नाही. ती रेल्वेने आली की बसने याची चौकशी सुरु आहे. आता सोनमला मेघालयला घेऊन जाण्यासाठी मेघालय आणि इंदूर पोलिसांचे पथक गाझीपूरमध्ये येण्याची अपेक्षा आहे.

गाझीपूरमधील काशी ढाबाच्या मालकाने पोलिसांना सांगितले की, मध्यरात्री एक वाजता एक तरुणी माझ्या ढाब्यावर रडत आली. तिने तिच्या भावाला फोन करण्यासाठी फोन मागितला. मात्र तिला ओळखत नसल्याने फोन दिला नाही. तिची अवस्था पाहून त्याने तत्काळ या घटनेची माहिती उत्तर प्रदेश पोलिसांना दिली. तत्काळ पोलीस ढाब्यावर आले. तिला ताब्यात घेवून पोलीस निघून गेले.

**सोनमच्या वडिलांनी फेटाळला हत्येचा आरोप**

सोनमचे वडील देवी सिंह यांनी आपल्या मुलीवर लावण्यात आलेले आरोप फेटाळले आहेत. तसेच त्यांनी मेघालयच्या पोलिसांवर गंभीर आरोपही केला आहे. माध्यमांशी बोलताना देवी सिंह म्हणाले की, सोनम रघुवंशी हत्या प्रकरणी मेघालयचे मुख्यमंत्री खोटे बोलत आहेत. त्यांचीही सीबीआय चौकशी झाली पाहिजे. मला खात्री आहे की मुख्यमंत्रीही खोटे बोलत आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लवकरात लवकर सीबीआय चौकशीसाठी पथक पाठवावे. मेघालय पोलिस खोटे बोलत आहेत. त्यांनी कोणतीही चौकशी केली नाही. राजा रघुवंशीच्या हत्येत मेघालय पोलिसांचा सहभाग आहे याची मला खात्री आहे. माझी मुलगी स्वतःहून गाजीपूरला कशी पोहोचली. तिला मेघालयात अटक करण्यात आली नाही, असे सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केले.

# दिग्दर्शक पार्थो घोष कालवश

**मुंबई, दि. ९ प्रतिनिधी**

हिंदी चित्रपटाचे प्रसिद्ध दिग्दर्शक पार्थो घोष यांचे निधन झाले आहे. मुंबईतील निवासस्थानी हार्ट ॲटॅक आल्याने त्यांचे निधन झाले आहे. ऋतुपर्णा सेनगुप्ताने आपल्या सोशल मीडिया अकाऊंटच्या माध्यमातून ही माहिती दिली. ते ७४ वर्षांचे होते.



ऋतुपर्णा सेनगुप्ताने भावूक श्रद्धांजली वाहिली आहे. ऋतुपर्णा सेनगुप्ताने सोशल मीडियावर माहिती देत लिहिलं की, "खूप दुःखी आहे. आम्ही एक उत्तम निर्माता आणि एक निर्मळ मनाच्या माणसाला गमावलं. पार्थो दा, आपण जी सिनेमाई जादू दाखवली, ती नेहमी लक्षात राहिल."

पार्थो यांनी १९८५ मध्ये असिस्टेंट डायरेक्टर म्हणून करिअरला सुरुवात केली होती. १९९१ मध्ये थ्रिलर चित्रपट '100 डेज' पहिला सुपरहिट चित्रपट ठरला होता. पुढे दिव्या भारती सोबत १९९२ मध्ये 'गीत' चित्रपट आणला होता. १९९३ मध्ये 'दलाल' हिट झाल्यानंतर एक यशस्वी दिग्दर्शक झाले. १९९६ मध्ये रिलीज झालेला 'अग्नि साक्षी' सर्वात हिट ठरला. ज्यादा पॉपुलर पार्थो घोष यांनी १५ हून अधिक चित्रपट आणले. त्यामध्ये 'तीसरा कौन?', 'गुलाम-ए-मुस्तफा', 'युगपुरुष', 'एक सेकंड... जो जिंदगी बदल दे?' यासारख्या चित्रपटांचा समावेश आहे. २०१८ मध्ये 'मौसम इकरार के दो पल प्यार के'मधून त्यांनी वापसी केली होती.

# आषाढी यात्रेनिमित्त पांडुरंगाचे २४ तास दर्शन

**पंढरपूर, दि. ९ प्रतिनिधी**

आषाढी यात्रा कालावधीत मोठ्या संख्येने येणाऱ्या भाविकांना श्री देव विठ्ठलाचे सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी २७ जूनपासून २४ तास दर्शनव्यवस्था उपलब्ध होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. आषाढी यात्रेच्या अनुषंगाने मंदिर समितीची बैठक सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. शुद्ध आषाढी एकादशी ६ जुलै रोजी आहे.

यात्रेचा कालावधी २६ जून ते १० जुलै असा आहे. श्रीविठ्ठलाची शासकीय महापुजा २:२० वाजता मुख्यमंत्री, राज्य व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्निक केली जाणार आहे.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन व संवर्धन आराखड्यांच्या कामाचा आढावा घेण्यात आला, या यात्रेच्या पार्श्वभूमीवर मंदिर जतन व संवर्धनाची सध्या सुरू असलेली सर्व कामे अंतिम टप्प्यात आहे.

दर्शनरांगेत बॅरिकेडिंग करून वॉटरप्रुफ मंडप, ४ बाय ६ पत्राशेड विश्रांती कक्ष, फॅब्रिकेटेड शौचालये,



लाइव्ह दर्शन, कुलर, फॅन, सार्वजनिक सूचनाप्रणाली, मिनरल वॉटर, सुरक्षारक्षक नियुक्ती, आपत्कालीन सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

तसेच चहा-खिचडी वाटप, आरोग्य व्यवस्थेचे स्टॉल, २४ तास अन्नछत्र, बॅग स्कॅनर मशीन, हिरकणी कक्ष, नदीपात्रात चेंजिंग रूम, इत्यादी स्वरूपाच्या सोईसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

प्रतिवर्षीप्रमाणे विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार देणे, टोकन दर्शनाची चाचणी घेणे, इत्यादी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांना आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचे निमंत्रण १६ किंवा १७ जून रोजी मंदिर समितीच्या वतीने देण्यात येणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितले.

चंदनउटी पूजेची १३ जून रोजी सांगता पूजा होणार आहे. तसेच टोकन दर्शन प्रणालीची १५ जून रोजी पहिली चाचणी घेण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.


# भुशी धरणात बुडून दोघांचा मृत्यू

**लोणावळा, दि. ९ प्रतिनिधी**

पर्यटकांचे आकर्षण असलेल्या भुशी धरण्यात मित्रांसोबत पर्यटन व वर्षाविहासाठी आलेल्या उत्तर प्रदेश येथील दोन पर्यटकांचा बुडून मृत्यू झाला. महंमद जमाल (वय २२) आणि साहिल अश्रफ अली शेख (वय १९, मूळ रा. उत्तर प्रदेश, सध्या रा. येरगाव) अशी बुडून मृत्यू झालेल्या पर्यटकांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जमाल आणि साहिल हे त्यांच्या काही मित्रांबरोबर सकाळी वर्षा विहारासाठी लोणावळ्यात आले होते. दुपारी ते भुशी धरणाकडे फिरायला गेले आणि धरणाच्या पाठीमागील बाजूस असलेल्या पाण्यात पोहण्यासाठी उतरले. पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने साहिल आणि जमाल बुडू लागले. हे पाहून त्यांच्या मित्रांनी आरडाओरडा केला. आवाज ऐकून धरणाच्या परिसरात सुरक्षेसाठी तैनात असलेले पोलिस कर्मचारी व काही स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, मदत पोहोचेपर्यंत दोघे खोल पाण्यात बुडाले. पोलिस आणि शिवदुर्ग मित्र आपत्कालीन पथकाला माहिती दिली. दीड तासांच्या शोधमोहिमेनंतर दोघांचे मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आले. 'शिवदुर्ग मित्र'च्या पथकाने भुशी धरणात शोध घेऊन बुडालेल्या तरुणांचे मृतदेह बाहेर काढले.



# नेत्रदान -एक आशेचा किरण



**हॅलो डॉक्टर**

**लोकारोग्य**

भारतीय संस्कृतीत अगदी वैदिक काळापासून दानाचे महत्व सांगितलेले आहे.परंतु बदलत्या काळानुसार आता दानाची संकल्पना हि बदलेली दिसतेय. आपल्या शारीरिक व्याधींवर मात करण्यासाठी विविध प्रकारच्या शारीरिक अवयवांचं दान हल्ली मोठ्या प्रमाणात केले जाते. यामध्ये शरीराचा अत्यंत महत्वाचा भाग ज्याने आपण हि सृष्टी पाहू शकतो असे नेत्र दान अत्यंत महत्वाचे मानले गेले आहे. मृत व्यक्तीचे नेत्रदान केल्याने अनेंक अंध व्यक्तींना दृष्टी मिळून ते हे जग त्या मृत व्यक्तीच्या डोळ्याने पुन्हा पाहू शकतात. परंतु नेत्रदानाविषयी आपल्याकडे अद्यापही पाहिजे तितक्या प्रमाणात जनजागृती झालेली नाही. म्हणूनच, नेत्रदान म्हणजे नेमकं काय?नेत्रदानाचे महत्व काय आहे?नेत्रदान कोण आणि केंव्हा करू शकतो?या सर्व प्रश्नांचा वेध घेण्यासाठी नेत्रतज्ज्ञ डॉक्टर अभय आगाशे यांच्याशी साधलेला संवाद.

१]नेत्रदान हि संकल्पना स्पष्ट करण्या अगोदर सर्वसामान्यपणे आपल्या डोळ्यांची रचना असते हे सांगा?

आपल्या डोळ्याची रचना हि अगदी साधी असते. समोरचा सफेद रंगाचा भाग म्हणजे आपले बुबुळ असते.मधला पिवळा भाग म्हणजे रेटिना आणि मागच्या बाजूला ओप्टिव्ह नर्व्ह असते.बाहेरचा प्रकाश हा परावर्तित होऊन रेटिना पर्यंत पोहचतो. नंतर इलेक्ट्रिक सेन्समध्ये परावर्तित होऊन तो आपल्या मेंदूपर्यंत पोहचतो आणि आपण पाहू शकतो.

आपले बुबुळ हे अगदी संवेदनशील असते त्याला इजा पोहचली तर दृष्टी जाते. मात्र नेत्रदानामध्ये बुबुळाचा हाच सफेद भाग काढून तो दुसऱ्या व्यक्तीला परावर्तित करून त्याला दृष्टी मिळू शकते. नेत्रदानामध्ये केवळ बुबुळाचा हा भाग किंवा संपूर्ण डोळा कट करून तो दुसऱ्याला लावू शकतो. फक्त मृत व्यक्तीचे डोळे काढताना त्या व्यक्तीचे वय ,आजार लक्षात घेऊन हि प्रक्रिया केली जाते.

२]मरणोप्रांत नेत्रदान साधारण किती तासात करता येते?

एखाद्याने अगोदर नेत्रदानाकरिता नोंदणीकरण केलेलं असेल किंवा नसेल तरीही त्या मृत व्यक्तीच्या मृत्यूपश्चात ६ तासांच्या आत डोळे काढता येतात. नेत्रदाना करीत सर्व शासकीय महाविद्यालय,रुग्णालय आणि नेत्रपेढ्यांमध्ये प्रतिज्ञापत्र उपलब्ध असते.व्यक्ती मृत झाल्यानंतर त्याचे नातेवाईक आप्तस्वकीय देखील नेत्रदानाचा निर्णय घेऊ शकतात. फक्त मृत व्यक्तीचे डोळे बंद करावेत. त्याच्या डोक्याखाली उशी ठेवावी आणि आजूबाजूला पंखे किंवा एसी असेल तर तो बंद ठेवावा ज्यामुळे ते डोळे सूकत नाहीत हि काळजी घ्यावी.

३]नेत्रदान कोण कोण करू शकतो ?

कोणतीही मृत व्यक्ती अगदी १८ वर्षाच्या तरुणांपासून ते ८० वर्षांच्या वृद्धापर्यंत कुणीही नेत्रदान करू शकतो. फक्त काही व्यक्ती ज्यांच्या संपूर्ण शरीरात काही कारणामुळे एखाद्या आजारामुळे संसर्ग पसरलेला असेल,ज्या व्यक्तीला मॅनेन्जायटिस म्हणजे मेंदूचा विकार असेल अशी व्यक्ती किंवा कावीळ झालेली व्यक्ती असेल आणि कोरोना झालेल्या व्यक्तीच फक्त नेत्रदान करू शकत नाही.अन्यथा मधुमेह प्रमाणत असलेल्या व्यक्ती,उच्चरक्तदाब असलेल्या व्यक्ती,अगदी कर्करोग झालेल्या व्यक्ती देखील नेत्रदान करू शकतात.

४]नेत्रदान करताना काही चाचण्या असतात का?आणि नेत्रदानाची प्रक्रिया साधारण किती वेळेत पूर्ण होते ?

नेत्रदान करण्यासाठी चाचण्या नसतात. आपल्या डोळ्यांच्या बुबुळाला रक्तपुरवठा होत नसतो त्यामुळे कोणत्याही रक्तगटाचे व्यक्ती नेत्रदान करू शकतात.एखाद्या तरुण मृत व्यक्तीचे डोळेच साधारण पने सशक्त असल्यामुळे ते अंध व्यक्तीला लावले जातात. नेत्रदानाची प्रक्रिया हि १५ ते २ मिनिटांची असते. आणि ज्या व्यक्तीला डोळ्यांचं दान दिलेले आहे हि, शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्याला दोन दिवसात घरी पाठवले जाते.हे डोळे दुसऱ्यांचे असल्याने त्या व्यक्तीची प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी आणि डोळ्यांचा संसर्ग टाळण्यासाठी त्यांना औषध आणि काही ट्यूब डोळ्यात टाकण्यासाठी आम्ही देतो.मात्र त्यांना सतत फॉलो अप करिता आम्ही बोलवतो.

## 35 ते 49 वयोगटाच्या 50% भारतीय स्त्रियांचे वजन जास्त-एका अभ्यासातील निष्कर्ष



**जनआरोग्य**

लठ्ठपणा हा भारतीय स्त्रियांमध्ये वेगाने एक अबोल महामारी बनत आहे आणि हे विशेषत: जीवनशैलीतील बदल,उच्च तणावाचे वातावरण आणि बसून काम करणाऱ्या दिनचर्या चिंताजनक प्रवृत्तींना कारणीभूत ठरणाऱ्या शहरी भागांमध्ये दिसून येत आहे. इंडियन सोसायटी ऑफ असिस्टेड रिप्रॉडक्शन ने समर्थन पुरविलेल्या इंडियन जर्नल ऑफ ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनोकॉलॉजी रिसर्च मध्ये नुकत्याच प्रकाशित केल्या गेलेल्या एका पेपरमध्ये दक्षिण आशियाई स्त्रियांमध्ये मुख्य लठ्ठपणाचे प्रमाण असंतुलितरित्या जास्त असल्याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. 35 ते 49 वय असलेल्या सुमारे 50% भारतीय स्त्रिया आता वजन जास्त असणे किंवा लठ्ठपणा यांच्यासोबत आयुष्य जगत आहेत. हे त्यांच्या प्रजनन काळात सार्वजनिक आरोग्याची वाढती चिंता ठळक करून दाखवत आहे. असेही लक्षात आणून दिले गेले आले आहे की, 18-30 वय असलेल्या स्त्रिया तेवढेच वय असलेल्या पुरुषांच्या तुलनेत जास्त दराने लठ्ठपणाशी संबंधित आरोग्याच्या जोखमींप्रती असुरक्षित असल्याचे दर्शवित आहेत आणि हे पिढ्यानपिढ्या पसरलेल्या संकटाचा मुद्दा मांडत आहे.

एन.एफ.एच.एस-5 च्या आकडेवारीनुसार, भारतातील 33.5% शहरी स्त्रिया आणि 19.7% ग्रामीण स्त्रिया लठ्ठ असून आयुष्य जगत आहेत आणि जीवनशैलीतील बदल, तणाव आणि बसून काम करणाऱ्या सवयी या वाढीस कारणीभूत आहेत. आहार घेण्याच्या सवयी खराब असणे, शारीरिक हालचाली कमी करणे आणि पी.सी.ओ.एस व गर्भावस्थेतील मधुमेहासारख्या चयापचय विकारांचे प्रमाण वाढणे, यांच्यातील दुव्यावर अहवालात भर देण्यात आला आहे आणि त्यात लठ्ठपणाने ग्रस्त 23.1% स्त्रियांना गरोदरपणात गर्भावस्थेतील मधुमेह होतो आणि त्यामुळे माता व बाळ दोघांनाही धोका निर्माण होतो, संततीला नवजात आय.सी.यू मध्ये दाखल करण्याची आणि दीर्घकालीन आरोग्याच्या समस्यांचा तोंड देण्याची शक्यता जास्त होते. 30 किलो /मीटर पेक्षा जास्त बी.एम.आय असलेल्या स्त्रियांमध्ये गर्भपात होण्याचा धोका सुद्धा वाढतो.

## सत्वयुक्त अंबाडी

**आरोग्यम् धनसंपदा**

देशभरात कोरोनाचे रौद्र रूप आपण सगळ्यांनी अनुभवलं आहे. अनेक आरोग्यविषयक संस्था नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला देत आहेत. या सर्व स्थितीच्या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटनेनं लोकांना कोरोना काळात आपल्या आहारावर विशेष लक्ष द्यावं, असा सल्ला दिला आहे. जे लोक संतुलित आहार घेतात त्यांची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत असते, पालेभाज्यांचे महत्व व त्यांचे पोषण मूल्य सर्वज्ञानीत आहे. अंबाडी ही भारतात आढळणारी एक बहुगुणी औषधी वनस्पती आहे.जी पालेभाज्यांच्या प्रकारामध्ये मोडते. आंबट चवीची अंबाडीची भाजी ही चविष्ट तर असतेच शिवाय अनेक पोषकतत्त्वांनीही परिपूर्ण असते. यात टेट्राहायड्रोकॅनॉनिबॉल(टीएचसी) या रसायनाचे प्रमाण जास्त असते. त्यात ओमेगा ३ व ओमेगा ६ ही मेदाम्ले भरपूर प्रमाणात असतात. मानवी शरीरासाठी आवश्यक ते गुणधर्म अंबाडीच्या पानांमध्ये असते. अंबाडीच्या भाजीत आयर्न(लोह), व्हिटॅमिन-C, व्हिटॅमिन-A, व्हिटॅमिन-B6, फोलेट, कॅल्शियम, झिंक आणि अँटीऑक्सिडंटसारखे अनेक पोषकतत्वे भरपूर प्रमाणात असतात. भरपूर 'क' जीवनसत्व असणाऱ्या अंबाडीच्या भाजीत १८ ते २० टक्के तेलाचे प्रमाण असतेएस्कॉर्बिक ॲसिड म्हणजेच व्हिटॅमिन सी हा घटक रोगप्रतिकारकशक्ती वाढविण्यात आणि शरीरातील पांढऱ्या रक्त पेशींची संख्या वाढविण्यात मोठी भूमिका बजावते. अंबाडीची भाजी उच्च रक्तदाब कमी करून नियंत्रित ठेवण्यासाठी मदत करते. अंबाडी भाजीत अँटीऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असतात त्यामुळे कोलेस्टेरॉल कमी होते व रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत होते.अंबाडी भाजी ही फायबरचा एक चांगला स्त्रोत आहे जो रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी मदत करतो, पारंपारिकपणे ही भाजी मकाई, बाजरी आणि नाचणीच्या भाकरीसोबत खाल्ले जाते जे रक्तातील साखरेचे प्रमाण कमी करणारे संमिश्रित जेवण आहे.


संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# २५ वर्षांच्या प्रियकराकडून ३६ वर्षीय प्रेयसीची हत्या

**बंगळुरू, दि. ९ वृत्तसंस्था**

बंगळुरू येथून एक धक्कादायक घटना समोर आलली आहे. येथील पूर्णा प्रजना लेआउटमधील OYO हॉटेलच्या रूममध्ये एका २५ वर्षीय तरुणाने ३६ वर्षीय तरुणीची हत्या केल्याचे वृत्त आहे. घटनेची माहिती मिळताच जवळपासच्या परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पूर्णा प्रजना लेआउट येथील एका OYO हॉटेलच्या रूममध्ये 25 वर्षीय यशस ने आपली ३६ वर्षीय प्रेयसी हरिनी हिची कथीत हत्या केली. हे दोघेही केंगेरीचे रहिवासी असल्याचे समजते. यशस एक सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. मात्र, हिचा खुलासा दोन दिवसांनंतर रविवारी झाला.



या प्रकरणी सुब्रमण्यपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात माहिती देताना डीसीपी साऊथ लोकेश जगलासर म्हणाले, ६-७ जून रोजी बंगळुरूच्या सुब्रमण्यपुरा पोलीस ठाण्यातच्या हद्दीत एका ३६ वर्षीय महिलेची तिच्या एका जवळच्या मित्राने हत्या केली. आरोपी आणि मृत महिला एकमेकांना जवळपास एकावर्षापासून ओळखत होते.

संबंधित मृत महिला गेल्या दोन महिन्यांपासून आरोपीपासून हळू हळू दूर होत होती. यामुळे रागावलेल्या आरोपीने तिची चाकूने भोसकून हत्या केली. आरोपीला अटक करण्यात आली आहे.

# सासू-सासऱ्यांनी विधवा सूनेचे लग्न लावले
## बंगला-प्रॉपर्टीही नावावर

**बुलढाणा, दि. ९ प्रतिनिधी**

आज बदलत्या जमान्यात झटपट लग्नत जुळते पण ते लगेच तुटलेले देखील उदाहरणं दिवसेंदिवस वाढत आहे. लग्न जुळल्यानंतर ते आता सुखी संसाराच्या फेऱ्यांच्या नंतर सात जीवनात पर्यंत कसं टिकेल याची चिंता वाढत चालली आहे. मात्र जेव्हा एका वैधत्व आलेल्या सुनेसाठी सासू आणि सासरे यांनी मातापित्यांची भूमिका घेत तिला तिचे कुंकू सौभाग्याचं सिंदूर पुन्हा आणून दिले. तेव्हा दोन मुलांना देखील पितृछत्र मिळालं.

बुलढाण्यात नव्या विचारांच्या साखर पेरणीचे सर्व कौतुक होत आहे. अकाली वैधत्व आलेल्या सुनेसाठी सासू-सासरे यांनी माता पितांची



भूमिका आणि तिला तिचे सौभाग्याचे लेणे कुंकू शेतीवाडी, बंगल्यासह आणि दोन मुलांना पितृछत्र देत तिचा विवाह लावून दिला आहे. त्याच ठिकाणी नात्यातील नवरा मुलाचा कुटुंबात मुलाप्रमाणे स्वीकार केला आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील लाडनापुर तालुका संग्रामपूर येथील लेकीच्या या जगावेगळ्या आणि समाजाच्या डोळ्यात जळजळीत अंजन घालणारा एक आदर्श प्रस्थापित करणाऱ्या विवाहाची चर्चा संपूर्ण जिल्ह्यात होत आहे. २ जून हा नव्या विचारांची समाजात साखर पेरणी करणारा दिवस ठरला आहे. या दिवशी स्वातीला पुन्हा नव्याने जीवनसाथी मिळाला आहे. किनखेड पूर्णा तालुका अकोट येथे हा आदर्श विवाह आप्त स्वक यांच्या सहज उपस्थितीत पार पडला. सून स्वातीचे इस्टेटसह कन्यादान केले. यामुळे शेतकरी सासरे केशवराव धनभर यांच्या दातृत्वाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# दोन भावी क्रिकेटपटूंचा अपघातात मृत्यू

**जळगाव, दि. ९ प्रतिनिधी**

बोदवड तालुक्यातील केसरी स्पोर्ट्स अकॅडमीच्या १३ क्रिकेटपटूंना घेऊन परतणाऱ्या क्रुझर वाहनाला सोमवारी पहाटे सव्वा पाच वाजता अहमदनगर-संभाजीनगर महामार्गावर नेवासा तालुक्यातील उस्थळ दुमाला शिवारात अपघात झाला. पुण्यातून एमपीएल क्रिकेट सामना पाहून परतत असताना मागून आलेल्या ट्रकने जोरदार धडक दिल्याने दोन तरुण खेळाडूंचा दुर्दैवी मृत्यू झाला असून ११ जण किरकोळ जखमी झाले आहेत.

बोदवड येथील केसरी स्पोर्ट्स अकॅडमीचे १३ क्रिकेटपटू पुण्यातील गहुंजे मैदानावर आयोजित एमपीएल सामन्याला उपस्थित होते. सामना आटोपल्यानंतर हे सर्व खेळाडू क्रुझर मधून परतत होते. दरम्यान, उस्थळ दुमाला गावाजवळ त्यांच्या वाहनास मागून येणाऱ्या ट्रकने जोरात धडक दिली. या अपघातात प्रथमेश योगेश तेली (वय १४) याचा जागीच मृत्यू झाला. तर वृषभ बबन सोनवणे (वय १६) याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अन्य ११ खेळाडू जखमी झाले असून त्यांच्यावर नेवासा फाटा येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. अपघाताची माहिती मिळताच नेवासा पोलीस ठाण्याचे निरीक्षक धनंजय जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी जखमींना तातडीने रुग्णवाहिकेच्या सहाय्याने रुग्णालयात हलवले. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी नेवासा पोलिसांनी तपास सुरू केला आहे. या घटनेची नोंद अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली आहे. या दुर्घटनेमुळे बोदवड तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात असून परिसरात शोककळा पसरली आहे.

# एकाचवेळी सहा गावांचा भाजपमध्ये पक्षप्रवेश

**नंदुरबार, दि. ९ प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे माजी आदिवासी विकास मंत्री व आमदार डॉ. विजयकुमार गावित यांच्या नेतृत्वावर आणि विकास धोरणावर विश्वास दाखवत धडगाव तालुक्यातील अतिदुर्गम भागातील सहा गावांतील ग्रामस्थांनी एकत्रितपणे भारतीय जनता पक्षात सामील होत नवा राजकीय इतिहास घडवला आहे. नंदुरबार जिल्ह्याच्या राजकीय इतिहासात प्रथमच एका पेक्षा अधिक संपूर्ण गावांनी एकाच वेळी पक्षप्रवेश केल्याची ही ऐतिहासिक घटना आहे.

धडगाव तालुक्यातील बोरी गावात आयोजित कार्यक्रमात हा जम्बो स्वरूपातील पक्षप्रवेश पार पडला. भारतीय जनता पक्षाचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेकडो ग्रामस्थांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात चिखली, बिलगाव, गेंदा माळ, सावऱ्यादिगर, गुंडान चाफळा आणि बोरी या गावांमधील ग्रामस्थांनी सामूहिक भाजपात पक्षप्रवेश केला.

या गावांचा समावेश काँग्रेसचे



विद्यमान खासदार गोवाल पाडवी, माजी मंत्री के. सी. पाडवी आणि शिंदे गटाचे आमदार आमच्या पाडवी यांच्या प्रभाव क्षेत्रात होतो. त्यामुळे या भागातील ग्रामस्थांनी भारतीय जनता पक्षात केलेला प्रवेश म्हणजे या नेत्यांविरोधातील नाराजीचा स्पष्ट संदेश मानला जात आहे.

ग्रामस्थांनी या वेळी सांगितले की, "गेल्या ३५-४० वर्षांपासून रस्ते, वीज, पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी आम्ही प्रतीक्षा करत आहोत. मात्र, स्थानिक आमदारांनी याकडे कधीही लक्ष दिले नाही. आता आम्हाला मोदी सरकारच्या आणि डॉ. विजयकुमार गावित यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास वाटतो."

या कार्यक्रमात भाषण करताना डॉ. विजयकुमार गावित म्हणाले, "जिल्हा निर्मितीपासूनच माझा उद्देश या अतिदुर्गम भागाचा कायापालट घडवण्याचा आहे. आरोग्य, शिक्षण, रस्ते, वीज, पाणी या सर्व सुविधा आदिवासी भागात पोहोचवण्यासाठी मी सातत्याने कार्यरत आहे. या गावांचाही विकास करून त्यांना योग्य न्याय मिळवून देईन."

महासागर PALGHAR
RNI No.: MAHAMAR/2014/62313

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 208/B, Lokmanya Building, Near Taluka Panchayat Samiti Office, Palghar(W)-401404, **Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK, Executive Editor- Shashi Karpe**

महासागर पालघर

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून २०८/बी, लोकमान्य बिल्डिंग, तालुका पंचायत समिति कार्यालयासमोर पालघर (प.) ४०१४०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक : **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) कार्यकारी संपादक - शशी करपे (मो.नं. ९८९२९६८७२५) Email : mumbaimahasagar@gmail.com**
RNI No.: MAHAMAR/2014/62313